मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई, सोमवार, १२ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ५३ | पाने- ८

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



ऑलिम्पिकमध्ये भारताची मोहीम गोल्डविना संपली

पान ७

## प्रासंगिक

# अजूनही वेळ गेलेली नाही!



**काल** ठाणे शहरात राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्यात जोरदार राडा झाला. मनसे आणि शिवसेनेचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आणि आपापल्या नेत्यांचा जयजयकार करीत एकमेकांच्या नेत्यांचा उद्धारही केला. उद्धव आणि राज या दोन भावांमधील वाढत जाणाऱ्या राजकीय दरीकडे पाहता हे एक ना एक दिवस होणारच होते अशी चिंता दोघा भावांकडे आपुलकीने पाहणाऱ्या मराठी माणसांच्या मनात होती.अखेर कालच्या ठाण्यातील आणि परवाच्या मराठवाडा येथील राड्यामुळे मराठी माणसांच्या मनात असलेली चिंता खरी ठरली. वाईट या गोष्टीचे वाटते की ज्या मराठी माणसांनी 'ठाकरे' हे नाव, 'ठाकरे' या नावाचा दरारा केवळ महाराष्ट्रात आणि देशात नव्हे तर साता समुद्रपार जगात पोहचवीला त्याच मराठी माणसांनी 'ठाकरे' या नावाच्या करिश्माला धक्का दिला. हे असे का घडले, कोणी घडवून आणले याचा विचार दोन्ही भावांनी आणि त्यांच्या अतिउत्साही कार्यकर्त्यांनी कारण्याची आवश्यकता आहे. बाळासाहेबांनी अनेक वेळा जाहीर सभेतून सांगितले होते की प्रत्येकानी आपल्या नावाला जपायला हवे. पैसा येतो आणि जातो पण एकदा नाव गेले की ते परत मिळत नाही. बाळासाहेबांचे हा सल्ला दोन्ही भावांनी ऐकला असता तर आज ठाकरे नावाचा जो खेळखंडोबा झाला आहे तो झाला नसता. "ठाकरे विरुद्ध ठाकरे" या शीर्षकाखाली मागील आठवड्यात लिहिलेल्या लेखात मी स्पष्ट म्हटले होते की.. महाराष्ट्रासाठी नाही, मराठी माणसांसाठी नाही पण आपल्या पुढील पिढीतील तरुणांचा विचार करुन दोन्ही भावांनी एकत्रित येणे गरजेचे आहे. तसे झाले नाही तर राजकीय पटलावरून 'ठाकरे' नाव पुसण्यास फारसा वेळ लागणार नाही. या लेखाची शाई सुकत नाही तोपर्यंत केवळ चारच दिवसात ठाकरे या नावाबाबत दोन घटना घडल्या. पहिली घटना 'बीड' येथे घडली. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांचा मराठवाडा दौरा होता. या दौऱ्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकांनी राज ठाकरे यांचा ताफा अडवीला आणि त्यांच्या गाडीसमोर सुपाऱ्या फेकण्यात आल्या. उद्धव ठाकरे यांच्या शिवसैनिकांनी केलेल्या ऍक्शनची तात्काळ दुसऱ्या दिवशी रिऍक्शन उमटली. शिवसेनेच्या 'भगवा सप्ताहाच्या सांगता समारोह च्या निमित्ताने उद्धव ठाकरे ठाणे शहरात येत असताना त्यांच्या ताफावर नारळ, शेण आणि बांगड्या फेकण्यात आल्या. यामुळे ठाणे शहरांतही मनसे आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजीचा, धक्काबुक्कीचा राडा झाला. तसे पाहिले तर राडा करणे हे दोन्ही पक्षांना नवीन नाही. कारण मराठी माणसांच्या हक्कासाठी रस्त्यावर राडा करूनच शिवसेनेचा जन्म झाला आणि याच शिवसेनेतून फुटून 'मनसे' ने जन्म घेतला. तेव्हापासून दोन भावात दोन पक्षात निर्माण झालेली धुसपूस आज सुपारी, बांगड्या, नारळ आणि शेण फेकण्यापर्यंत येऊन पोहचली. यामुळेच ज्या 'ठाकरे' नावाने घाबरणाऱ्या परप्रांतीयांनी चणे फुटाणे खात या दोन भावातील राड्याचा आनंद लुटला. हे सारे चीड येण्यासारखे आहे. या राड्यातून काय निष्पन्न झाले, काय साध्य होणार ,याचा ना दोन्ही भावांनी विचार केला ना कार्यकर्त्यांनी. मुळात दोन्ही भावांनी एकत्रित येऊच नये यासाठी शिवसेनेच्याच नेत्यांनी अधिक मेहनत घेतली. उद्धव ठाकरे यांची भिती ही राज ठाकरे आहे, याची जाणीव या नेत्यांना असल्याने त्यांनीच या भावामधील दरी वाढविण्यासाठी खतपाणी घातले आणि मातोश्री मधील सर्वांनीच ते मान्य केले. यामुळेच आपला पक्ष वाढविण्यापेक्षा राज ठाकरे काय करीत आहे याकडेच उद्धव यांनी जास्त लक्ष दिले. जर राज ठाकरे यांनी शिवसेनेकडे टाळी मागूनही जर टाळी देण्यास उद्धव ठाकरे तयार नसतील तर राज ठाकरे यांच्या पक्षाने काय करावे आणि कोणाला पाठींबा द्यावा हा राज ठाकरे यांचा प्रश्न आहे. तरीही लोकसभा निवडणुकीत राज ठाकरे यांनी भाजपाला बिनशर्त पाठिंबा दिल्यावर उद्धव ठाकरे यांनी 'बिन शर्ट' पाठिंबा असे म्हणून राज ठाकरे यांची खिल्ली उडविणे कितपत योग्य आहे याचाही विचार करणे गरजेचे आहे. उद्धव यांचे भाजपाबरोबर फिस्कटले म्हणजे सर्वांनीच भाजपाबरोबर वाईटपण घ्यावे असे उद्धव यांना वाटते का! तसे असेल तर ते केवळ चुकीचे नसून बालिशपणा आहे असे म्हणावे लागेल. जर राज ठाकरे यांनी भाजपासोबत जाऊ नये किंवा स्वबळावर निवडणूका लढविल्यावर शिवसेनेच्या मतांची विभागणी होईल अशी जर उद्धव ठाकरे यांना भिती वाटत असेल तर त्यांनी राज यांना सोबत घेऊन निवडणुका लढवायल्या हव्यात. तसे झाले तर सारेच प्रश्न निकालात निघू शकतील. उद्धव ठाकरे यांना ना शरद पवारांचे उंबरठे झिजवावे लागतील, ना दिल्लीला मुजरा करावा लागेल, आदित्य ठाकरे यांच्या भविष्याची चिंता सतावणार नाही मुख्य म्हणजे कोणीही वाकड्या नजरेने पाहण्याची हिम्मत करणार नाही आणि काँग्रेस आणि राष्ट्रवादी साठी विधानसभेच्या जितक्या जागा जागा सोडव्या लागतात तितक्या सोडाव्याही लागणार नाही. इतकेच नाही तर महाराष्ट्राची सत्ताही एकहाती येऊ शकेल इतकी ताकत दोघांमध्ये आहे. म्हणूनच घरातील वाद बाजूला ठेऊन दोन्ही भावांनी एकत्रित यायला हवे. अजूनही वेळ गेलेली नाही. महाराष्ट्र आणि मराठी माणूस दोन भावांनी एकत्रित येण्याची वाट पाहत आहे.

**- सुरेंद्र मुळीक**



# जो-जो ओबीसींच्या जीवावर उठला, त्याला सोडू नका!

## मराठ्यांना ओबीसीतून कदापी आरक्षण मिळणार नाही

प्रतिनिधी

■ **सांगली**

जो जो ओबीसींच्या जीवावर उठला आहे, त्याला अजिबात सोडू नका, मराठ्यांना ओबीसीतून कदापी आरक्षण मिळणार नाही, मनोज जरांगे नावाच्या व्यक्तीला आरक्षण कशासाठी हेच कळत नाही, असे म्हणत मंत्री तथा राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी जोरदार टीका केली. सांगलीत ओबीसी एल्गार मेळावा पार पडला, यावेळी छगन भुजबळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांच्यावर पुन्हा हल्लाबोल चढवला.

छगन भुजबळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतात अन् लोकांवर अन्याय करणारी टोळी सद्या राज्यात उतरलेली आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट-सप्टेंबर ते ऑक्टोबर दोन महिने जरांगे मला शिव्या देत राहिला. पण मी शांत बसलो. पण बीडमध्ये ओबीसींच्या नेत्यांचे घरं जाळली. मग मी मात्र शांत राहू शकत नाही. 16 तारखेला मंत्रिपदाचा राजीनामा दिला अन् ओबीसी मेळावा घेतला. माझ्यामते महाराष्ट्र वाचला पाहिजे, महाराष्ट्र लुळा पांगळा झाला नाही पाहिजे, अशी माझी भूमिका आहे.

### पवार, ठाकरेंना का विचारत नाहीत

*जसे महायुतीच्या नेत्यांना टारगेट केले जाते. तसाच सवाल जरांगे यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना देखील विचारला पाहिजे, पण यांना राजकारण करायचं आहे. कोणाच्या तरी आडून विरोधकांना राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे, असा हल्लाबोल छगन भुजबळ यांनी केला. आरक्षण म्हणजे काय हे जरांगेंना देखील समजते का, हजारो वर्षे जे मागास आहे, त्यांना पुढे आणण्यासाठी हे आरक्षण आहे. आरक्षण हे आर्थिक स्थितीवर नसते. जे सामाजिक स्थितीवर आरक्षण असते. सगेसोयरे यावर आडून बसले. आरक्षण सगेसोयऱ्यांना देता येणार नाही. कारण भारतात पितृसत्ताक पद्धत आहे. वडीलांचे नाव लावले जाते. अनेक निवृत्त न्यायमूर्तींना मी हे विचारून बोलत आहे. असे भुजबळ म्हणाले.*

### ...मग, मराठा शिल्लक राहील का?

*छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेतात आणि आपल्याच लोकांवर हल्ले करतात. आज गावागावात ओबीसींवर हल्ले होत आहेत. आरक्षण कायद्यानुसार द्या ही आमची भूमिका आहे. आमच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्या. सर्वांनाच कुणबी व्हायचं आहे तर मग मराठा शिल्लक राहील का? असा संतप्त सवाल छगन भुजबळ यांनी शेवटी केला.*

# शेतकऱ्यांचे उत्पन्न सोडा, आत्महत्याच दुप्पट झाल्या...

## मोदींचा चेहरा राज्यात चालणार नाही



प्रतिनिधी

■ **सोलापूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे सांगितले होते. पण शेतकऱ्यांच्या आत्महत्या दुप्पट झाल्या असा हल्लाबोल शरद पवार यांनी केला आहे. तसेच अन्याय आणि जुलम करणारे सरकार खाली खेचा असे ते म्हणाले आहेत. सोलापूरच्या बार्शीमध्ये 'शरद शेतकरी संवाद मेळावा' पार पडला. यामध्ये ते बोलत होते. त्यांनी यावेळी मोदी सरकारला लक्ष केले आहे.

तसेच मराठा आरक्षणाच्या मुद्यावरही शरद पवार यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, "आम्ही जात, पात न बघता विधानसभा निवडणुकीत उमेदवारी देणार आहे. मराठा आरक्षणाबाबत सरकारने गुलाल उधळला. कोणत्या आधारावर गुलाल उधळला त्यांना विचारा. 2014 मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण देणार आहे असे सांगितले होते. आमची नक्कल ते निवडणुकीच्या तोंडावर करत आहेत", असे शरद पवार म्हणाले.

तसेच ते म्हणाले, "मराठवाड्यातील जनता आमच्या सोबत आहे. विधानसभेच्या निवडणूकीमध्ये देखील जनता आमच्या सोबत आहे. बार्शी आणि पंढरपूर या दोन गावात सायंकाळी सभा होतात आणि त्या चांगल्या होतात. आज भर उन्हात तुम्ही इथे उपस्थित आहात, म्हणजेच आपण बदलाच्या दिशेने वाहत असल्याचे हे संकेत आहेत. नरेंद्र मोदी यांचा चेहरा राज्यात चालणार नाही," असे शरद पवार म्हणाले.

### आम्ही शेतमालाला दर दिले

*ते म्हणाले, "शेतकऱ्यांच्या डोक्यावरचे ओझं कमी केले पाहिजे. आम्ही 80 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केली. आमचे सरकार असताना शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा विचार करून आम्ही शेतमालाला दर दिले. अधिक उत्पन्न झाल्यानंतर शेतकऱ्यांचा शेतमाल जगाच्या बाजारपेठेत जाण्यासाठी विचार केला. फळबागसारखी योजना आमच्या सरकारने आणली होती. याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला", असे शरद पवार म्हणाले.*

# पंतप्रधान मोदींनी 109 जातींच्या बियांचे केले प्रकाशन

## म्हणाले- लोक सेंद्रिय अन्नाकडे वाटचाल करत आहेत

वृत्तसंस्था

■ **नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी नवी दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन संस्थेत (IARI) 61 उच्च उत्पादन देणाऱ्या पिकांच्या 109 जातींचे प्रकाशन केले. त्यापैकी बाजरी, जनावरांचा चारा, तेलबिया, कडधान्ये, ऊस, कापूस, फायबर आणि अन्य 34 पिके आहेत.त्याच वेळी, 27 बागायती पिके आहेत, ज्यामध्ये फळे, भाज्या, मसाले, फुले आणि औषधी पिकांच्या विविध जातींचा समावेश आहे. यावेळी पंतप्रधानांनी शेतकरी आणि शास्त्रज्ञांशीही चर्चा केली. नैसर्गिक शेतीचे फायदे आणि सेंद्रिय शेतीवरील सर्वसामान्यांचा वाढता विश्वास यावरही पंतप्रधानांनी चर्चा केली.



पंतप्रधान मोदी म्हणाले, लोक सेंद्रिय अन्नपदार्थांचे सेवन आणि मागणी करू लागले आहेत. कृषी विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांना दर महिन्याला विकसित होणाऱ्या नवीन वाणांची माहिती द्यावी, अशी सूचना पंतप्रधानांनी केली. त्याचबरोबर हे नवीन वाण अतिशय फायदेशीर ठरणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

# सेंट मार्टिन बेट अमेरिकेला दिले असते तर माझी सत्ता गेली नसती

■ **नवी दिल्ली**

बांगलादेशच्या पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर सहा दिवसांनी शेख हसीना यांनी अमेरिकेला सेंट मार्टिन बेट न दिल्याने आपले सरकार पाडले आहे, असे म्हटले आहे. हसीना आपल्या जवळच्या सहाय्यकांना म्हणाल्या, "मला कट्टरतावादी हिंसाचारामुळे मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या वाढू द्यायची नव्हती. त्यांना विद्यार्थ्यांच्या मृतदेहांमधून सत्ता मिळवायची होती. पण मी ते होऊ दिले नाही."



हसीना म्हणाल्या, "सेंट मार्टिन बेट आणि बंगालचा उपसागर अमेरिकेच्या ताब्यात देऊन मी माझी खुर्ची वाचवू शकले असते. मी देशवासियांना कट्टरपंथीयांकडून दिशाभूल न करण्याचे आवाहन करते. अल्लाहच्या कृपेने मी लवकरच बांगलादेशात परतेन.

# भारतासह 9 देशांच्या सीमांवर चीनने वसवली 170 गावे

**नवी दिल्ली :** चीनने भारतासह ९ देशांच्या सुमारे २२ हजार किमी लांबीच्या सीमांवर कारस्थानाचे नवे 'ड्रॅगन' मॉडेल तयार केले आहे. गेल्या ८ वर्षांत राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी सुरक्षा प्रकल्पांच्या नावाखाली १७० हून अधिक नवीन चिनी गावे वसवली आहेत. चिनी सैन्य येथे राहणाऱ्या गावकऱ्यांचा आपले खबरे म्हणून वापर करते. हे गावकरी लष्कराला गुप्त माहिती पुरवतात. लष्करातून निवृत्त झालेले लोक बहुतांश गावात स्थायिक होत आहेत. न्यूयॉर्क टाइम्स आणि प्लॅनेट लॅबने ५ वर्षे चीनच्या आंतरराष्ट्रीय सीमांच्या शेकडो उपग्रह फोटोंचा अभ्यास केला. यामध्ये चीनच्या उत्तरेकडील मंगोलियापासून मध्य आशियापर्यंत, एलएसी (वास्तविक नियंत्रण रेषा) ते दक्षिणेकडील व्हिएतनामपर्यंत चीनच्या या गावांच्या वसाहती आढळून आल्या आहेत. या गावांमध्ये रस्ते आणि इंटरनेटही कार्यान्वित केले आहे.

# मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यात बॉम्बस्फोट

## माजी आमदाराच्या पत्नीचा मृत्यू

वृत्तसंस्था

■ **इंफाळ**

मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यात शनिवारी (10 ऑगस्ट) झालेल्या बॉम्बस्फोटात माजी आमदाराच्या पत्नीचा मृत्यू झाला. सायखुलचे माजी आमदार यामथोंग हाओकीप यांच्या घराजवळ ही घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले. अपघातात जखमी झालेल्या माजी आमदाराच्या पत्नी सपम चारुबाला यांचा रुग्णालयात मृत्यू झाला. हा बॉम्ब कोणी पेरला हे समजू शकलेले नाही. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत

दरम्यान, 9 ऑगस्ट रोजी टेंगनौपाल जिल्ह्यातील मोलनोम भागात गोळीबारात चार जण ठार झाले होते. पोलिसांनी सांगितले की, गावातील स्वयंसेवक आणि युनायटेड कुकी लिबरेशन फ्रंट (यूकेएलएफ) या दहशतवादी संघटनेच्या सदस्यांमध्ये गोळीबार झाला. यामध्ये एक अतिरेकी आणि 3 स्वयंसेवक शहीद झाले.



या घटनेमुळे संतप्त झालेल्या लोकांनी यूकेएलएफचे अध्यक्ष एसएस हाओकीप यांच्या घराला आग लावली. मात्र, आता परिस्थिती नियंत्रणात आहे. या प्रकरणी अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

आंतरराष्ट्रीय युवा दिवस १२ ऑगस्ट २०२४

जागरुकता-सुरक्षा-प्रतिबंध !

एड्स मुक्त राष्ट्राची गुरुकिल्ली




योग्य माहिती जागरुकता वाढवते, निरोगी जीवन जगण्यासाठी आणि सुरक्षित राहण्यासाठी चे मार्ग व साधन जाणून घ्या.

KNOW YOUR STATUS

PRO/863/ADV/2024-25

**जबाबदार वर्तणूक**
सुरक्षित लैंगिक संबंध ठेवा , कंडोम वापरा. व्यसन टाळा.

**चाचणी**
आजच एचआयव्ही चाचणी करा, आणि सुरक्षित रहा!

**उपचार**
त्वरीत आणि नियमित एआरटी उपचाराने एचआयव्ही बाधीत व्यक्ती सामान्य जीवन जगू शकते.

एचआयव्ही तपासणी सर्व महानगरपालिका / सरकारी रुग्णालयांमध्ये मोफत उपलब्ध आहे.

NACO राष्ट्रीय एड्स नियंत्रण संगठन
एड्स के खिलाफ भारत एकजुट
स्वास्थ्य एवं परिवार कल्याण मंत्रालय, भारत सरकार

बृहन्मुंबई महानगरपालिका

मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्था

www.mdacs.org.in

अधिक माहितीसाठी संपर्क/स्कॅन करा

AIDS Helpline 1097

## शिवसेना पंतनगर शाखा क्र.131 तर्फे भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**मुंबई :** शिवसेना पंतनगर शाखा क्रमांक १३१ च्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिवसेना पक्ष प्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या स्कलपनेतून भगवा सप्ताह च्या निमित्ताने रविवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी पंतनगर घाटकोपर पूर्व रक्तदान आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास विभाग प्रमुख सुरेश पाटील, उपविभाग प्रमुख संजय देरेकर,शाखाप्रमुख अजित गुजर, माजी उपविभाग प्रमुख प्रकाश वाणी, रवींद्र कोठावदे, प्रसाद कामतेकर, सचिन भांगे मोठ्या संख्येने शिव सैनिक उपस्थित होते.



## थोडक्यात

### बहीणींनी बँक खाते आधारकार्डशी संलग्न करावे

**पालघर :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पालघर जिल्ह्यातून एकूण दोन लाख ९६ हजार १४७ अर्ज पात्र ठरले आहेत, तर २८ हजार अर्ज त्रुटीयुक्त आहेत, मात्र अद्याप ज्या महिलांचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न केलेले नाही, अशा महिलांनी संबंधित बँकेत जाऊन बँक खाते आधार कार्डशी संलग्न करण्याची कार्यवाही करून घ्यावी, तसेच त्रुटी असलेल्या अर्जांच्या बाबतीत संबंधित महिलांनी तत्काळ आशा सेविका, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक अथवा ज्यांच्याकडून अर्ज भरून घेतला असेल त्यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांच्या आधार संलग्न बँक खात्यात दरमहा एक हजार पाचशे रुपये रक्कम जमा केली जाणार आहे. यासाठी संबंधित महिलेचे बँक खाते आधार कार्डशी संलग्न केलेले असणे आवश्यक आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी तत्काळ बँक खाते आधार कार्डशी संलग्न करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मल्लीनाथ कांबळे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालविकास प्रवीण भावसार यांनी केले आहे.

### गोवंडीतून हरवलेला अडीच वर्षांचा चिमुरडा सुखरुप

**मुंबई :** खेळताना हरवलेला अडीच वर्षांचा मुलगा सुखरुप सापडल्याने त्याच्या पालकासह स्थानिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. या मुलाला त्याच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता, मात्र मुलगा सापडल्याने त्याचे अपहरण झाले नसल्याचे उघडकीस आले आहे. गोवंडीतील शिवाजीनगर परिसरात राहणाऱ्या तबरेज मज्जीबू अन्सारी यांनी ही तक्रार केली आहे. त्याचा एसी दुरुस्तीचा व्यवसाय आहे. त्याला अडीच वर्षांचा एक मुलगा आहे. गुरुवारी सकाळी हा मुलगा घरासमोरच खेळत होता. मात्र, काही वेळानंतर तो दिसेनासा झाला. त्याच्या आईने त्याचा सर्वत्र शोध घेतला, मात्र तो कुठेच सापडला नाही. रात्री उशीरापर्यंत मुलगा न सापडल्याने तबरेज अन्सारी यांनी शिवाजीनगर पोलिसांत त्यांचा मुलगा हरवल्याची तक्रार केली होती. पोलिसांनी या तक्रारीची गंभीर दखल घेत अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा नोंद केला. शिवाजीनगर आणि मानखुर्द परिसरात अशाच प्रकारच्या काही घटना घडल्याने त्याचा समांतर तपास करण्याचे आदेश गुन्हे शाखेला देण्यात आले होते.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# मृत्युंनंतरही मृतदेहांचे होतात हाल; शहराच्या मध्यभागी शवविच्छेदन केंद्र उभारण्याची मनसेची मागणी

प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्व व पश्चिम परिसराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यात अनेकदा अप्रिय घटना घडत असतात. अशावेळी आवश्यक असलेली सुविधा हाकेच्या अंतरावर नसल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सोसावा लागत असल्याची बाब मनसेने पालिकेच्या निदर्शनास आणून दिली आहे. दरम्यान, मृत्यूनंतर मृत्तदेहाचे हाल नकोत याकरिता नवघर व कामणच्या धर्तीवर शहराच्या मध्यभागी नवे शवविच्छेदन केंद्र उभारण्यात यावे त्यासोबत शवागाराची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी मनसेचे तालुकाध्यक्ष प्रवीण भोईर यांनी पालिकेला केली आहे.

वसई पूर्वेत भोयदापाडा, वाघराळपाडा, नायगाव पूर्व परिसर, जूचंद्र, राजावली, टिवरी असे परिसर आहेत. येथे एखादी अप्रिय घटना घडल्यानंतर मृत्तदेह शवविच्छेदनासाठी कोसो दूर कामण किंवा नवघर परिसरात न्यावा लागतो. या दोन्ही ठिकाणी रात्री डॉक्टर नसल्याने मृत्तदेहाच्या विच्छेदनासाठी नातलगांना रात्रभर थांबावे लागते. कधी कधी कामणमधील नागरिक मृत्तदेह विच्छेदनासाठी नवघर येथे आणतात. मात्र हद्दीच्या प्रकरणामुळे त्यांना परत पाठवले जाते. अशावेळी नागरिकांचा वेळ व पैसा तसेच रूग्णवाहीकेचा खर्च वाया जातो. याच धर्तीवर वसई व विरारच्या मध्यभागी एखादे नवे शवविच्छेदन केंद्र उभारावे तसेच या शवविच्छेदन केंद्राच्यासोबत शवागार उभारावे अशी मागणी मनसेचे वसई तालुकाध्यक्ष प्रवीण भोईर यांनी केली आहे.

मात्र बऱ्याचदा मागणी करूनही पालिका त्याकडे काणाडोळा करत असल्याने मनसे आंदोलनाच्या तयारित असल्याचा इशारा प्रवीण भोईर यांनी वसई-विरार शहर महानगरपालिकेला दिला आहे.

# महापालिकेचा फेरीवाला माझा लाडका उपक्रम

## सर्वच ठिकाणी फेरीवाल्यांचे साम्राज्य; तर ठेकेदारांकडून वसुल्या जोरात

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिसरात फेरीवाल्यांचा विळखा दिवसेंदिवस घट्ट होत चालला आहे. महापालिकेचे फेरवाला धोरण निश्चित नसताना पालिकेचे ठेकेदार मात्र या फेरीवाल्यांकडून मनमानीपणे वसुल्या करत असल्याचे संतापजनक चित्र आहे. यावरून पालिकेचे फेरीवाला माझा लाडका असा उपक्रम सध्या सुरू आहे.

नायगाव, वसई, नालासोपारा व विरार या महत्वाच्या रेल्वेस्थानकांच्या परिसरात फेरीवाल्यांचा उपद्रव वाढत चालला आहे. या फेरीवाल्यांमुळे वर्दळीस वाहतुकदारांना मोठा त्रास सोसावा लागत आहे. पालिका प्रशासन अनेकदा कारवाई करूनही या फेरीवाल्यांची संख्या वाढतच आहे. परप्रांतीय फेरीवाल्यांची मक्तेदारी वाढत असून त्यांची दादागिरीही वाढली आहे. दरम्यान, शहराच्या मध्यवर्ती भाग तसेच मुख्य रहदारीच्या ठिकाणी हे फेरीवाला ठाण मांडून बसले आहेत. पालिकेचे फेरीवाला धोरण निश्चित नसताना फेरीवाल्यांचा वाढता उपद्रव नागरिकांना अडचणिचा ठरू लागला आहे. पालिकेकडून भूमाफिया माझा लाडका असा अभिनव उपक्रम सध्या जोमात सुरू असल्याचे सर्वत्र दिसून येते.

पालिकेने याआधी फेरीवाल्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. मात्र पालिकेचे ठेकेदार फेरीवाल्यांकडून बेकायदेशीर वसुल्या करत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. या फेरीवाल्यांना बऱ्याचदा स्थानिक राजकारणी व नागरिकांचा पाठिंबा असल्याने फेरीवाल्यांची संख्या वाढत चालली आहे. पालिकेने हे फेरीवाल्यांचे संकट ओळखून त्यावर तात्काळ कारवाईची भूमिका घेतली पाहिजे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# कामण, चिंचोटी परिसरात कचऱ्याचे साम्राज्य

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

प्रतिनिधी
■ वसई

वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती- 89 या विभागांतर्गत येणाऱ्या कामण, चिंचोटी, देवदळ, कोल्ही व सागपाडा या परिसरात सध्या कचरा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ठिकठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य व त्यातून पसरलेली दुर्गंधी यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पालिकेने सदर कचरा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी स्वच्छता निरीक्षकांना सूचना कराव्यात अशी मागणी वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या माजी नगरसेवक प्रिती दिनेश म्हात्रे यांनी पालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या परिसरात कचराकुंड्या (डस्टबीन) अस्तित्वात असल्या तरी त्या तुटलेल्या आहेत. तर काही ठिकाणी त्या कचराकुंड्याच नसल्याने कचरा उघड्यावरच टाकला जातो. भर पावसाळयात उघड्यावरील कचरा भिजून त्यातून दुर्गधीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे प्रभाग क्र.89 मध्ये घाणीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ज्या परिसरात कचरा तसाच उघड्यावर पडून आहे, तो तात्काळ साफ करण्यासाठी तसेच परिसरातील गटारे व शौचालये यांची साफसफाई करण्याचे आदेश स्वच्छता निरीक्षकांना देण्याची मागणी माजी नगरसेविका प्रिती दिनेश म्हात्रे यांनी सदर निवेदनातून पालिका आयुक्तांना केली आहे.

तसेच कामण परिसराची लोकसंख्या वाढत चालली असून या परिसरात स्वच्छता कर्मचारी वाढवण्याची मागणीही या निवेदनातून म्हात्रे यांनी केली आहे.




*मुंबई:* शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शाखा क्र 67 मध्ये भगवा सप्ताह निमित्त शिवसेना नेते, आमदार अनिल परब साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली चार बंगला उपशाखेत सदस्य नोंदणी ला अंधेरी पश्चिम विधानसभा उपविभागप्रमुख, माजी नगरसेवक संजय पवार, अशोक जाधव, माजी नगरसेविका ज्योत्स्ना दिघे, अनिता बागवे, संघटक विना टाक, समन्वयक स्वाती घोसाळकर, शाखाप्रमुख दिपक सणस, शाखासंघटक पूजा पाटील, शहापूर तालुका संपर्कप्रमुख सुनील परब, उपशाखाप्रमुख महेश गोवळकर, सुरेश सालगे, सहकार सेनेच्या स्वाती तावडे, मीरा कांगडे, कैलास बालशंकर व शिवसैनिक उपस्थित होते.

# पालिका सेवानिवृत्त सुरक्षा रक्षकांना वर्षभरानंतरही देय रक्कम नाही

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महापालिकेत सुरक्षा रक्षक म्हणून उमने इतबारे सेवा केल्यानंतर सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचे निवृत्ती नंतरची देय रक्कम मिळण्यास वर्षभराचा काळ लोटल्या नंतर सुद्धा मिळत नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे हे सेवानिवृत्त कर्मचारी कर्जबाजारी होत असल्याचे म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे चिटणीस रामचंद्र लिंबारे यांनी पत्राद्वारे ही बाब प्रमुख सुरक्षा अधिकारी यांच्या निदर्शनास आणली आहे.

पालिका ही आशिया खंडात सर्वात मोठी व श्रीमंत महापालिका म्हणून ओळखली जात आहे. मुंबई महानगरपालिकेचा सन २०२४-२५ चा अंदाजित अर्थसंकल्प ५९९५४.७५ कोटी रुपयांचा आहे. तरीही सेवानिवृत्त कामगारांचे अधिदान त्यांना वेळेवर मिळत नाही. याबद्दल आशर्य व्यक्त करण्यात येत आहे.



लिंबारे यांनी या पत्रात उदहरणादाखल लो.टि.म.स. रूग्णालय सुरक्षा रक्षक दयानंद तेली व मोहन शिंदे यांचे उदाहरण दिले आहे. तेली व शिंदे हे सेवानिवृत्त होऊन १३ महिने झाले तरी आजमितीपर्यंत कोणतेही देय रक्कम त्यांना मिळाली नाही, त्यामुळे ते कर्जबाजारी झाले आहेत. तसेच त्यांना शारिरीक व मानसिक त्रास झालेला आहे. आजारी असल्यामुळे डॉक्टरकडे जाण्यास सुध्दा आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. असे नमूद करून अशी अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

याबाबत आपण आपल्या दालनात तात्काळ निर्णय घेण्यासाठी २०/८/२०२४ रोजीपर्यंत बैठक घेऊन निर्णय घ्यावा अन्यथा २१/८/२०२४ रोजी आम्ही आपल्या दालनासमोर आमरण उपोषण करू असा इशाराही लिंबारे यांनी पत्रात दिला आहे.

# वसई तालुक्यात आदिवासी दिन तारपा तालावर साजरा

प्रतिनिधी
■ वसई

वसई तालुक्यात आदिवासी दीन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाच्या निमित्ताने तालुक्यांत बेलवडी, पेल्हार, चिचोटी, सायवन, सातीवली, इ ठिकाणीं मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आदिवासी बांधवांनी तारपाच्या तालावर ठेका धरत या उत्सवात रंगत आणली.

आदिवासी समुदायाच्या मानवी अधिकाराचे संरक्षण व्हावे, संस्कृतीचे रक्षण करणे, त्यांचा जल-जंगल आणि जमिनीवरील अधिकार अबाधित राहावा, त्यांची विशिष्ट संस्कृती, ओळख, हक्क आणि अधिकाराची ओळख, सामाजिक ऐक्य, अस्तित्व, स्वाभिमान, आत्मसन्मान, अस्मिता, कायम राहावी यासाठी व्यापक जनजागृती आणि प्रयत्नांची आवश्यकता लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाकडून हा दिवस दरवर्षी 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून साजरा केला जातो.

आज जागतिक आदिवासी दिन वसईत देखील मोठ्या उत्साहात आणि आनंदाच्या वाटवरणात साजरा होताना पाहायला मिळाला. वाजत गाजत आदिवासी बांधवांकडून रॅली काढण्यात आल्या होत्या.या रॅलीमध्ये आदिवासी बांधवांकडून त्यांची पारंपरीक वेशभूषा धारण करून पारंपरीक वाद्यावर नृत्य साजरे करण्यात आले होते, तर दुसरीकडे पेल्हार मध्ये टबला नाचत गाजत आदिवासी दिनानिमित्त ही मिरवणूक काढण्यात आली होती.



***वसईत आदिवासी समाजाची मुख्य प्रवाहाकडे वाटचाल***

*जंगलात राहणारा वस्त्रशून्य किंवा अर्धवस्त्र समाज म्हणजे आदिवासी समाज अशी एकेकाळी आदिवासी समाजाची ओळख होती. मात्र. आता आदिवसींनीही आपली वाट बदलून मुख्य प्रवाहाची वाट धरली आहे. या समाजातून शिक्षित आणि स्पर्धा परीक्षांमध्ये नैपूण्य दाखविणाऱ्यांचा टक्कादेखील वाढला आहे. वर्तमानातून उज्ज्वल भविष्याकडे आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात जाताना आपल्या गौरवशाली परंपरांचे जतन करणारा आदिवासी समाज अशी एक नवी ओळख निर्माण झालेली आहे.*

# विक्रमगड विधानसभेची उमेदवारी कोणाला मिळणार!

## मातब्बर उमेदवारांच्या नजरा विक्रमगड विधानसभेवर

प्रतिनिधी
■ जव्हार

आगामी विधानसभा निवडणुकांचे वारे पालघर जिल्ह्यातही जोरदार वाहू लागले असून, पालघर जिल्ह्यातील विक्रमगड विधानसभेवर अनेक मातब्बर उमेदवारांच्या नजरा लागून राहिल्या आहेत. विक्रमगड विधानसभा मतदारसंघ म्हणजे डोंगरी भागात वसलेला मतदार संघ आहे. जव्हार , मोखाडा , विक्रमगड या तालुक्यांचा समावेश या मतदार संघात येत असुन, वाडा तालुक्याचा काही भाग या मतदार संघात येतो.

विक्रमगड विधानसभेमध्ये भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या तीनही पक्षाची समसमान ताकद या मतदारसंघांमध्ये आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन झाल्यानंतर स्वतंत्र विक्रमगड विधानसभा मतदारसंघ निर्माण झाला, त्यानंतर दिवंगत कै. चिंतामण वनगा भाजपा व शिवसेना युतीचे उमेदवार म्हणून सन २००९ साली प्रचंड मतांनी निवडून आले होते . त्यानंतर २०१४ साली भाजपा शिवसेना युती फिस्कटल्यानंतर भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस हे तीनही पक्ष वेगवेगळे लढले त्यामध्ये भाजपाचे उमेदवार दिवंगत कै.विष्णु सवरा विजयी झाले होते त्यानंतर सन २०१९ साली सुनील चंद्रकांत भुसारा हे राष्ट्रवादीचे कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले होते.

यावेळी येऊ घातलेल्या विक्रमगड विधानसभेची निवडणूक पक्ष फुटी मुळे रंगतदार होणार आहे. भारतीय जनता पार्टी मधून हरिचंद्र भोये, सुरेखा थेतले हे मातब्बर उमेदवार इच्छुक आहेत. तर लोकसभेच्या निवडणुकीमध्ये पालघर लोकसभेच्या उमेदवारीला शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार राजेंद्र गावित यांना भाजपा कार्यकर्तांन तर्फे तीव्र विरोध करण्यात आला होता, त्यामुळे त्यांनी ही निवडणूक न लढता भाजपामध्ये प्रवेश केला होता . त्यामुळे त्यांना देखील विक्रमगड विधानसभेमध्ये उमेदवारी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही, एकंदरीत पाहिलं तर भाजपा कार्यकर्त्यांमध्ये हरिचंद्र भोये यांची लोकप्रियता जास्त असल्याने त्यांना विक्रमगड विधानसभेची उमेदवारी जवळ जवळ निश्चित होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटातून विद्यमान आमदार सुनील भुसारा हे एकमेव उमेदवार आहे, तर महाआघाडीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे कमलाकर धूम हे देखील इच्छुक आहेत तर महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमध्ये असलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून श्रावण खरपडे यांनी निवडणूक लढवावी अशी असंख्य शिवसैनिकांची इच्छा आहे तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे गोपाळ वझरे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. एकंदरीत पाहिलं तर या वेळेची विधानसभेची निवडणूक ही रंगतदार ठरणार आहे.

# एड्स जनजागृतीसाठी 'रेड रन मॅरेथॉन'मध्ये तरुणाईचा सहभाग



प्रतिनिधी
■ मुंबई

ह्युमन इम्युनो डेफिसिएन्सी व्हायरस (एचआयव्ही) / एड्स बाबतची जनजागृती करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थेमार्फत रेड रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यंदाच्या वर्षी ‘Run to end AID’S’ या संकल्पने अंतर्गत एचआयव्ही एड्स विषयाची महाविद्यालयीन युवकांमध्ये जनजागृती करण्याकरिता ही मॅरेथॉन पार पडली. तरूणाईनेही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवतानाच या स्पर्धेसाठी चांगल्या संख्येने हजेरी लावली.

रविवारी पार पडलेल्या मॅरेथॉनमध्ये मुलांमध्ये टोपीवाला महाविद्यालयाच्या विशाल पावरा आणि विजय ओकसा यांनी अनुक्रमे पहिले आणि दुसरे स्थान मिळवले. तर मुलींमध्ये रूबी धोडी (शासकीय दंत महाविद्यालय) आणि स्विटी म्हात्रे (विल्सन महाविद्यालय) यांनी अनुक्रमे पहिले आणि दुसरे स्थान पटकावले. तर तृथीयपंथी समाजातून सहभागी झालेल्या गणेश चिखलकर (गव्हर्नमेंट लॉ कॉलेज) आणि सागर शहा (डी वाय पाटील) या विद्यार्थ्यांनी पहिले व दुसरे स्थान मिळवले.

एचआयव्ही एड्स आजाराच्या जनजागृतीसाठी राष्ट्रीय पातळीवर आखण्यात आलेले जनजागृतीचे कार्यक्रम आणि उपक्रम हे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात यावेत. तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत या आजाराबाबतची जनजागृती व्हावी याअनुषंगाने कार्यक्रम राबवण्यात आला. तरूणाई तसेच नागरिकांचा सहभाग असणाऱ्या रेड रन मॅरेथॉनचे आयोजन हा एचआयव्ही एड्स विरोधात मुंबईत राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती कार्यक्रमांपैकी एक पुढाकार होता.

# गोदी कामगारांनी न्याय्य मागण्या मिळविण्यासाठी लढा देण्यास सज्ज रहा - अॅड. एस. के. शेट्ये

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतातील बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ पासून पगारवाढ लागू आहे. आत्तापर्यंत द्विपक्षीय वेतन समितीच्या ७ बैठका झाल्या, परंतु कोणतीही सन्माननीय तडजोड झाली नाही, गोदी कामगारांची चांगली एकजूट आहे. तेंव्हा गोदी कामगारांनी आपल्या न्याय्य मागण्या मिळवण्यासाठी लढ्याची तयारी ठेवा. असे आवाहन अखिल भारतीय बंदर व गोदी कामगारांचे ज्येष्ठ नेते अॅड. एस. के. शेट्ये यांनी मुंबई पोर्ट ट्रस्ट पेन्शनर्सच्या जाहीर मेळाव्यात केले.

मुंबई पोर्ट ट्रस्ट रिटायर्ड एम्प्लॉईज असोसिएशनची ४४ वी वार्षिक सभा ९ ऑगस्ट २०२४ रोजी दादर येथील शिवाजी मंदिर येथे सी. जे. मेंडोसा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. अॅड. एस.के. शेट्ये आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पुढे म्हणाले की, मुंबई पोर्ट ट्रस्ट पेन्शनरची सभा अविस्मरणीय आहे. आपल्यापासून आम्हाला प्रेरणा मिळते. अशी शक्ती असेल तर कामगार चळवळ अधिक मजबूत होईल. मला डॉ. शांती पटेल, एस. आर. कुलकर्णी, अँथोनी पिल्ले अशा कामगार नेत्यांबरोबर काम करण्याची संधी मिळाली. मला अनेक पुरस्कार मिळाले परंतु, गोदी कामगारांकडून मिळालेले प्रेम हा माझ्या दृष्टिकोनातून सर्वात मोठा पुरस्कार आहे. गोदी कामगार कृतज्ञ आहेत. पेन्शनर्सनी घाबरण्याची काही गरज नाही, जोपर्यंत समुद्रात पाणी आहे तोपर्यंत गोदी कामगारांना पेन्शन मिळत राहील. आता मुंबई पोर्टची आर्थिक स्थिती चांगली होत आहे. जीवनात पैसा आवश्यक आहे, पण समाधान मिळाले पाहिजे, त्यासाठी ज्ञानेश्वर महाराजांचे हरिपाठ वाचा. जीवनात यशस्वी होण्यासाठी चिकाटी महत्त्वाची आहे.



याप्रसंगी मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे जनरल सेक्रेटरी सुधाकर अपराज, मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे माजी बोर्ड मेंबर व युनियनचे सेक्रेटरी दत्ता खेसे, युनियनचे उपाध्यक्ष व मुंबई पोर्ट प्राधिकरणाचे नवनिर्वाचित बोर्ड मेंबर प्रदीप नलावडे, पेन्शनर्स असोसिएशनच्या उपाध्यक्ष विजया कुलकर्णी, ट्रान्सपोर्ट डॉक वर्कर्स युनियनच्या खजिनदार आणि मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या बोर्ड मेंबर कल्पना देसाई, मुंबई पोर्ट प्राधिकरणाच्या लेखा विभागातील पेन्शनचे प्रमुख अधिकारी चौधरी इत्यादी मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली. व्यासपीठावर पेन्शनर्स असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी डी. एच.डिंगरेजा, सेवानिवृत्त उप मुख्य लेखा अधिकारी श्रीपाद यादवाडकर, मारुती विश्वासराव, बबन मेटे, बापू घाडीगावकर,गिरीश कांबळे,प्रकाश दाते आदी मान्यवर उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन माईकल कोलॅसो यांनी केले तर आभार पेन्शनर्स असोसिएशनचे जॉईंट सेक्रेटरी बी.बी.चिपळूणकर यांनी मानले. सभेला पेन्शनर्सची प्रचंड गर्दी होती.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 53**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ५३**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई: शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धवजी ठाकरे यांच्या सूचने नुसार शिवसेना शाखा क्रमांक २०६ च्या वतीने शिवडी काळाचौकी विभागात गेला आठवडाभर भगवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे या भगवा सप्ताह अंतर्गत ठिकठिकाणी शिवसेना सदस्य नोंदणी करण्यात येत आहे त्याच प्रमाणे काल शाखेत शिवसैनिकांसोबत मतदार यादी तपासणी तसेच मतदार यादी वाचन, नवीन मतदार नोंदणी, करण्याचे काम सुरू करण्यात यावेळी उपस्थित शिवसेना नगरसेवक सचिन पडवळ, शाखाप्रमुख बैजू हिंदोळे तसेच शाखेचे उपशाखप्रमुख, गटप्रमुख, ज्येष्ठ शिवसैनिक*



# ही सुरुवात आहे तुमच्या अधोगतीची, बावनकुळेंचे उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर

प्रतिनिधी
■ मुंबई

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या भगव्या सप्ताहाचा सांगता मेळावा गडकरी रंगायतन येथे झाला. या मेळाव्याला करताना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपावर जोरदार टीका केली. भाजपामुक्त राम अयोध्यावासीयांनी करून दाखवल्याचे त्यांनी सांगितले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांना यावर प्रत्युत्तर दिले आहे.

आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्वीट केले आहे. औरंगजेब फॅन क्लबचे म्होरके जनाब उद्धव ठाकरे यांनी ठाण्यात जाऊन भाजपामुक्त राम करायची बोंब ठोकली. पण त्यांना हे या जन्मात तरी शक्य होणार नाही. कारण मतांसाठी ठाकरे गटाने हिरवा करून घेतला. छत्रपती शिवरायांचा वारसा सोडून औरंगजेबाच्या वारसदारांच्या ते पालख्या वाहत असल्याची टीका त्यांनी केली.

हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे, ठाकरे गटासारख्या औरंगजेबीवृत्तीला कशी धूळ चारायची हे इथल्या मावळ्यांना ठावूक आहे. आता तर शिवरायांची वाघनखेही महाराष्ट्रात आली आहेत, त्यामुळे याच वाघनखांच्या साक्षीने येणाऱ्या निवडणुकीत मतांच्या शस्त्राने जनता ठाकरे गटाचा हिरवा कोथळा बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही, असा दावा त्यांनी केला.



लांड्या, लबाड्या आणि धूळफेक करून उद्धव ठाकरे जास्त दिवस लोकांना फसवू शकणार नाहीत. तुमच्या रॅलीतील हिरवे झेंडे जनता विसरली नाही, असे सांगून बावनकुळे म्हणतात, ''लोकसभेला आम्ही तुमचे नऊ खासदार निवडून दिले, मग वक्फ बोर्डाची बाजू का घेत नाही?'' असे म्हणत मातोश्रीबाहेर मुस्लीम समाजाने आंदोलनही केले. भगवे सोडून हिरवे पांघरले की असेच होणार आहे. ही सुरुवात आहे तुमच्या अधोगतीची. स्वार्थासाठी तुम्ही बाळासाहेबांना विसरलात, जनता तुम्हाला माफ करणार नाही, असे त्यांनी सुनावले आहे.

***कारसेवकांचे रक्त लोढाचा टॉवर बांधण्यासाठी सांडवले का? ; उद्धव ठाकरेंनी केली होती ठाण्यात टिका***

*उद्धव ठाकरे यांनी काल, शनिवारी ठाण्यात भाजपासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर घणाघाती टीका केली. भाजपाचे बगलबच्चे आणि गद्दार मिंधे ठाणे, मुंबई आणि अयोध्येतील भूखंड खात सुटले आहेत. जसा आदर्श घोटाळा मुंबईत झाला होता तसाच एक घोटाळा अयोध्येत झाला आहे. सैन्य दलाची जमीन बिल्डर मंगलप्रभात लोढाच्या घशात घातली आहे. यासाठी तुम्हाला अयोध्येत राम मंदिर हवे होते का? कारसेवकांचे रक्त लोढाचा टॉवर बांधण्यासाठी सांडवले का? असे सवाल उद्धव ठाकरे यांनी केले. अयोध्येची जमीन लोढा, योगगुरू रामदेव बाबा खातो आणि आम्ही फक्त जय श्रीरामच्या घोषणा देतो. आम्हाला भाजपामुक्त राम पाहिजे होता आणि अयोध्यावासीयांनी भाजपामुक्त राम करून दाखवला, अशी बोचरी टीका ठाकरे यांनी केली.*

# राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षकांचा 29 ऑगस्ट पासून बेमुदत संपाचा निर्धार

## मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाला फासला हरताळ!

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यातील १७ लाख राज्य कर्मचारी शिक्षकांना वर्षभरापूर्वी "जुन्या पेन्शनप्रमाणे कर्मचारी-शिक्षकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येईल" असे लेखी आश्वासन दिले होते. पण आजपर्यंत शासनाने कोणत्याही स्वरुपात सुधारित पेन्शन संदर्भातील शासन निर्णय किंवा अधिसूचना पारित केलेली नाही. त्यामुळे राज्यातील सुमारे साडे आठ लाख संबंधित कर्मचारी-शिक्षक संतप्त झाले आहे. हा संताप व्यक्त करण्यासाठी गुरुवार २९ ऑगस्ट २०२४ पासून "बेमुदत संप आंदोलनाचा" निर्णय काल मुंबईत झालेल्या राज्यस्तरीय समन्वय समितीच्या सभेत एकमुखाने घेण्यात आला.कर्मचारी-शिक्षकांना दिलासा देणारी कार्यवाही करणे राज्य शासनाला सहज शक्य आहे. राजकीय इच्छाशक्ती दाखवून शासनाने आगामी तीव्र संघर्ष टाळावा, अशी अपेक्षा समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी या समयी व्यक्त केली आहे.

मार्च २०२३ मध्ये या १७ लाख सरकारी कर्मचारी-शिक्षक यांच्या ७ दिवसांच्या संपात सरकारने चांगलाच उद्रेक अनुभवला होता . या आंदोलनाचा त्यांनी सकारात्मक विचार करुन, राज्य शासनाने कर्मचारी शिक्षकांच्या समन्वय समितीसह दिर्घ चर्चा केली. त्यावेळी खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी "जुन्या पेन्शनप्रमाणे कर्मचारी-शिक्षकांना आर्थिक व सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येईल" अशी लेखी हमी दिली. त्यानंतर डिसेंबर २०२३ पर्यंत त्याबाबत कोणतीच सकारात्मक प्रगतीशील कार्यवाही दिसून न आल्यामुळे कर्मचारी-शिक्षकांनी पुन्हा १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपाची घोषणा केली. सदर संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनासह पुन्हा झालेल्या चर्चेनुसार तत्कालीन अर्थसंकल्पीय अधिवेशनात, "सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना" जाहीर केली. परंतु पुन्हा "येरे माझ्या मागल्या" प्रमाणे आजपर्यंत शासनाने कोणत्याही स्वरुपात सुधारित पेन्शन संदभांतील शासन निर्णय किंवा अधिसूचना अद्याप पारित केलेली नाही..सुधारित पेन्शनच्या भवितव्याबाबतही कर्मचारी चिंतित झाले आहेत. तसेच केंद्राप्रमाणे ग्रॅच्युईटी द्या, १२ वर्षानंतर सेवानिवृत्ती वेतन/अंशराशीकरण पुनर्स्थापना करा. केंद्राप्रमाणे १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात/अधिसूचना व्दारे नियुक्ती प्रक्रिया सुरु झालेल्या कर्मचारी/शिक्षकांना १९८२ ची जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करा, सेवानिवृत्तीचे वय ६० करा, विविध संवर्गातील रिक्त असलेली ४० टक्के पदे कायमस्वरुपी नियुक्तीव्दारे भरा, विना अट अनुकंपा तत्वावर नियुक्त्या द्या, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, शैक्षणिक विभागातील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विशेष चर्चासत्र आयोजित करा, नवीन शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा, आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना न्याय द्या अशा प्रलंबित मागण्यांबावत मुख्य सचिव पातळीवर चर्चासत्र आयोजित करुन, शासन निर्णय पारित केले जातील असे निसंदिग्ध आश्वासन शासनातर्फे देण्यात आले होते. या आश्वासनाला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहेत अशी भावना सर्वदूर महाराष्ट्रातील कर्मचारी शिक्षकांच्या मनात उत्पन्न झाली आहे.असेही काटकर यांनी सांगितले.

# सुप्रिया सुळेंचा मोबाईल हॅक

प्रतिनिधी
■ मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा मोबाईल हॅक झाला आहे. सुप्रिया सुळे यांनी स्वत: सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर याबाबतची माहिती दिली. त्यांचा मोबाईल आणि व्हॉट्सॲप हॅक झालं आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे.रविवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केला. यामध्ये त्यांनी कार्यकर्ते आणि जनतेसाठी एक संदेश दिला. अत्यंत महत्त्वाचे असं म्हणत सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या मोबाईल आणि फोन हॅक झाला असल्याचं सांगितलं. तसेच, कोणी त्यांना फोन किंवा मेसेज करु नये असंही त्या म्हणाल्या.

माझा फोन हॅक झाला आहे. माझा फोन माझ्या बरोबरीने दुसरे कोणीतरी चालवत आहे. हॅक झाल्यानंतर माझ्या लक्षात आलं की, माझं व्हाट्सअप चालू होत नव्हते. म्हणून मी जयंत रावांना म्हटले, माझा फोन चेक करा तेव्हा त्यांनी 'नमस्कार' असा व्हाट्सअप ला मेसेज केला. त्यावेळी मी काहीही न करता जयंतराव यांना 'नमस्कार' असा रिप्लाय दिला गेला. त्यानंतर मी माझा मोबाईल स्विच ऑफ करून सिम बाजूला काढले. त्यानंतर पुन्हा मी त्यांना व्हाट्सअप ला मेसेज करण्यास सांगितले. त्यावेळेस हॅक करणाऱ्याने मेसेज केला की 'तुम्ही कुठे' आहात. तर दुसऱ्या एकाने नमस्कार ताई असा मेसेज केला असता, त्यांनाही नमस्कार ताई असा मेसेज आला.

त्यानंतर त्यांनी मेसेज केला की, आम्ही तुमची वाट बघत आहोत त्यावर पुन्हा मेसेज आला की, 'आयकॉलयू लेटर' माझा फोन बंद असताना सिम काढले असताना तरी सुद्धा माझ्या फोनवरून फोन गप्पा मारतोय हे अद्याप समजायला मार्ग नाही. याबाबत मी पोलीस कंप्लेंट केले आहे. अशा शब्दात खासदार सुप्रिया सुळे यांनी आपला मोबाईल हॅक झाल्याची माहिती जाहीर सभेत दिली.

# पवईच्या जयभीम नगर प्रकरणी एसआयटी चौकशीचे मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेश

## कोर्टाच्या हस्तक्षेपामुळे पीडित कुटुंबियांना न्याय मिळेल - नसीम खान

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिका आणि पवई पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी संगनमत करून ६ जुने रोजी अतिक्रमण काढण्याच्या नावाखाली नियमबाह्य कारवाई करून पवईच्या जयभीम नगर मधील ६०० कुटुंबियांना बेघर केले होते. या संदर्भातील याचिकेची सुनावणी करताना अतिक्रमण काढताना जी प्रक्रिया राबवली त्याची एसआयटीमार्फत चौकशी करून पुढच्या सुनावणीपर्यंत अहवाल देण्याचे आदेश मुंबई हायकोर्टाने दिले आहेत. त्या आदेशाचे स्वागत करून कोर्टाच्या आदेशामुळे या पीडित कुटुंबांना न्याय मिळेल अशी आशा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष व माजी मंत्री नसीम खान यांनी व्यक्त केली आहे.

माञ नसीम खान यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी यासाठी महानगरपालिका एस वार्डचे संबधित अधिकारी, पालिका उपायुक्त, पवई पोलीस स्टेशनचे अधिकारी यांची त्वरित बदली करण्यात यावी अशी मागणी एका पत्रकार परिषदेत केली.



पालिका व पोलिस अधिकारी, स्थानिक बिल्डर आणि स्थानिक नेत्यांनी हातमिळवणी करून सरकारच्या संरक्षणाखाली ६०० कुटुंबाना नियमबाह्य पद्धतीने बेघर करून भर पावसाळ्यात रस्त्यावर आणले आहे. या विरोधात काँग्रेस पक्षाने सातत्याने आवाज उठवला होता. आपण स्वत: पीडित कुटुंबांसह काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली राज्यपाल महोदयांची भेट घेऊन पीडित कुटुंबांना न्याय देण्याची मागणी होती. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून या मुद्द्याकडे त्यांचे लक्ष वेधले होते.

शुक्रवारी हायकोर्टाने या प्रकरणाची दखल घेऊन एसआयटीमार्फत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत हे स्वागतार्ह आहे. मुंबईच्या सहपोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाकाली होणा-या या चौकशीचा अहवाल पुढच्या तारखेला कोर्टासमोर ठेवण्याचे आदेश आहेत. कोर्टाचा हा आदेश बिल्डरांच्या फायद्यासाठी गोररगीबांची घरे तोडून त्यांना रस्त्यावर आणणा-या महायुती सरकारला चपराक आहे. असे नसीम खान म्हणाले.

# थर'च्या निमित्ताने शिक्षकाची जनजागृती

## १६ ऑगस्टला येणार चित्रपटगृहात

प्रतिनिधी
■ मुंबई

चित्रपटाचे चित्रीकरण सुरू असतानाच" थर " या चित्रपटाचे दिग्दर्शक उमेश पवार यांचे निधन झाले. त्यातूनही मोठ्या जिद्दीने आणि सामाजिक कार्याच्या हेतूने अमित मोहिते या दुसऱ्या दिग्दर्शकावर जबाबदारी सोपवून हा चित्रपट पूर्ण केला आहे. भरपूर समस्यांना तोंड देत अखेर हा चित्रपट १६ ऑगस्टला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे. या निमित्ताने दहीहंडी उत्सव येण्याआधीच प्रेक्षकांना चित्रपटगृहात हा थरारक 'थर' अनुभवता येणार आहे.



युवकांमध्ये उत्साह निर्माण करणारा महाराष्ट्रात कोणता सण असेल तर तो दहीहंडी उत्सव. उत्सवाच्या पूर्वी त्याची जोरदार तयारी या युवकांमध्ये केली जात आहे. उंच थराची, मोठ्या रकमेची दहीहंडी फोडण्याचा प्रत्येक पथकाचा प्रयत्न असतो. उत्सव होईपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण असते. परंतु दुसऱ्या दिवशी प्रसार माध्यमावरती उमटणारी प्रतिक्रिया ही निराश करणारी असते. अनेक गोविंदा जखमी झालेले असतात काही मृत्यूला सामोरे गेलेले असतात. ही वेदना, संवेदना व्यवसायाने शिक्षक असलेल्या विलास चव्हाण यांना सतावणारी होती. शिक्षणाबरोबर सामाजिक कार्य त्यांनी केले आहे. त्या कामासाठी त्यांना अनेक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत. आदर्श शिक्षक म्हणून त्यांचे समाजात नाव आहे. ही गंभीर समस्या फक्त एका गोविंदापूर्ती मर्यादित असते असे नाही तर ती कुटुंबाबरोबर पथकाच्या निमित्ताने उत्सवात सहभागी झालेल्या प्रत्येक युवकाची आणि त्यांच्या कुटुंबाची असते. वेळेस जनजागृती झाली नाही तर अशा अनेक कुटुंबांना सामोरे जावे लागणार आहे. या हेतूने त्यांनी 'थर' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. त्यासाठी स्वतः चव्हाण यांनी तिहेरी बाजू सांभाळलेली आहे. अभिनेता, निर्मिता आणि गीतकार अशा जबाबदारीत ते या चित्रपटात पाहायला मिळणार आहेत. ते स्वतः व्याकुळ होतील आणि हातबल होतील अशी गोष्ट त्यांच्या बाबतीत घडली आहे.

# पालिकेचे नवीन होर्डिंग धोरण तयार; हरकती व सूचना पाठवण्याचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

घाटकोपर होर्डिंगच्या घटनेनंतर महापालिकेने मुंबईसाठी नवीन होर्डिंग धोरण तयार केले आहे. नवीन होर्डिंग धोरणात नागरिकांची सुरक्षा, होर्डिंगची मजबुती आणि वाहनचालकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी विशेष काळजी घेण्यात आली आहे. नवीन धोरणात काळ्या यादीत टाकलेल्या कंपन्या, संचालक आणि मालक होर्डिंग परवान्यासाठी अर्ज करू शकणार नाहीत, अशी नियमावली तयार केली आहे.

घाटकोपर येथे झालेल्या भीषण होडिंग दुर्घटनेनंतर मुंबई महापालिकेने नव्याने जाहिरात होर्डिंग धोरण तयार करण्याचा निर्णय घेतला होता. त्याचा मसुदा धोरण महापालिकेने तयार केला आहे. यामध्ये डिजिटलपासून सर्व प्रकारच्या जाहिरात होर्डिंगचा समावेश केला आहे. जाहिरात होर्डिंग प्रदर्शित करण्यासाठी हे धोरण असून यामध्ये नियमावली तयार करण्यात आली आहे.

दुभाजक, फूटपाथ, इमारतीच्या गच्चीवर, संरक्षक भिंत आदी ठिकाणी विविध प्रकारच्या जाहिरात होर्डिंगलाधोरणात मनाई करण्यात आली आहे. हे जाहिरात धोरण प्रसिद्ध केले जाणार असून १५ दिवसांत हरकती व सूचना मागवण्यात येणार आहेत. २६ ऑगस्टपर्यंत हरकती व सूचना नोंदवता येणार असल्याची माहिती मुंबई महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. यामध्ये डिजिटल होडिंगचाही समावेश केला आहे. मुंबई महापालिकेचे होर्डिंग धोरण २००८ मध्ये लागू झाले होते. त्यात आजपर्यंत सुधारणा झालेली नाही. न्यायालयानेही महापालिकेला नवीन धोरण तयार करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर प्रशासनाने २०१७ मध्ये नवीन धोरण तयार करण्याची तयारी सुरू केली होती. हे धोरण राज्य सरकारच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आले होते, राज्य सरकारने काही बदल करावयास सांगून ते पुन्हा महापालिकेकडे पाठवले. करोनाकाळात ही प्रक्रिया रखडली होती.आता सर्व प्रकारच्या होर्डिंगसाठी धोरण तयार करण्यात आले असून काही अटी, निबंध लागू करण्यात आले आहेत.

घाटकोपर दुर्घटनेनंतर महापालिकेने होर्डिंग धोरण तयार करण्यासाठी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये सहपोलिस आयुक्त (वाहतूक), महानगरपालिकेचे उपआयुक्त (विशेष), अनुज्ञापन अधीक्षक, पर्यावरणविषयक नामांकित तज्ज्ञ संस्थेचे एक प्रतिनिधी, आयआयटी मुंबईचे दोन तज्ज्ञ सदस्य, आयआयटी मुंबईच्या औद्योगिक सरखन विभागाचे एक तज्ज्ञ प्रतिनिधी यांचा समावेश आहे. या समितीकडून सूचना करण्यात आल्या असून त्याचा या धोरणत समावेश करण्यात आला आहे. होर्डिंगचा जास्तीत जास्त आकार हा ४० फूट लांबी रुंदी इतका असावा. त्यापेक्षा जास्त आकाराच्या होर्डिंगला परवानगी मिळणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. रस्त्यांच्या वरील कमानी, रस्ते दुभाजक, पदपथ, वाहतूक बेट, उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांखाली जाहिराती लावता येणार नसल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. इमारतीच्या गच्चीवरही जाहिरात होर्डिंग लावण्यास मनाई करण्यात आली असून काचेच्या तावदानावर जाहिरात फलक लावताना ५० टक्क्यांपेक्षा जास्त भाग व्यापला जाऊ नये, असेही नमूद केले आहे.

***हरकती, सूचना ऑनलाइनही पाठवणे शक्य***

*या नवीन धोरणावर मुंबईकरांकडून हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत. लेखी हरकती व सूचना मुंबई महापालिका मुख्यालयात तळमजल्यावरील उपायुक्त विशेष यांच्या कार्यालयात द्याव्या किंवा दादर पश्चिमेकडील सेनापती बापट मार्गावरील सिवरेज ऑपरेशन इमारतीतील परवाना अधीक्षकांच्या कार्यालयात द्याव्यात असे आवाहन केले आहे. तसेच sl.licence@ mcgm.gov.in किंवा hc01. licence@mcgm. gov.in या ई-मेलवर हरकती व सूचना पाठवू शकता येतील.*

# नैसर्गिक आपत्तीबाधितांना यंदा निकषाच्या दुपटीने मदत

प्रतिनिधी
■ मुंबई

आगामी विधानसभा निवडणुका डोळयासमोर ठेवून राज्यातील सर्व समाजघटकांना खूश करताना यंदा अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधितांना राज्य आपत्ती प्रतिसाद मदतीच्या दुपटीने मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याचा लाभ लाखो कटुंबांना होणार आहे.

केंद्राच्या नैसर्गिक आपत्ती निकषांच्या धर्तीवर राज्यातही नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार कोणतीही नैसर्गिक आपत्ती आल्यास बाधितांना या निधीच्या माध्यमातून मदत केली जाते.

या मदतीमधील ७५ टक्के वाटा केंद्राचा, तर २५ टक्के भार राज्य सरकारवर असतो. केंद्र सरकारने गेल्या वर्षी नैसर्गिक आपत्तीमधील बाधितांना देण्यात येणाऱ्या मदतीत-नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीच्या मदतीत (२०२२-२३ ते २०२५-२६) या कालावधीसाठी भरीव वाढ केली आहे. त्यानुसार भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, हिमवर्षाव, ढगफुटी, टोळधाड,



थंडीची लाट, यामुळे होणाऱ्या नुकसानीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद मदतनिधीतून बाधितांना मदत मिळते, तर राज्यात केंद्राच्या निकषाशिवाय वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग, अवेळी पाऊस, अतिवृष्टी यासाठीही राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून आर्थिक मदत केली जाते.

राज्यातील महायुती सरकारने २७ मार्च २०२३ रोजी केंद्राच्या धोरणाप्रमाणेच राज्यातही आपत्तीबाधितांना मदत देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र यंदा राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन २७ मार्च २०२३चा निर्णय शिथिल करीत राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या सध्याच्या मदतीपेक्षा दुपटीने मदत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन विभागातील सूत्रांनी दिली.

# दिल्लीच्या अहमदशाह अब्दालीकडून प्रमुख नेत्यांना सुपाऱ्या; महाराष्ट्रात गोंधळ घालण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी
■ मुंबई

दिल्लीच्या अहमदशाह अब्दालीने महाराष्ट्रात गोंधळ घालण्यासाठी काही प्रमुख नेत्यांना सुपारी दिली आहे, असे म्हणत ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्यावर हल्ला केला आहे. तसेच काल अंधाराच्या आडून कृत्य करण्यात आले ते लोक समोर आले असते तर शिवसैनिक काय आहे हे दिसले असते. सुपाऱ्या देऊन मराठी माणसांत मारामारी लावण्याचे काम सुरू आहे असा गंभीर आरोप राऊतांनी केला आहे.

यावेळी ठाण्यात ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या गाडीवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी संजय राऊत यांनी अमित शहा यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. "ते कार्यकर्ते मनसेचे नव्हे तर दिल्लीच्या अहमदशाह अब्दालीकडून सुपारी घेतलेले लोकं होते. अब्दालीकडून महाराष्ट्रात गोंधळ घालण्यासाठी सुपारी दिली जात होती. बीडमध्ये राज ठाकरेंच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्याचा आमच्याशी संबंध नाही हे आम्ही पूर्वीच स्पष्ट केले.



महाराष्ट्रात सध्या मराठा आंदोलन सुरू आहे. त्यामुळे स्थानिक लोकांनी एकत्र येत निषेध व्यक्त केला असेल", असे राऊत म्हणाले.

पुढे ते म्हणाले की, ठाण्यात घडलेला प्रकार पाहता त्या लोकांना माझी विनंती आहे. काळोखाचा फायदा घेत काही फेकले असेल तर तुम्ही वाचलात. मात्र जर तुमची मर्दांची औलाद असता तर समोर येऊन हल्ले केले असते. अंधाराच्या आड पुन्हा असे कृत्य करू नका. तुमच्या घरात तुमचे आई, वडील, मुले- बाळे वाट पाहत असतील. महाराष्ट्रात हे हल्ले करण्यासाठी सुपाऱ्या देऊन अहमदशाह अब्दाली मजा पाहतोय", असे संजय राऊत म्हणाले.

तसेच संजय राऊत यांनी यावेळी गंभीर आरोप केला आहे. महाराष्ट्रात गोंधळ निर्माण करण्यासाठी तीन मोठ्या नेत्यांना सुपारी देण्यात आली आहे. हे देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्र्यांना माहित आहे. २ महिने थांबा मग कळेल. सत्तेची मस्ती दाखवू नका. मराठी माणसात मारामारी लावण्याचे काम सुरू आहे. काही कोटी रुपयांची सुपारी या प्रमुख नेत्यांना देण्यात आली आहे", असे राऊत म्हणाले.

***आम्हाला फरक पडत नाही***

*तसेच भगव्या सप्ताहासाचा समारोप ठाण्यात शेकडो शिवसैनिकांच्या उपस्थितीत जल्लोषात पार पडला. उद्धव ठाकरे यांचे जागोजागी स्वागत झाले. व्यासपीठावर ठाकरेंनी मार्गदर्शन केले. ज्या पद्धतीने साजरा व्हायला पाहिजे होता तसा तो साजरा झाला. ठाण्यातील वातावरण बदलत आहे. याला दृष्ट लावण्यासाठी सुपारी घेतलेले काही लोकं असे कृत्य करत असतात. आम्हाला फरक पडत नाही", असे राऊत म्हणाले.*

# स्वातंत्र्यदिनी कर्मवीर दादासाहेब गायकवाड केंद्रात स्नेह संमेलन, आ. अनिल परब यांचा सत्कार

प्रतिनिधी
■ मुंबई

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्र, मुंबई च्या वतीने ७७ वा स्वांतत्र दिन सोहळया निमित्त १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता कर्मवीर क्रीडा संकुल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी भवन शेजारी आर. टी. ओ. कॉर्नर, चार बंगला, अंधेरी (प.) येथे स्नेह संमेलन व सुप्रसिध्द गायक, गीतकार व संगीतकार विष्णू शिन्दे यांची संगीतमय मैफिलीचे आयोजन केले आहे.

संस्थेचे अध्यक्ष विजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमात आमदार अँड. अनिल परब, यांची मुंबई पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात येणार आहे. असे सरचिटणीस चंद्रकांत बच्छाव यांनी कळविले आहे.

**पश्चिम रेल्वे**

सेवा आणि निवासी इमारतींचे बाह्य आणि अंतर्गत रंगकाम. पश्चिम रेल्वे व्यवस्थापक (डबल्यूए), पश्चिम रेल्वे, ६ वां मजला, अभि विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४०००0८ ई निविदा सूचना क्र. बीसीटी/२४-२५/१३० दि. ०८/०८/२०२४ काम आणि ठिकाण: मुंबई सेंट्रल (मेन) - सेवा आणि निवासी इमारतींचे बाह्य आणि अंतर्गत रंगकाम. कामाचे अंदाजे मूल्य: रू. १४७७९२१४.७७ इरठे: रू. २२३९६०.०० सादरीकरण दिनांक आणि वेळ: ०३.०९.२०२४ रोजी १५.०० बा. उघडण्याचा दिनांक आणि वेळ: ०३.०९.२०२४ रोजी १५.३० व. अधिक तपशिलासाठी www. ireps.gov.in ला कृपया भेट द्या. प्रत्यक्ष आलेले प्रस्ताव विचारत घेतले जाणार नाहीत. ०४४०

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील "पुर व आपत्ती नियंत्रण" या लेखाशिर्षका अंतर्गत लोकमान्य – सावरकरनगर प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. १३ मधील मा. मुख्यमंत्री महोदय सो. यांच्या निवासस्थाना बाहेर वेदर शेड बांधणे या कामाकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा प्रक्रियेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:// mahatenders.gov.in वर दि. १२.०८.२०२४ ते दि. २०.०८.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि.२०.०८.२०२४ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यांत येतील. सदर निविदा दि. २१.०८.२०२४ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघड्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-लो.सा प्र.स/२६२/२०२४-२५ सही/-
दि:०९.०८.२०२४ कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in

जर बरीच कामे सार्वजनिक निकषांची पूर्तता करत असतील तर ती कामे प्राधान्याने केलीच पाहिजे.



- रतन टाटा

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, १२ ऑगस्ट २०२४

# सामाजिक जबाबदारी सर्वांची

जगातील कोणतेही संकट असो, नैसर्गिक अथवा मानवनिर्मित असो, सगळ्यात जास्त बाधित होतात त्या महिला आणि लहान मुले. युद्धासारख्या घटनेतही महिला आणि लहान मुलांना जास्त संकटांचा सामना करावा लागतो. दंगली सारख्या घटनेत सुद्धा हेच दोघे बळी पडण्याचे प्रमाण जास्त असते. लैंगिक अत्याचराला देखील पीडित असतात. महिलांवरील विशेषतः लहान मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने हा एक सामाजिक चिंतेचा विषय बनलेला आहे. पौगंडावस्थेतील मुलींवर अत्याचाराच्या घटना जगभरात सगळीकडे दिसून येत आहेत. एका अहवालानुसार आशिया खंडामध्ये हे प्रमाण तब्बल ४७ टक्के आणि मध्य आफ्रिकेत हे प्रमाण ४० टक्के आहे. युरोपमध्ये हे प्रमाण सर्वात कमी १० टक्के आहे. काही देशांमध्ये पौगंडावस्थेतील मुलींपैकी ४९ टक्के मुली अत्याचाराच्या शिकार बनत आहेत, तर काही देशांमध्ये हे प्रमाण ६ टक्क्यांपर्यंत कमी आहे. जोडीदाराकडून मुलीवर अत्याचार होण्याचे सर्वाधिक प्रमाण पापुआ न्यू गिनीमध्ये असून, ते ४९ टक्के आहे. भारतात हे प्रमाण २५ ते ३४ टक्के असून, हा आकडा चिंता वाढविणारा आहे. २०१२ साली झालेल्या निर्भया प्रकरणानंतर भारतात होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटना आणि त्याची चौकशी याकडे सगळ्यांचे लक्ष आकर्षित झाले. प्रसारमाध्यमांचा वाढता प्रसार, मोबाइल फोन्सची व्यापकता हे मोठे कारण अत्याचार वाढण्यामागे असण्याची शक्यता अनेक तज्ज्ञ व्यक्त करतात. देशात अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यातही गेल्या वर्षभरात राज्यात अल्पवयीन मुलांवरील अत्याचाराच्या घटनांत सर्वाधिक वाढ झाली आहे. देशभरात अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याचे १ लाख ६२ हजार ४४९ गुन्हे दाखल आहेत. अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार आणि अन्य अत्याचाराच्या घटनांमध्ये देशभरात महाराष्ट्र मागील वर्षी पहिल्या स्थानावर होता. मुले म्हणजे देवाघरची फुले या उक्तीला लाजिरवाणी अपकृत्ये जेव्हा भोवतालच्या समाजात घडून येताना आढळतात तेव्हा मुलांचे बालपण त्यांच्यापासून हिरावून घेणाऱ्या, त्यांना कुस्करणाऱ्या कुप्रवृत्तींचा सार्वत्रिक निषेध केला पाहिजे. परंतु कौटुंबिक किंवा सामाजिक पातळीवर हे विषय उघडपणे मांडणे हेही अनेकदा निषिद्ध मानले जाते. अतिशय गंभीर अशा ह्या विषयावर घरात किंवा घराबाहेरही चर्चा, विचार करण्यास लोक अनुत्सुक दिसतात. माझा काय संबंध, या प्रवृत्तीपासून ते असले विषय दूर राहिलेलेच बरे इथपर्यंत असलेली सामाजिक उदासीनता कायदा व सुव्यवस्थेला आणि समाजाला घातकच ठरते. मात्र त्यामुळे वस्तुस्थिती लपत वा बदलत नाही तर अधिकच बिकट होत जाते. पौगंडावस्थेतील दर सहापैकी एका मुलीवर जोडीदाराकडूनच गेल्या वर्षी अत्याचार होत असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले असल्याने याकडे जागरूकतेने पाहाणे गरजेचे आहे. धक्कादायक बाब म्हणजे नातेसंबंधात असलेल्या पौगंडावस्थेतील मुलींपैकी सुमारे २४ टक्के म्हणजेच १ कोटी ९० लाख जणी शारीरिक अथवा लैंगिक अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. विशेष म्हणजे या मुली २० वर्षांच्या होईपर्यंत त्यांच्या जोडीदाराकडून अत्याचार होण्याचे प्रमाण अधिक असल्याची बाब या अहवालात स्पष्ट करण्यात आली असल्याने त्याचा सामाजिक पातळीवर विचार होणे अपेक्षित आहे. देशभरात दररोज सरासरी २९३ अल्पवयीन मुले किंवा मुली लैंगिक अत्याचारांना बळी पडतात. ही पोलिसांमध्ये तक्रार दाखल झाल्यानंतरची आकडेवारी आहे. ती खरी किती असेल याचा अंदाजच केलेला बरा. या अत्याचार होणाऱ्या बालकांपैकी अनेकांना त्यांनी पुढे तोंड उघडू नये यासाठी मारूनच टाकले जाते. याचे कारण अशा अत्याचारांमध्ये बहुतेकदा आरोपी हे परिचयाचे किंवा अगदी नात्यातीलही असतात. सूड किंवा बदला घेण्यासाठी लहान मुलामुलींवर अत्याचार होण्याचे प्रमाण देशभर वाढत असून, एकूण गुन्ह्यांतील जवळपास दहा टक्के गुन्हे असे असतात. याचा अर्थ मोठ्या माणसांच्या भांडणांची किंवा वैराची किंमत निष्पाप मुले चुकवत असतात. गेल्या काही वर्षांत मुलांवरील अत्याचारांच्या विरोधातले कायदे कडक झाले आहेत. अनेकदा राज्य सरकारे अशा खटल्यांसाठी शीघ्रगती न्यायालयेही नेमतात. एक सामाजिक संकट किंवा लहान मुलामुलींची समाजावर असणारी सामूहिक जबाबदारी या अंगाने देशभरात गंभीर प्रयत्न होताना दिसत नाहीत. देशाच्या प्रगतीची किंवा समृद्धीची चित्रे रंगवताना राज्यकर्ते व नोकरशहा रंगून जातात. पण भारतातील सामाजिक जीवन अल्पवयीन बालकांसाठी किती अंगांनी असुरक्षित व भयकारी बनले आहे, यावर गंभीर चर्चा होत नाही. जगभरात बालविवाहाची समस्या मोठी आहे. जगातील दर पाचपैकी एका मुलीचा बालविवाह होतो. बालविवाहामुळे या मुलींचे शिक्षण पूर्ण होत नाही. याचबरोबर जोडीदाराच्या अत्याचाराला बळी पडण्याचे त्यांचे प्रमाण अधिक आहे. आतापर्यंत एकाही देशाने २०३० पर्यंत महिलांविरोधातील अत्याचार संपविण्याच्या दिशेने पावले टाकलेली नाहीत, असेही अहवालात स्पष्ट करण्यात आले असल्याने ही बाब विचार करण्यास लावणारी आहे. उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये जोडीदाराकडून मुलींवर अत्याचार होण्याचे प्रमाण कमी आहे. अल्प उत्पन्न असलेल्या देशांमध्ये हे प्रमाण अधिक आहे. माध्यमिक शाळांमध्ये मुली जाण्याचे प्रमाण जास्त असलेल्या देशांत मुलींवरील अत्याचाराचे प्रमाण कमी असून, या देशांमध्ये लिंग समानतेची पातळीही चांगली आहे. वारसा कायदे मुलींना प्राधान्य देणारे असतील अशा देशांचाही यात समावेश आहे. अत्याचाराचे प्रमाण सर्वात कमी जॉर्जियामध्ये असून, ते ६ टक्के आहे. जगभरात १५ ते ४९ वर्षे या वयोगटातील २७ टक्के युवतींना व स्त्रियांना आयुष्यात एकदा तरी जोडीदाराकडून शारीरिक अथवा लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागते. गेल्या वर्षी १३ टक्के स्त्रियांवर असे अत्याचार झाले आहेत. त्यात पौगंडावस्थेतील मुलींवर जोडीदाराकडून अत्याचार झाल्याने त्याचे विपरीत परिणाम त्यांच्या आयुष्यावर होत आहेत. अत्याचारामुळे मुलींना दुखापत, नैराश्य, मनोविकार, अनियोजित गर्भधारणा, गुप्तरोग यासह इतर अनेक शारीरिक आणि मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे ही समस्या संपविण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. या समस्येमुळे केवळ मुलीच नव्हे तर त्यांचे कुटुंब आणि पर्यायाने समाजावर परिणाम होत आहे. जोडीदारांकडून पौगंडावस्थेतील मुलींवर अत्याचार होण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. अशा मुलींची संख्या काही कोटींच्या घरात आहे. आयुष्याच्या जडणघडणीच्या टप्प्यावरील महत्त्वाच्या वर्षांमध्ये अशा प्रकारच्या अत्याचारामुळे या मुलींच्या आयुष्यावर गंभीर परिणाम होत आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून याकडे पाहायला हवे. या अत्याचाराला प्रतिबंध आणि मुलींना मदत या गोष्टींवर भर देणे आवश्यक आहे. मूळ मुद्दा बालविवाह हा असून, त्याला वेळीच प्रतिबंध केल्यास या समस्येची तीव्रता कमी होण्यास मदत होईल. याबरोबर मुलींना माध्यमिक शिक्षण, मालमत्तेत समान अधिकार, लिंग समानता याची तातडीने अंमलबजावणी झाली पाहिजे. केवळ कायदे करून चालणार नाही तर त्यांची कडक अंमलबजावणी करण्याबरोबरच सामाजिक पातळीवर जनजागृती करणे ही काळाची गरज आहे अन्यथा अशा कित्येक कळ्या उमलण्याआधी नष्ट होतील. त्यांना वाचविणे आपली सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे. त्या जबाबदारी पासून आपल्याला दूर जाता येणार नाही. कारण हे आपले प्रमुख कर्तव्य आणि जबाबदारी आहे.

# मुंबईतील सार्वजनिक परिवहन सेवा टिकवा...



## महापालिकायन

सुनील शिंदे

मोबाईल नंबर–९८२१९९६११७

ऑक्टोंबर महिन्यात विधानसभा निवडणूक होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. पण ही तयारी करतानाच माजी गृह मंत्री अनिल देशमुख व देवेंद्र फडणवीस यांच्यातील बदनामी नाट्य अधिक गडद होत आहे. उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे, अनिल परब आणि अजितदादा पवार यांना खोट्या केस मध्ये अडकवण्याचे मनसुबे रचणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनसुबे उघड झाल्याने व महाराष्ट्रातील जनतेला आपली कपटनिती कळल्याने दुखावलेले फडणवीस सुड भावनेने पेटलेले दिसत आहेत. आधी सचिन वाजे आणि आता मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांच्याकडून मुलाखती व पत्राद्वारे अनिल देशमुख यांची बदनामी करण्याचे षड्यंत्र रचण्यात व्यस्त झाले आहेत. हो.अन्यथा या दोघांचा गळा आताच इतका दाटून आला नसता. तर दुसरीकडे उध्दव व राज ठाकरे यांचे कार्यकर्ते थेट एकमेकांना भिडायला लागले आहेत.

मराठीचा मराठी माणसाचा कैवार घेणारेच आपापसात भिडत असल्याचे पाहून अमराठी माणसं गंमत पाहत असतात. व याचा फायदा तिसरेच पक्ष घेत असतात. हे सर्व सामान्य माणसांना कळते.पण पण या नेत्यांना काळात नाही असे म्हणायचे का? या सर्व घडामोडी पाहताना महाराष्ट्रातील राजकारणाचा स्तर आणखी पुढे किती खाली येणार आहे. याचा अंदाज येऊ लागला आहे. कुणी कुणाची भिडभाड न ठेवता कुणी काहीही बोलत सुटले आहेत.राजकारणात टीका टीपणी होत असते. पण ती नैतिकतेला धरून असायला हवी. पण इथे नैतिकतेला फाट्यावर मारून अगदी खालच्या स्तरातील नेतेही विरोधकांना वाटेल ते बोलत असतात. तुमची ही शेरेबाजी लोक निमूटपणे ऐकून घेतात. त्यांची यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत नाही यांचा अर्थ त्यांना तुमची ही शेरेबाजी पटते आहे. असा गोड गैरसमज हे नेते करून घेत असावेत असे वाटते. पण त्यांच्या गोड गैरसमजाला ऑक्टोंबर महिन्यात पुन्हा एकदा उत्तर मिळणार आहे. आता तर गणेशोत्सव, नवरात्रोत्सव हे मोठे सण येत आहेत.आणि त्यानंतरच विधानसभा निवडणूक होणार आहे. या सणाच्या निमित्ताने विविध राजकीय पक्ष विविध मंडळांना खुश करतील. निवडणुकीसाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांचा वापर करून घेण्याचा प्रयत्न राजकारणी नेत्यांकडून होईल. पण महाराष्ट्रातील राजकारण सत्तेच्या हव्यासापोटी कुठल्या स्तरावर पोहचले आहे. याचा विचार प्रत्येक जण करीत आहे. त्यामुळे या सणामध्ये राजकीय पक्षांच्या नेत्यांना गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांचे मन वळवण्यास किती यश येते हे पाहण्यासारखे असेल.

### आगमन गणरायाचे

पुढच्या महिन्यात ७ तारखेपासून गणेशोत्सवाला सुरुवात होणार असली तरी मुंबईतील १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळापैकी काही मंडळांनी मंडप उभारणीला आता पासूनच सुरुवात केली आहे. व त्यांनी गणरायाच्या मूर्तीला आधीच विराजमान करण्यास सुरुवात केली आहे. पण गणपतीचे आगमन होताना रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे विघ्न येत आहे. ही बाब काही नवीन नाही. आगमन आणि विसर्जन मिरवणूक मार्गावरील रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य दरवर्षी पसरलेले असते. ऐन पावसाळ्यात गणेशोत्सवाला सुरुवात होते. आणि पावसाळ्यातच रस्त्यावर खड्डे पडतात. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईकरांना खड्डेमुक्त रस्ते देण्यासाठी मुंबई महापालिकेला सिमेंट काँक्रिट च्या रस्त्यांचा पर्याय सुचवला आहे. पण त्यातही विघ्ने आली त्यामुळे पहिल्या लॉट मध्ये ५ कंत्राटदारांना देण्यात आलेली ३९८ रस्त्यांची कामे, ६ हजार ६८ कोटी रुपयांना देऊनही दिड वर्षानंतरही ही कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. शहर भागातील कंत्राटदाराने तर कामालाच सुरुवात न केल्याने पालिका प्रशासनाने त्याचे कंत्राट रद्द केले होते. कंत्राटदाराने मग कांगावा करत न्यायालयात धाव घेतली. त्यात वर्ष निघून गेले. आता हे न्यायालयीन प्रकरण संपल्यानंतर पालिकेने शहर भागासाठी नव्याने निविदा काढल्या पण त्या चढ्या दराने आल्या आहेत. पालिकेला ९ कोटी रुपये अधिक मोजावे लागत आहे. हे अधिक पैसे कंत्राटदारांना देण्यास माजी नगरसेवकांनी विरोध आहे. त्यामुळे कंत्राट देण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. म्हणून दरवर्षी प्रमाणे या वर्षीही डांबरी रस्त्यावर पडलेल्या खड्डेमय रस्त्यावरूनच गणरायाला यावे लागत आहे. यातून मार्ग काढणे म्हणजे युद्धपातळीवर खड्डे बुजविणे होय पण तेव्हढी तत्परता दाखवणार कोण? दरवर्षी पडणारे हे खड्डे बुजविण्यासाठी कोट्यवधी चा खर्च पालिका दरवषी करते. हे पैसे अक्कल खाती जमा होत असतात. पण याचे सोयरसुतक पालिका प्रशासनाला कधीच नसते. हा पैसा लोकांचा आहे. तो लोकांवर खर्च व्हायला हवा. पण तो खड्ड्यात जात आहे. हे कुणी लक्षात घेत नाही. याला कारण पालिकेत फोफावलेला भ्रष्टाचार आहे. म्हणून कंत्राटदारांकडून रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची केली जातात. व नंतर त्यावर तो रस्ता डांबरी असेल तर खड्डे पडतात व सिमेंट काँक्रिट चे असल्यास त्याला भेगा पडतात. याचा अनुभव पालिका प्रशासनाने घेतला आहे.आरे वसाहतीतील मुख्य रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरण केले जात आहे. या काँक्रिटीकरण कामात गुणवत्ता राखली गेली नसल्याचे अतिरिक्त आयुक्तांना प्रत्यक्ष पाहणीत दिसले.म्हणून अतिरिक्त आयुक्तांनी गुणवत्ता न राखणाऱ्या कंत्राटदार, गुणवत्ता देखरेख संस्था यांच्यावर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

तसेच कामात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अभियंत्यांना लेखी सक्त ताकीद दिली आहे. कंत्राटदारावर दंडात्मक कारवाईबरोबरच त्याने स्वखर्चाने काँक्रिट रस्त्याचा बाधित भाग पुन्हा नव्याने तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. एवढेच नव्हे तर, रस्तेकामात पुन्हा त्रुटी राहिल्यास दुप्पट दंड आकारण्याचा तसेच, तिसऱ्यांदा त्रुटी केल्यास काळ्या यादीत टाकण्याचा इशारा महानगरपालिकेला द्यावा लागला आहे. निविदेतील अटी - शर्तीनुसार गुणवत्ता देखरेख संस्थेने, कंत्राटदाराकडून गुणवत्तापूर्ण कामे करवून घ्यावीत, अन्यथा कारवाईला सामोरे जावे, असेही बजाविण्यात आले आहे. काँक्रिटीकरण कामात कोणत्याही उणीवा राहणार नाहीत, यासाठी अधिक दक्ष, सजग राहावे, अशी ताकीद संबंधित अभियंत्यांना द्यावी लागली आहे. आता पुन्हा ४०० की मी लांबीच्या रस्त्याची कामे सिमेंट काँक्रिटची करण्यासंदर्भात निविदा प्रक्रिया पार पाडली जात आहे. कालांतराने मुंबईत जे काही दोन अडीच हजार किलोमीटरचे रस्ते आहेत ते सर्व सिमेंट काँक्रीटचे होतील. पण त्याच्या दर्जा बद्दलची खात्री आताच कुणालाही देता येईल. या सिमेंट काँक्रिट रस्त्याचे आयुष्य २५ वर्षांचे असते त्या आधीच जर त्यांची वाताहत झाली तर मात्र कोट्यवधी रुपये खर्च करूनही डांबरी रस्तेच बरे होते. असे म्हणण्याची वेळ येणार तर नाही ना? म्हणून इथें प्रमाणिक अधिकाऱ्यांची गरज आहे.

### बेस्ट उपक्रमाची वाताहत

मुंबईतील ज्या रस्त्यावरून बेस्ट उपक्रमाची बस धावत असते त्या उपक्रमाची अवस्था या रस्त्यासारखी झाली आहे. रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची होत असल्यामुळे रस्त्यावर जागोजागी खड्डे पडत असतात. त्याचा परिणाम अपघात होऊन नाहक जीव जाण्यात होतो. बेस्ट उपक्रमाची वाटचाल सुद्धा जीव जाण्याकडे सुरू आहे. याची अनेक कारणे समोर दिसत आहेत. त्यामुळेच बेस्ट वाचविण्यासाठी कामगार संघटना, सामाजिक संस्था पुढे आल्या आहेत. राज्य सरकारने बसेस घेण्यासाठी २३२ कोटी आणि कामगार कर्मचाऱ्यांना कोविड भत्ता देण्यासाठी ७६ कोटी रुपये देण्याचे जाहीर केले आहे. बेस्ट च्या वीज विभागातील नैमत्तिक कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी करण्याबाबतची पत्रे वितरण समारंभ नुकताच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला त्या वेळी फडणवीस यांनी हा निधी देण्याची घोषणा केली होती.हा निधी सरकारने बेस्ट ला अद्याप दिला नसल्याची माहिती मिळते. पण इतका तुटपुंजा निधी देऊन बेस्ट पुन्हा उभारी घेईल असे वाटत नाही. नुकत्याच संपलेल्या विधानसभेच्या अधिवेशनात विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी बेस्टला १० हजार कोटी रुपयांचे अनुदान पालिका व सरकार यांच्याकडून मिळायला हवे अशी मागणी केली होती. या मागणीचा विचार झाला पाहिजे. बेस्ट उपक्रम व रेल्वे सेवा या सरकारी परिवहन सेवा कायम स्वरुपी राहायला हव्यात. त्याचे खाजगीकरण कधी होऊ नये. या सार्वजनिक परिवहन सेवा आज सरकारकडे आहेत म्हणून आज देशाच्या विविध राज्यातून आलेला व कंत्राटदाराकडे तुटपुंज्या वेतनावर काम करणारा श्रमिक, कष्टकरी, होतावर पोट भरत असलेला माणूस आपला घर प्रपंच सांभाळत आहे. यदा कदाचित बेस्ट व रेल्वेचे खाजगीकरण झाले तर हा श्रमिक कष्टकरी, हातावर पोट असलेला कामगार मुंबईत राहू शकणार नाही. त्याला दिवसाला कामाच्या ठिकाणी जायला १०० रुपये व घरी यायला १०० असे दिवसाला २०० रुपये व महिन्यातील ३० दिवसाला ६ हजार रुपये खर्च झाला तर तो घरखर्च कसा करणार? याचा विचार करूनच हे दोन्ही उपक्रम सरकार कडेच कसे राहतील याचा विचार करण्याची नितांत गरज आहे. आज बेस्ट मधील स्वतः च्या मालकीच्या असलेल्या बसेस ची दिवसेंदिवस कमी होत चाललेली संख्या व भाडेतत्त्वावरील वाढती संख्या रोखण्यासाठी बेस्टला अनुदान स्वरूपात १० हजार कोटी रुपयांची आर्थिक मदत केंद्र वा राज्य सरकारने द्यायला हवी. तरच बेस्ट चा गाडा चार चाकावर व्यवस्थित चालू शकेल. यासंदर्भात "आमची बेस्ट आमची मुंबई " या सामाजिक संस्थेच्या मान्यवरांनी केलेल्या मागण्या.योग्य वाटतात.

सार्वजनिक वाहतुकीचे प्रमाण सुधारणे हे पर्यावरणीयदृष्ट्या योग्य आहे. बसेसची संख्या २००० लोकसंख्येमागे किमान १ बस पर्यंत वाढवा (किमान ६००० बसेस.) लोकांना खाजगी वाहतुकीपासून परावृत्त करून सार्वजनिक वाहतुक वापरण्यास प्रोत्साहित करा. सर्व सामान्य लोकांना वेळेवर प्रवास करण्याचा अधिकार आहे. बेस्ट बसेसना मुख्य रस्त्यांवर वेगळ्या स्वतंत्र मार्गिका द्या,सार्वजनिक जमीन ही जनतेची आहे, बिल्डरांची नाही. बेस्ट डेपोंचा पुनर्विकास थांबवा., परवडणारी सार्वजनिक वाहतूक हा आमचा मूलभूत अधिकार आहे. महापालिका अर्थसंकल्पाचा भाग म्हणून बेस्टला सबसिडी द्या आणि बेस्ट चालवा.,सार्वजनिक वाहतूक ही अत्यावश्यक सेवा आहे, व्यवसाय नाही, कंत्राटदारांनी चालवलेल्या बसेस बंद करा, बेस्टचा ताफा पूर्णपणे सार्वजनिक (बेस्टच्या मालकीचा) करा., सार्वत्रिक वाहतुक व्यवस्था उपलब्ध असणे, वाहतूक नियोजनाचे प्राथमिक उद्दिष्ट असले पाहिजे. बंद केलेले सर्व बस मार्ग पुन्हा सुरू करा. अशा मागण्या त्यांनी एका पत्रकार परिषदेत केल्या. या मागण्या रास्त वाटतात.

## पत्र मानस

### टायमिंगचा बादशहा हरपला...

उत्तम विनोदी अभिनेता म्हणून नावारूपाला आल्यानंतरही विजय कदम यांनी रंगभूमीची कास सोडली नाही. ‘खंडोबाचं लगीन’सारखं लोकनाट्य, ‘विच्छा माझी पुरी करा’ हे वगनाट्य आणि ‘खुमखुमी’ हा त्यांच्या स्वत:च्या कल्पनेतून आकाराला आलेला एकपात्री प्रयोग या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती ठरल्या. ‘विच्छा माझी पुरी करा’ या नाटकाचे प्रयोग त्यांनी परदेशातही केले. त्यांच्या ‘विजयश्री’ या नाट्य संस्थेतर्फे ‘विच्छा माझी पुरी करा’ या नाटकाचे त्यांनी देश-विदेशात लंडन, अमेरिका ते दुबई, कतार, सिंगापूरसारख्या देशांमध्येही ७५० हून अधिक प्रयोग केले. त्यांच्या ‘खुमखुमी’ या एकपात्री प्रयोगालाही परदेशातील प्रतिसाद मिळाला. ‘टूरटूर’ नाटकाने त्यांना अमाप लोकप्रियता मिळवून दिली. ‘इरसाल कार्टी’, ‘दे दणादण’, ‘दे धडक बेधडक’, ‘हळद रुसली, कुंकू हसलं’, ‘राजानं वाजवला बाजा’, ‘गोळाबेरीज’, ‘वासुदेव बळवंत फडके’, ‘रेवती’, ‘देखणी बायको नाम्याची’, ‘कोकणस्थ’ अशा अनेक मराठी चित्रपटातून त्यांनी कधी विनोदी, कधी गंभीर प्रकृतीच्या भूमिकाही केल्या. पुढे हिंदीतही त्यांनी अनेक छोट्या – मोठ्या भूमिका केल्या. दूरचित्रवाहिनी माध्यमाचा प्रभाव जोरात असताना त्यांनी मराठीत ‘पार्टनर’, ‘गोट्या’, ‘दामिनी’, ‘इंद्रधनुष्य’, ‘घडलंय बिघडलंय’ सारख्या मराठी मालिकांमधून, तर ‘श्रीमान श्रीमती’, ‘मिसेस माधुरी दीक्षित’, ‘घर एक मंदिर’, ‘अफलातून’ अशा हिंदी मालिकांमध्येही भूमिका केल्या होत्या. ‘झी मराठी’ वाहिनीवर २०२१ साली प्रदर्शित झालेल्या ‘ती परत आलीये’ या मालिकेत साकारलेली बाबूराव तांडेल ही त्यांची भूमिका अखेरची ठरली आहे. अशा या चतुरस्त्र कलाकाराच्या निधनाने अख्खी नाट्य आणि सिनेसृष्टी पोरकी झाली आहे !

**- राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

### उपराष्ट्रपतींना पदावरुन हटवू नका

भारत देशाच्या शेजारील राष्ट्र बांगला देशात आजही राजकीय स्थिती अस्थिर आहे. बांगला देश हे एक मुस्लीम राष्ट्र आहे त्यामुळे तेथे लोकशाही नाही आणि भारतात लोक शाही असल्यामुळे राज्यघटनेनुसार देशाचा कारभार चालवावा लागतो. आपल्या देशाचे उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे सभापती म्हणजे अध्यक्ष असतात. नुकताच झालेल्या लोकसभेच्या निवडणूकीत मविआ यानी चांगली कामगिरी केली पण त्यांना सत्ता बनविण्यासाठी त्यांच्याजवळ पुरेसे संख्याबळ नव्हते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार तिसरांदा सत्तेवर आले. या दरम्यान विरोधकानी उपराष्ट्रपती पद विरोधकाना मिळायला पाहिजे असा देखील प्रयत्न केला होता पण त्याचा फारसा परिणाम झाला नाही. अलिकडेच अधिवेशनात चर्चा चालू असताना अभिनेत्री आणि खा.जया बच्चन यांचे संपूर्ण नाव म्हणजे खा. जया अमिताभ बच्चन असा उल्लेख सभापती महोदयानी केल्यापासून खा.जया बच्चन नाराज झाल्या होत्या आणि अधिवेशनात वादविवाद निर्माण झाल्यानंतर विरोधकानी आता एकत्र येऊन उपराष्ट्रपती म्हणजे राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यानाच हटवण्याचा विचार सुरू केला आहे जो सद्य स्थितीत पूर्णपणे चुकीचा वाटत आहे.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला,मुंबई**

### वाढवण विरोधकांची दिशाभूल

मच्छिमार बांधवाच्या जिवावर उठणारा वाढवण बंदराचा प्रश्न मार्गी लावण्याची तयारी महायुती सरकारने केली असल्याचे जाणवते.स्थानिकाचा विरोध जुगारुन सरकारने वाढवण बंदर पुर्ण करण्याचा प्रस्ताव विधानसभेत संमत केला.त्यानंतर मुख्यमंत्र्यानी आमदार जिल्हाधिकारी आणि संबधित प्रशासकीय अधिका-यांशी याविषयी चर्चा केली आणि मच्छिमाराच्या समस्यावर तोडगा काढण्याच्या सुचना केल्या.या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी १५ मच्छिमार संघटनांचा पाठिबा असल्याचे जाहीर केले ही मच्छिमाराची दिशाभूल आहे.मुख्यमंत्र्यानी बोलविलेल्या बैठकीत भाजप आणि युती मधील प्रतिनिधीच होते.गावातील विरोध करणारे मच्छिमार बांधव नव्हतेच. मग मुख्यमंत्री महोदयानी १५ मच्छिमार संघटनाचा पाठिंबा आहे हा जावईशोध कसा लावला? ही मच्छिमारांची केलेली दिशाभूल आहे.

**- अरुण पां.खटावकर, लालबाग**

### राष्ट्रध्वजाचे योग्य स्थान ध्वजस्तंभावरच!

स्वातंत्र्यदिन जवळ आला की सामाजिक संकेतस्थळांवर आपल्या देशप्रेमाची पावती देण्यासाठी झेंडे घेऊन सेल्फी काढण्यासोबत तिरंग्याच्या रंगाचे कपडे परीधान करून ग्रुप फोटो काढून ते अपलोड करणे, चेहऱ्यावर तिरंग्यासारखे टॅटू काढणे यांसारखे प्रकार या दिवसांत सर्रासपणे पाहायला मिळतात. तिरंग्याच्या तीन रंगाची या दिवशी इतकी क्रेझ असते कि, मिठाईच्या दुकानात तिरंगी पेढे आणि केकच्या दुकानांमध्ये तिरंगी केक्सना विशेष मागणी असते. राष्ट्रध्वजाच्या रंगाचा अशाप्रकारे होत असलेला सुमार वापर पाहिल्यावर राष्ट्रध्वज ही शोभेची वस्तू तर बनली नाही ना ? असा प्रश्न पडतो. राष्ट्रध्वज हा राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे, त्याचा योग्य तो मान राखणे, हे प्रत्येक भारतीयाचे अलिखित कर्तव्य आहे. त्याग, क्रांती, शांती व समृद्धी या मूल्यांची शिकवण राष्ट्रध्वज आपल्याला देतो. उत्साहापोटी राष्ट्रध्वजाच्या रंगांचा गैरवापर करतांना आपण ही मूल्येच पायदळी तुडवत असतो. राष्ट्रध्वजाचे योग्य स्थान हे ध्वजस्तंभावरच असते. तोच ध्वजाचा उचित सन्मान असतो. सामाजिक संकेतस्थळांवर देशप्रेमाचा देखावा करण्याऐवजी ज्या क्रांतिकारकांनी देशासाठी प्राणार्पण करून स्वतंत्र भारताची ध्वजपताका डौलत ठेवली त्यांचे आदर्श कृतीत आणण्यासाठी प्रयत्न केल्यास तेच खरे देशप्रेम असेल.

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

### चटका लावणारी एक्झिट !

आपल्या सहज सुंदर अभिनयाच्या विविध कंगो-यातून चित्रपट, नाटक, मालिका आदी माध्यमांद्वारे रसिक मनावर अधिराज्यच नव्हे तर प्रेक्षकांच्या हृदयात स्थान निर्माण करणारे आपला माणूस म्हणून आपलेसे वाटणारे विजयजी कदम यांच जाण चटका लावणार, वेदनादायी. मराठी कला विश्वाच नुकसान करणार. टूर टूर, सही रे सही, इरसाल कार्टी, गंमत जंमत, पप्पा सांगा कुणाचे, तेरे मेरे सपने, दे दणादण, हळद रुसली.. नाव तरी किती सांगायची, मात्र अशा अनेक विविधांगी कलाकृतीतून त्यांनी केलेल्या दमदार भूमिका जशाच्या तशाच नजरेसमोर येतात आणि हृदयात रुतून जातात अभिनेत्यासह. अभिनेते विजयजी कदम यांच्या अभिनयातून सजलेली, साकारलेली एक एक कलाकृती म्हणजे कला विश्वातील टपोरा मोतीच याचा विसर रसिक मनाला कधीही पडणार नाही. वैशिष्ट्यपूर्ण संवादफेक, मुद्राअभिनय, अचूक टाइमिंग, भूमिकेतील लहान-सहान काना कोपरे शोधत ते लक्षवेधी करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होतं. विनोदी भूमिकांसह गंभीर भूमिका नाही ते यशोशिखरावर घेऊन जात अशी जबरदस्त ताकद असलेला कलावंत. व्यक्तिरेखेचा स्वभाव स्वतःमध्ये भिनवायची जबरदस्त शक्ती असणारा हा कलाकार. त्यांच्या खुमखुमीचा विसर तर रसिक मनाला कधीच विसरता येणार नाही. माणूस आणि माणुसकी जपणा-या आपल्या माणसास अभिनेते विजय कदम यांना भावपूर्ण आदरांजली.

**- विश्वनाथ पंडित, ठाणे**

**कर्जत :** मुंबईच्या बॉम्बे कॉ ऑप मर्कंटाईल बँकेला ९ ऑगस्टला 'कस्टमर बेस्ट कस्टमर एक्सपेरियन्स एक्सलन्स' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बँकेने ग्राहकांना सुलभ आणि हायटेक सेवा मिळावी म्हणून नव्या तंत्रज्ञानाचा वापर सुरु केला आहे. कर्जत येथील डिस्कव्हर रिसॉर्टमध्ये पार पडलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात उजवीकडून बँकेचे प्रसिद्धी विभाग प्रमुख मोहम्मद मेहदी ,आयटी हेड खालिद, मुनाफ आणि नदीम हे बँकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## महत्त्वाचे

### नागपूरमध्ये जप्त केलं 50 किलो पेक्षा जास्त ड्रग्ज

**नागपूर :**मेफेड्रोन नामक अंमली पदार्थाची फॅक्ट्री सक्तवसुली संचालनालया (DRI) नागपुरात पाचपवली पोलीस स्टेशनच्या हद्दीत कारवाई केली. ागपूरमध्ये हा कारखाना सुरू असल्याची माहिती DRI ला मिळाली होती. शंभर किलोहून अधिक नशेसाठी लागणारे मेफेड्रोन नामक हे अमली पदार्थ कारखान्यात बनवण्याची क्षमता असल्याची माहिती DRI ने दिलीय.

### राज्यातील 13 जिल्ह्यांत आज यलो अलर्ट

**पुणे :** राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा जोर काहीसा ओसरला असल्याचे दिसून येत आहे. तर राज्यातील काही ठिकाणी मध्यम ते हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. उर्वरित राज्यात मात्र पावसाची उघडीप असणार आहे. राज्यातील 13 जिल्ह्यांमध्ये रविवारी पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुण्यात आज पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर विदर्भातही पावसाची शक्यता आहे. दरम्यान, उद्यापासून तीन दिवस राज्यात पावसाची उघडीप असणार आहे. राज्यातील काही ठिकाणी पुढील तीन-चार दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. पुणे व रायगडसह घाटमाथ्यावर तुरळक ठिकाणी जोरदार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. कोकणातील पालघर, रायगड, जिल्ह्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच विदर्भात पावसाची शक्यता कायम आहे. पुढील काही दिवस विदर्भात पावसाचा जोर कायम असणार आहे. रविवारी धुळे, जळगाव, नाशिक जिल्ह्यात वादळी वाऱ्यांसह तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर गडचिरोली जिल्ह्यात विजांसह पावसाची शक्यता आहे. तळकोकणातील काही भागात मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुतांश भागात मुसळधार पाऊस कोसळत आहे. कुडाळ, सावंतवाडी, दोडामार्ग, वैभववाडीत पावसाचाजोर कायम आहे. समुद्र खवळलेल्या स्थितीत असल्याने मच्छीमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### नैराश्यातून तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

**लातूर :** लातूरच्या आर्वी परिसरात राहणाऱ्या ऐश्वर्या चव्हाण वय 24 वर्ष या तरुणीने लग्नास नकार दिल्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दरम्यान ऐश्वर्या दगडू चव्हाण अस या मृत तरुणीचे नाव आहे., तर ऐश्वर्या चव्हाण आणि अविष्कार माने यांचे प्रेम संबंध होते. मात्र आविष्कार माने या तरूणाने लग्नाला नकार दिल्याने. मयत ऐश्वर्या हिने नैराश्यातून स्वतःच्याच राहत्या घरात गळफास घेऊन आपलं जीवन संपवलय.. दरम्यान या प्रकरणाचा अधिकचा तपास आणि संबंधित तरुणावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया एमआयडीसी पोलिस करत आहेत.

# प्रत्येक तालुक्यात संविधान भवन उभारणार - मुख्यमंत्री शिंदे

## हजारोंच्या उपस्थितीत मुख्यमंत्री कृतज्ञता सोहळा साजरा

प्रतिनिधी
■ छत्रपती संभाजीनगर

येत्या चार दिवसांनी आपण देशाचा स्वातंत्र्य दिवस साजरा करणार आहोत. बाबासाहेबांनी लिहिलेली राज्यघटना होती म्हणूनच आपण एक प्रजासत्ताक, सार्वभौम राष्ट्र म्हणून जगभर ओळखले जाऊ लागलो. 'जब तक सुरज चांद रहेगा, बाबासाहेबका संविधान रहेगा', बाबासाहेबांच्या संविधानाचा आदर वाढावा, त्याद्वारे सामाजिक न्यायाची भावना अधिक दृढ व्हावी यासाठी प्रत्येक तालुक्यात संविधान भवन उभारण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली. तसेच शहराचा डीपी प्लॅन हा सर्वांच्या हिताचा असेल तोच करु अशी ग्वाहीही त्यांनी शहरवासियांना दिली.



छत्रपती संभाजीनगर येथील टीव्ही सेंटर चौकात आज मुख्यमंत्री कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात अजिंठा लेणी पायथ्याशी जागतिक दर्जाचे बुद्ध विहार विपश्यना केंद्र उभारणी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीसाठी ५० कोटी रुपये, भडकल गेट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सौंदर्यीकरणासाठी पाच कोटी रुपये, टीव्ही सेंटर येथे छत्रपती संभाजीमहाराज पुतळा व अशोक स्तंभ उभारणीसाठी पाच कोटी रुपये, डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालयासाठी २५ कोटी रुपये, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर डीजीटल प्रोजेक्टसाठी २५ कोटी रुपये, तारांगणासाठी १० कोटी तसेच मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थेमार्फत बेरोजगारांना मदत अशा विविध विकास प्रकल्पांना निधी दिल्याबद्दल आज आंबेडकरी समाज समितीतर्फे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या सोहळ्यास केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे पणन व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, आमदार प्रदीप जयस्वाल, संजय शिरसाट तसेच संयोजक जालिंदर शेंडगे व सर्व समिती सदस्य उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांना मानपत्र देऊन त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी

### महाराष्ट्र माझा परिवार

*मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, हे सरकार दुर्बल, मागास, कष्टकरी, कामगार, गरिबांचे आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये एक लाख कोटींच्या योजना लागू केल्या आहेत. त्यापैकी ४५ हजार कोटी तर राज्यातील माझ्या भगिनींच्या बँक खात्यावर जमा होणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, युवा कार्य प्रशिक्षण, वर्षाला तीन सिलिंडर देणारी मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना सुरू केली. मुलींचे संपूर्ण शिक्षण मोफत केले. दुर्बलांना मदत करणे, त्यांचे जीवन आनंदी करणे ही सरकारची जबाबदारी आहे आणि महाराष्ट्र हा माझा परिवार आहे, अशा शब्दांत त्यांनी उपस्थितांबद्दल आपुलकी व्यक्त केली.*

# नागरिकांच्या अधिकाराचे पैसे देणे ही भीक नव्हे!

## 'लाडकी बहिण'वर टीका करणाऱ्या विरोधकांना डॉ.गोऱ्हेंचा टोला



प्रतिनिधी
■ नाशिक

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या योजनेची काही दिवसांपूर्वी घोषणा केली. त्यानिमित्ताने शिवसेनेच्या वतीने महाराष्ट्र महिला सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर आज दि. ११ ऑगस्ट रोजी नाशिकमध्ये महिला सन्मान यात्रेचे आयोजन शिवसेना महिला आघाडीच्या वतीने करण्यात आले होते.या कार्यक्रमाला महाराष्ट्र विधान परिषद उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्यामल दीक्षित यांनी पुष्पगुच्छ देऊन शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचां बैठकीत सत्कार केला.यावेळी बैठकीत पूजा वाघ व श्यामला दीक्षित यांनी यावेळी बैठकीत आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून लाडकी बहिण योजेनेसह इतर योजनांचा आढावा यावेळी डॉ.गोऱ्हे यांनी घेतला.

वडीलांच्या सोबतच आईचे नाव लावणारे एकमेव मुख्यमंत्री म्हणजे एकनाथ शिंदे असे प्रतिपादन यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी कार्यक्रमात केले. तसेच महिलांनी नकारात्मक गोष्टी टाळून, सकारात्मक गोष्टीकडे लक्ष केंद्रित केलं पाहिजे असा सल्ला देखील डॉ. गोऱ्हे यांनी उपस्थित महिलांना दिला.माझी लाडकी बहिण योजनेवर टीका होत असताना डॉ. गोऱ्हे यांनी विरोधकांना शेतकरी कर्ज माफी ही भीक होती का ? असा आक्रमक सवाल डॉ.गोऱ्हे यांनी विचाराला.

यावेळी कार्यक्रमाला पूजा वाघ (संपर्कप्रमुख नाशिक ),श्यामला दीक्षित( नाशिक जिल्हा समन्वयक),श्रद्धा जोशी (नांदगाव - येवला जिल्हा प्रमुख),सुवर्णा मटाले, मंगला भास्कर, पूजा धुमाळ, अस्मिता देशमाने, मंदाताई जाधव, अंजली जोशी, संगीता लवंगे, पायल कुलकर्णी , मृणाल कुलकर्णी यांच्यासह अनेक महिला पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोकांना तुम्ही किती वेळ फसवणार?

## राधाकृष्ण विखे पाटलांची शरद पवारांवर टीका

प्रतिनिधी
■ नाशिक

सध्या राज्याचे राजकारण हे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर चांगलेच तापले आहे. काही मराठा आंदोलक नेत्यांच्या गाड्या अडवत असल्याचे घटना घडताना समोर येत आहे. अशामध्ये आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची गाडीदेखील सोलापूरमध्ये मराठा आंदोलकांनी अडवाल्याची बातमी समोर आली. अशामध्ये त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी शरद पवार यांच्याकडे मराठा आंदोलकांनी केली. यावर आता भाजपचे नेते आणि राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शरद पवारांवर टीका केली.

"शरद पवार हे 4 वेळा राज्याचे मुख्यमंत्री राहिले आहेत. पण ते मराठा आरक्षणाबद्दल बोलत नसून त्यांची



भूमिका दुटप्पी असावी. तुम्ही लोकांना कितीकाळ फसवणार आहात?" असा सवाल करत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शरद पवारांना डिवचले. त्यांनी मराठा आरक्षणावर आपली भूमिका स्पष्ट केलीच पाहिजे, असे मत विखे पाटलांनी मांडले. शिर्डी येथे एका भूमिपूजन सोहळ्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शरद पवारांवर टीका केली. तसेच, 'यावेळी त्यांनी पवारांकडून सरकारला बदनाम करण्याचे षडयंत्र सुरु आहे,' असा दावा केला.

# विरोधकांनी लाडकी बहीण योजनेवर बोलू नये; तुम्ही दीड रुपया तरी दिला का?

■ कोल्हापूर

0राज्य सरकारची महत्त्वकांक्षी योजना लाडकी बहीण योजनेवर विरोधकाकडून टीका केली जाते. विरोधकांच्या टीकेला अजित पवार यांनी सडेतोड उत्तर दिलंय. विरोधकांनी सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर बोलू नये. त्यांनी सधा



दीड रुपया खर्चे केला नाही, असा टोला अजित पवार यांनी मारलाय. ते कोल्हापूरमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यकर्ते मेळाव्यात बोलत होते.

कोल्हापूरच्या कार्यकर्ता मेळव्यात बोलतांना अजित पवार यांनी आपण भाजपसोबत का गेलो याचं उत्तर दिलं. पुन्हा एकदा सत्तेत जाण्याचा निर्णय योग्य असल्याचं सांगत त्यांनी जनतेला पाठिंबा द्यावा, असं आवाहन केलं.

# शिवसेनेच्या वाघिणीचा ठाण्यात उद्धव ठाकरेंना धक्का:अनिता बिर्जेंचा शिवसेनेत प्रवेश

■ ठाणे

ठाकरे गटाच्या उपनेत्या आणि दिवंगत आनंद दिघे यांच्या काळापासून ठाकरेंसोबत असलेल्या अनिता बिर्जे यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत ठाण्यात 10 ऑगस्ट रोजी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. विशेष म्हणजे ठाकरे गटाचा मेळावा ठाण्यात सुरू असतानाच बिर्जे यांनी ठाकरेंची साथ सोडली आहे. यावेळी त्यांनी ठाकरे गटातून बाहेर पाडण्यामागचे कारणही सांगितले आहे. दरम्यान, या पक्षप्रवेशामुळे



उद्धव ठाकरेंना धक्का बसला आहे.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेते प्रवेश केल्यानंतर अनिता बिर्जे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ''राजकारणासाठी नाही तर समाज सेवेसाठी मी हा प्रवेश करत आहे. ते लोकही माझेच आहेत. मात्र माझा भाऊ आज मुख्यमंत्री आहे. त्यामुळे माझा या भावाचा उपयोग तळागाळातील सर्व महिलांना झाला पाहिजे, असे अनिता बिर्जेंनी सांगितले.

# पेंडुरच्या 77 विद्यार्थ्यांना मिळाला नवीन गणवेश

## माजी विद्यार्थ्यांसह दानशूर व्यक्तींचे दातृत्व

प्रतिनिधी
■ मालवण

ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश देण्यासाठी मालवण तालुक्यातील पेंडुर माध्यमिक शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलच्यावतीने मदतीचे आवाहन करण्यात आले. त्यानंतर माजी विद्यार्थी, शिक्षकांचे नातेवाईक, दानशूर व्यक्ती, चाकरमान्यांसह ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यांच्याकडूनमिळालेल्या देणगी रकमेतून ७७ विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचा उपक्रम नुकताच पार पडला.

ग्रामीण भागात आजही बऱ्याच सामान्य कुटुंबाची आर्थिक बाजू कमकुवत आहे. यामुळे होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश विकत घेणे कठीण जाते यासाठी संस्थेच्या वतीने मदतीचे आवाहन करण्यात आले होते. यानंतर जवळपास ८० हजार रुपये जमा झाले. त्यातील काही रकमेतून ३१ मुली आणि ४६ मुलगे यांच्यासाठी गणवेश खरेदी करण्यात आले. शिक्षक पालक सभेच्या निमित्ताने त्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष बाबाराव राणे यांनी पाच हजार रुपयाची देणगी मुख्याध्यापक



### पुढील वर्षीही मुलांना गणवेश

*पुढीलवर्षी शाळेत नवीन प्रवेश घेणाऱ्या मुलांनाही गणवेश वाटप करण्यात येणार आहेत. त्याची तरतूद करताना मदतीतून शिल्लक राहिलेली रक्कम मुख्याध्यापकांकडे देण्यात आली. यावेळी संस्था, शिक्षक, कर्मचारी वर्ग आणि पालकांच्यावतीने शाळा, विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहकार्य उभे करणाऱ्या माजी विद्यार्थी, दानशूर व्यक्तींचे आभार मानण्यात आले.*

यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी बोलताना ते म्हणाले संस्था शाळा चालवत असताना इमारत दुरुस्ती, क्रीडांगण, आरोग्य विषयक सुविधा यासारख्या गोष्टीवर विशेष लक्ष दिले जात असते. या कार्यात राजकीय, सामाजिक आणि दानशूर व्यक्तींकडून नेहमीच सहकार्य मिळते. शाळेत मुलांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी एका माजी विद्यार्थ्याने केलेली मदत, वेळोवेळी मदतीसाठी तत्पर असणारे माजी विद्यार्थी सीताराम गावडे यांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

यावेळी माध्यमिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबाराव राणे, सचिव घन:श्याम राणे, मुख्याध्यापक सुरेश तावडे, संचालक प्रदीप सावंत, सुभाष सावंत यांच्यासह पालक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन संगम चव्हाण यांनी केले.

# श्री हनुमान व्यायामशाळेचा एक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम; 14 ऑगस्टच्या मध्यरात्री होणार झेंडावंदन

प्रतिनिधी
■ ठाणे

१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री ठीक १२ वाजता आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू त्यांचे " नियतीशी करार" हे भाषण देत होते त्याचवेळी ठाण्याच्या श्री हनुमान व्यायाम शाळेत तत्कालीन पदाधिकारी कै. ग. ल. जोशी यांचे हस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडला होता, तर ठाण्याच्या कलेक्टर ऑफीसवर ध्वजारोहण करण्याचा मान श्री समर्थ सेवक मंडळाचे तत्कालीन शास्ता आणि स्वातंत्र्य सैनिक कै. नानासाहेब दामले यांना लाभला होता.



१९४७ सालापासून सुरू झालेली ही परंपरा श्री हनुमान व्यायाम शाळा, गडकरी रंगायतन यांनी आजतागायत गेली ७६ वर्षे अव्याहत पणे सुरूच ठेवली आहे. दोन वेळा माऊंट एव्हरेस्टवर आणि जगभरातील इतरही सर्वोच्च शिखरांवर भारताचा झेंडा फडकवणारे ज्येष्ठ गिर्यारोहक शरद कुलकर्णी यांचे शुभहस्ते यावर्षी ध्वजारोहण करणार आहेत. ध्वजारोहण कार्यक्रमापूर्वी .शरद कुलकर्णी त्यांचे गिर्यारोहणातील रोचक अनुभव स्लाईड शो च्या माध्यमातून आपल्यापुढे मांडणार आहेत. त्यांचे अनुभव उपस्थितांना निश्चितच प्रेरणादायी ठरतील.श्री हनुमान व्यायाम शाळा, गडकरी रंगायतनसमोर, ठाणे (प) येथील शिवदौलत सभागृहात १४ ऑगस्टला रात्रौ १२ वाजता हा ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडणार आहे.



*पनवेल : शेतकरी कामगार पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके यांची पनवेल विधानसभा क्षेत्र, कार्यकारी तालुका चिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी त्यांचे शेकाप नेते माजी आमदार बाळाराम पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नारायण घरत, पनवेल महानगर जिल्हा चिटणीस गणेश कडू आदि पदाधिकारी यांनी शुभेच्छा आणि राजकीय पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.*

# पुण्यात मनसेला मोठं खिंडार, जयंत पाटलांनी राज ठाकरेंचा विश्वासू नेताच फोडला



प्रतिनिधी
■ पुणे

राज्यात एकीकडे मनसे आणि शिवसेना ठाकरे गट असा राजकीय सामना रंगला असतानाच दुसरीकडे शरद पवार गटाने मनसेला मोठा धक्का दिलाय. मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी शरद पवार गटात प्रवेश केलाय. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पुण्यात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडलाय.

राष्ट्रवादीत प्रवेश करणाऱ्या मनसे पदाधिकाऱ्यांमध्ये प्रकाश जमधडे यांचा समावेश आहे. नुकताच जमधडे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतून आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. आता त्यांनी तुतारी फुंकण्याचा निर्णय घेतलाय. राष्ट्रवादीत प्रवेश करताच जयंत पाटील यांनी जमधडे यांची हवेली तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.प्रकाश जमधडे यांची वाघोली तालुक्यावर मजबूत पकड आहे. त्यांनी मनसेत असताना त्यांनी तालुक्यात तगडा जनसंपर्क ठेवला होता. वाघोलीतील विविध सार्वजनिक प्रश्नांवर जमधडे यांनी आंदोलने केली होती. इतकंच नाही तर त्यांनी नुकतीच शिरूर लोकसभा निवडणूक लढवली होती.

पण लोकसभा निवडणुकीनंतर जमधडे हे नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. याच नाराजीतून त्यांनी काही दिवसांपूर्वी मनसेला सोडचिठ्ठी दिली. आता जमधडे यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वात तुतारी फुंकण्याचा निर्णय घेतलाय. जमधडे यांच्या पक्षप्रवेशाने हवेली तालुक्यात शरद पवार गटाची ताकद आणखीच वाढली आहे.दरम्यान, जमधडे यांच्यासोबत हवेली तालुका अध्यक्ष संदीप गोते यांच्या हस्ते त्यांच्या सोबत मनसेचे माजी हवेली तालुका उपाध्यक्ष अतिश ढगे, अक्षय चोपडे, ज्ञानेश्वर गायकवाड, किरण मिंडे, आपचे अजिक्य शेडगेसह तालुक्यातील अनेक पक्षातील कार्यकर्त्यांनी शरद पवार गटात जाणं पसंत केलंय.

# नागदेवतेच्या मूर्तीवर दुधाचा अभिषेक करुनही 100 लिटर दूध केले जमा

## अंनिस आणि श्री नागराज उत्सव सेवा ट्रस्ट चा अनोखा उपक्रम

प्रतिनिधी
■ कराड

नाग पंचमीच्या दिवशी नाग मंदिरांमधील नागदेवतेच्या मूर्तीवर दुधाचा अभिषेक करण्यात येतो. महिला भाविकांच्या धार्मिक श्रद्धेला धक्का न लावता, जे दूध नाग मंदिरांमधील नागदेवतेच्या मूर्ती वरती घातल्याने भरपूर प्रमाणात वाया जाते, त्याकरिता चा एक उत्तम पर्याय हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा कराडने या निमित्ताने श्री नागराज उत्सव सेवा ट्रस्ट " समस्त वास्के परिवार यांच्या सहयोगानेदिला आहे. यामुळे जवळपास १०० लिटर दूध जमा झाले. सदरचा उपक्रम कराड मधील शिवाजी विद्यालया जवळच्या नागदेवतेच्या मंदिरामधून राबविण्यात आला.

अनेक महिला भाविक मंदिरांमधील नागदेवतेच्या मूर्तीवर




दुधाचा अभिषेक करतात याला पर्याय म्हणून अगदी चमचाभर दुधाचा अभिषेक मूर्तीवर करावा व उरलेले दूध शेजारी ठेवलेल्या दुधाच्या कॅन मध्येच घालावे म्हणजे हे दूध वाया न घालवता जमलेल्या दुधाचा विनियोग उत्तम प्रकारे करता येतो यामुळे एक चांगला संदेश समाजामध्ये जाऊन नागपंचमी निमित्त धार्मिक सणाला विधायक पर्याय मिळाला.

नागपंचमीच्या दिवशी नाग - साप यांना दूध पाजण्यात येते, नाग-साप हे सरपटणारे जिवंत प्राणी आहेत, दूध हे त्यांचे अन्न नाही. या दूध पाजण्यासारख्या अवैज्ञानिक बाबीमुळे साप-नाग - साप मृत्यू पावू शकतात. याची जाणीव नागपंचमी साजरी करताना भाविकांनी ठेवावी. सबब त्यांना दूध पाजू नये असे आवाहनही यानिमित्त समितीच्या वतीने करण्यात आले.

संपूर्ण महाराष्ट्रामधील या प्रकारचा अनोखा उपक्रम म्हणून हा पहिलाच प्रयोग महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा कराडच्या वतीने राबविण्यात आला.

हा उपक्रम यशस्वी व्हावा याकरता समितीचे हितचिंतक व कार्यकर्ते व हितचिंतक बाळ देवधर, चंदुकाका जाधव, धनंजय जोशी चंद्रकांत नकाते, प्रसाद पावसकर, प्रफुल्ल ठाकूर, सैफुल्ला मोमीन, रमेश शहा, निळकंठ कुसुरकर, डवरी, रामसिंग दलावरी, प्रज्ञा गोळे इत्यादी तसेच श्री नागराज उत्सव सेवा ट्रस्टचे सर्वश्री भानुदास वास्के, अमृत वास्के, रमेश वास्के, प्रकाश वास्के, बबन वास्के, विठ्ठल वास्के, सुनील वास्के, नितीन वास्के, रणवीर वास्के, सचिन वास्के, प्रथमेश वास्के, सिद्धांत वास्के इत्यादींनी प्रयत्न केले. त्याचबरोबर प्रियदर्शनी दूध संघाचे अशोकराव पाटील (दादा ) यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले.

# राष्ट्रध्वजाचा सन्मान आपले राष्ट्रीय कर्तव्यच!

जगातील सर्वात प्राचीन संस्कृती लाभलेल्या भारत देशावर आजतागायत असंख्य आक्रमणे झाली, एकेकाळी वैभवसंपन्न असलेल्या भारताची लुटारू आक्रमकांनी अपरिमित लूट केली. व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या मूठभर इंग्रजांनी देशातील जातीपातीत भेद निर्माण करून भारतावर दीडशेहून अधिक वर्षे राज्य केले. भारतमातेला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी असंख्य क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली तर कित्येकांनी आपले संपूर्ण आयुष्य तुरुंगात काढून इंग्रजांनी केलेले अनन्वित अत्याचार हसत हसत सहन केले. त्यांच्या त्यागातून प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचे महत्व आजच्या तरुणवर्गामध्ये तितकेसे राहिलेले नाही. खेळांचे सामने आणि राष्टीय सण या दिवशी मात्र भारतीयांमधील देशप्रेम मोठ्या प्रमाणात उफाळून येते. स्वातंत्र्य दिन जवळ आला कि देशभरात देशप्रेमाचे वारे वाहू लागतात. यंदाचा स्वातंत्र्य दिनही त्याला अपवाद नाही. राष्ट्रध्वजातील तीन रंगाचा कल्पकतेने वापर करून वेगवेगळ्या डिझाइन्सचे लहान मुलांसह मोठ्यांचेही टीशर्ट बाजारात विक्रीसाठी आली आहेत. तिरंग्याची छटा दिसणारे टीशर्ट्स, शर्ट्स, सदरे, स्त्रियांचे सूट, साड्या १५ दिवस आधीपासूनच ऑनलाईन विक्री करणाऱ्या संकेतस्थळांवर विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले आहेत. व्यापारी वर्गाने आपल्या दुकानांच्या दर्शनी भागावर तिरंग्याच्या रंगाची सजावट, स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देणारे संदेश रंगवण्यास सुरुवात केली आहे. सामाजिक संकेतस्थळांवरसुद्धा देशभक्तीपर संदेश, टेम्प्लेट्स, प्रोफाइल फ्रेम्स उपलब्ध होऊ लागल्या आहेत. स्वातंत्र्य दिनानिमित्त अनेक मंडळे, संस्था, शाळा आणि महाविद्यालये यांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यासाठीचा सरावसुद्धा युद्धपातळीवर सुरु आहे. बच्चेकंपनी शाळेतील ध्वजवंदनाच्या निमित्ताने द्यायच्या भाषणांचा सराव करताना दिसू लागली आहेत. शहरातील नाक्यांवर, सिग्नलवर कागदी आणि कापडी राष्ट्रध्वज, बॅज विकणारी मुले दिसू लागली आहेत. दूरदर्शन वाहिन्यांवरील रिॲलिटी शोजमधूनही देशप्रेमाची गाणी, नृत्य यांचे सादरीकरण केले जाऊ लागले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने वाहिन्यांवर देशभक्तीवर आधारित चित्रपट दाखवण्यात येतात त्यांचे ट्रेलर्स आतापासूनच अधूनमधून दाखवले जाऊ लागले आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने कागदी आणि कापडी राष्ट्रध्वज सर्वत्र विक्रीसाठी आले आहेत. ५-१० रुपयांत मिळणारा राष्ट्रध्वज खरेदी करणे सोपे आहे; मात्र त्याचा योग्य तो सन्मान राखण्याची भावना आपल्यात निर्माण झाली आहे का हे अभ्यासनेही आज गरजेचे बनले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या एका पिढीने अपरिमित हालअपेष्टा सहन केल्या; मात्र त्यानंतरच्या पिढीने पुढच्या पिढीवर जे देशप्रेमाचे संस्कार करायला हवे होते ते न केल्याने स्वातंत्र्याचे मोल आजच्या पिढीला तितकेसे उरलेले नाही. राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने रस्त्यावर पडलेले ध्वज आणि ध्वजांचे अवशेष गोळा करून त्यांची ध्वजसंहितेनुसार योग्य ती विल्हेवाट लावण्याचे काम काही स्वयंसेवी संघटना दरवर्षी करत असतात. मात्र त्यांच्यावर ही वेळ येऊच न देण्याची जबाबदारी आपली नव्हे काय ? स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी आपले राष्ट्रप्रेम दाखवण्यासाठी राष्ट्रध्वजाचे बॅज आपण छातीवर लावून मिरवतो. गाड्यांवर, घरांवर, दुकानांवर ध्वज फडकावतो, कागदी ध्वज विकत घेऊन ते पाल्यांना देतो; मात्र ते फाटतात, हरवतात तेव्हा ' जाऊ दे, ५ रुपयांचा तर झेंडा होता' असे विचार आपल्या मनात येतात आणि आपण ते शोधायचा प्रयत्नही करत नाही. या दिवशी रस्त्यावरून जाताना एखादा ध्वज रस्त्यावर पडलेला दिसला तर तो उचलून खिशात ठेवण्याचा विचार तर येतो मात्र आजूबाजूचे लोक काय म्हणतील या विचाराने आपण तसे करण्याचे टाळतो. खरेदी केलेले ध्वज पुढील राष्ट्रीय सणासाठी जपून ठेवतो का किंवा ते फाटले असतील तर ध्वजसंहितेनुसार त्या ध्वजांची विल्हेवाट लावतो का ? आपल्या मनात आपल्या राष्ट्रध्वजाविषयी आस्था किती आहे हे जाणून घेण्यासाठी सदर उदाहरणे पुरेशी आहेत. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासंदर्भात शासनाच्या वतीने प्रतिवर्षी ध्वजसंहिता प्रकाशित करण्यात येते मात्र ती वाचण्याची तसदी आपण कधी घेत नाही.

राष्ट्रध्वज हे देशाच्या सन्मानाचे प्रतीक असते त्यामुळे त्याचा योग्य तो मान राखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे. देशप्रेमापोटी आपल्या एका पिढीतील शेकडो क्रांतिकारकांनी प्राणांची आहुती दिली, छातीवर गोळ्या झेलल्या, घरादाराची राखरांगोळी केली, आयुष्यभर कारावास भोगला. त्यांच्याच बलिदानामुळे आ ज आपण स्वातंत्र्यात सुखाने जगत आहोत. लोकशाही व्यवस्थेच्या सुख सुविधा उपभोगत आहोत. राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी आजही आपले सैनिक सीमेवर ऊन, वारा, पाऊस कशाचीच तमा न बाळगता खंबीरपणे उभे असतात त्या राष्ट्रध्वजाचे उचित मूल्य आपल्या अंतर्मनात बिंबायला हवे. राष्ट्रीय सणांच्या दुसऱ्या दिवशी जेव्हा एकही राष्ट्रध्वज रस्त्यावर इतस्ततः पडलेला दिसणार नाही तेव्हाच आपल्यातील राष्ट्रध्वजाविषयीची अस्मिता जागृत झाली असे म्हणता येईल.



**जगन घाणेकर, मुंबई**

# हरियाणाला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५ पदके, आमचा महाराष्ट्र कुठेय !

**नवनाथ दांडेकर**

फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे नुकतेच उन्हाळी ऑलिम्पिक संपन्न झाले.नेहमीप्रमाणे शानदार क्रीडा परंपरा लाभलेल्या हरियाणाने देशासाठी १ रौप्य आणि ४ कास्यपदके पटकावून आपली कीर्ती कायम राखली. पण देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईचे राज्य महाराष्ट्र मात्र खेळात मागासच राहिले. कोल्हापूरकर पठ्ठ्यास्वप्नील कुसाळेने नेमबाजीत १ कांस्यपदक मिळवत महाराष्ट्राची अब्रू राखली.या साऱ्या फियास्कोची थोडी तरी लाज राज्यातील क्रीडा महासंघ ,क्रीडा संघटना आणि राज्य शासनाने बाळगली पाहिजे. देशात राज्याला नंबर वन करण्याची घोषणा वर्षानुवर्षे करीत आहेत. पण ते आश्वासन केवळ कागदावरच. इथले राज्यकर्ते आणि विरोधी पक्षाचे नेतेही केवळ आपली खुर्ची कायम राखण्यात मश्गुल दिसत आहेत. हरियाणासारखे छोटे राज्य जर खेळात एव्हढी मोठी प्रगती करू शकते तर महान राष्ट्र म्हणून देशात नावाजलेले महाराष्ट्र राज्य क्रीडा क्षेत्रात मागे का? याचा विचार इथल्या सर्वच राजकारण्यांनी करायला हवा.महाराष्टाचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे क्रीडा प्रेमी आहेत. राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार ,माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी मोठे योगदान दिलंय. या सर्वानीच एकत्र येऊन ऑलिम्पिकमधील महाराष्टाच्या फियास्कोवर गंभीर चिंतन कार्याला हवे.अन्यथा राज्याचे क्रीडा क्षेत्रात काही खरे नाही एव्हढे मात्र खरे.

मुंबई आणि महाराष्टात क्रिकेटने प्रचंड लोकप्रियता मिळवलीय हे खरे असले तरी या मातीतील कुस्ती ,कबड्डी ,खोखो या खेळांकडेही आपण लक्ष द्यायला हवे. कबड्डीला सातासमुद्रापार नेणारे शंकरराव तथा बुवा साळवी यांच्यानंतर भारतीय खेळांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नेणारा संघटक तयार होऊ नये याचेच दुःख आहे. मल्लखांब प्रशिक्षक उदय देशपांडे ,द्रोणाचार्य क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड,पॉवरलिफ्टिंग महर्षी दिवंगत मधुकर दरेकर,शरीरसौष्ठव महर्षी मधुकर तळवलकर अशी बोटावर मोजणारी मान्यवरांची नवे सोडली तर क्रीडा राज्याच्या संस्कृतीला राजमान्यता आणि राजकीय आर्थिक बळ मिळवून देणारे धुरीण राज्यात कमीच दिसत आहेत.दिग्गज राजकीय नेते शरद पवार यांनी क्रिकेट ,कबड्डी आणि कुस्तीला जे प्रोत्साहन दिले ते यापुढेही सुरु राहिले तरच खेळात महाराष्ट्र महान राष्ट्र होईल याची जण सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही ठेवायला हवी. वर्षानुवर्षे महासंघ आणि क्रीडा संघटनांची पदे भूषवणाऱ्या महाराष्ट्राच्या क्रीडा धुरिणांनी प्रामाणिकपणे आपल्या खेळांच्या आणि खेळाडूंच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले तरच पुढच्या ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राचे अस्तित्व जाणवले. एकट्या खाशाबा जाधव आणि नेमबाज स्वप्नील कुसाळेच्या यशावर समाधान मानून भागणार नाही. देशाच्या आर्थिक विकासात मोलाची भूमिका बजावणाऱ्या महाराष्ट्राला क्रीडा क्षेत्रातही सोन्याचे दिवस आणून देण्याचा संकल्प विद्यमान सत्ताधीशांनी करायला हवा. हरियाणासारख्या छोट्या राज्याचा आदर्श त्यासाठी ठेवायला हरकत नाही.



मला आठवते गेल्या काही वर्षांपूर्वी मुष्टीयुद्ध संघटक अस्पि अदाजानिया यांच्या प्रयत्नांतून मुंबईत जागतिक मुष्टीयुद्ध स्पर्धा रंगली होती. त्यानिमित्ताने महाराष्ट्राच्या आणि देशाच्या अनेक बॉक्सर्सना आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा अनुभव अगदी जवळून घेता आला होता. तसेच पुण्याच्या बालवाडीत आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धा रंगली होती. मी स्वतः त्या स्पर्धेचा आनंद घेतला होता. क्रिकेट आणि जागतिक हॉकी वगळता अन्य खेळांच्या स्पर्धा महाराष्ट्रात अथवा देशात फारच कमी प्रमाणात होतात.क्रिकेटला नवे ठेवणाऱ्या अन्य खेळांच्या संघटकांनी आणि खेळाडूंनी यापासून बोध घ्यायला हवा.क्रीडा संघटना अथवा महासंघ केवळ आपलं स्वार्थ साधून घेण्यासाठी नसतात तर राज्याचे आणि देशाचे नाव उज्वल करणारे खेळाडू घडवण्यासाठी असतात याचे भान आमच्या क्रीडा संघटक आणि त्यावर सत्ता गाजवणाऱ्या राजकारण्यांनी ठेवायला हवे. बालेवाडीसारखी क्रीडा संकुले उभी राहतात पण त्यांची निगा मात्र शासनाकडून राखली जात नाही. स्पर्धा संपल्या कि अशा संकुलांकडे लक्ष द्यायला कुणाला फुरसत नसते.असा दृष्टीकोन ठेवला तर २०३७ची ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा आपण कशी यशस्वी करू शकतो याचाही विचार क्रीडा संघटक आणि सरकारने करायला हवा. क्रीडा संकुले खेळांच्या विकासासाठी हवीत संचालकांच्या तुंबड्या भरण्यासाठी नकोत हेही सरकारने लक्षात ठेवायला हवे.

राहिला प्रश्न शालेय स्तरापासून क्रीडा संस्कृती रुजवण्याचा.तर मुंबई महानगरपालिका शाळांतून पिटी हा खेळाचा विषयच बंद करण्यात आल्याचे समजतेय. जगातील दुसऱ्या क्रमांकाची महानगरपालिका मुंबईची ही अवस्था तर देशातील अन्य पालिकांत काय अवस्था असेल याचा विचारच आपण करू शकणार नाही.चीन आणि अमेरिकेची ऑलिम्पिक पदके आम्ही आवासून बघत असतो .पण परिश्रम घेण्याची आणि प्रामाणिकपणे खेळाचा आणि खेळाडूंचा विकास करण्याची वृत्ती मात्र आमच्यात आम्ही बाणून घेतलेली नाही. मग कसे आम्ही खेळात महासत्ता होणार याचा विचार सत्ताधारी आणि विरोधकांनी करायला हवा. खुर्चीसाठी आणि सत्तेसाठी भांडणे करण्यापेक्षा या देशात क्रीडा संस्कृती रुजवण्याचे प्रयत्न राजकारण्यांनी केले तरी कित्येक पदकविजेते खेळाडू राज्याला आणि देशाला मिळू शकतील.

आताचे राज्याचे विद्यमान क्रीडामंत्री संजय बनसोडे हे खेळांवर प्रेम करणारे आहेत.त्यांच्या पाठीशी अजितदादांसारख्या दिग्गज क्रीडाप्रेमी नेत्यांचा आश्वासक हात आहे. त्यांनी तरी राज्याच्या क्रीडाधोरणाला सुदिन यावेत असे धोरण आखावे. आता काही महिन्यांतच विधानसभा निवडणूक होणार असले तरी त्यांनी खेळांच्या विकासासाठी आश्वासक पाऊल उचलायला हरकत नाही. भविष्यात सत्तेवर येणाऱ्या सरकारनेही त्या धोरणाची अंमलबजावणी केल्यास क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्राचा पॅरिससारखा फियास्को होणार नाही.राज्याचे नाव सातासमुद्रापार नेणाऱ्या स्वप्नील कुसाळेसारख्या खेळाडूंना राज्य सरकारने जपायला हवे. महाराष्ट्राने अंजली वेदपाठक ,सुमा शिरूर यांच्यासारखे दिग्गज नेमबाज देशाला दिलेत. तीच परंपरा राज्याने पुढेही जपायला हवी. कुस्तीत आमचे मराठी पहिलवान का मागे पडत आहेत याचाही विचार राज्याच्या क्रीडा मंत्रालयाने करायला हवा.इतरही खेळांत कुत्र्याच्या छत्र्या उगवाव्यात तशा संघटना उभ्या राहिल्या आहेत. त्यावर सरकारने अंकुश आणायला हवा.प्रत्येक खेळाचे एकछत्री संचालन करणारा राज्याचा क्रीडा महासंघ असावा असे राज्याचे धोरण हवे. अन्यथा 'एक ना धड भराभर चिंध्या' अशी अवस्था त्या खेळांची होऊ शकते.

सध्या ओडिशासारख्या राज्याने हॉकी या आपल्या खेळाचा विकास साधण्यासाठी फार चांगले उपक्रम राबवले आहेत. त्याचा लाभ देशभरातील हॉकीपटू घेत आहेत. महाराष्ट्रानेही एखादा खेळ निवडून त्यासाठी ओडिशाच्या धर्तीवर क्रीडा विकास योजना आखायला हरकत नाही.मात्र यासाठी सरकार आणि राजकारण्यांची प्रामाणिक भूमिका दिसायला हवी. शालेय स्तरापासून काही खेळांचे प्रशिक्षण मुलांना देणे फारच गरजेचे आहे. तरच क्रीडा संस्कृती राज्यात आणि देशात रुजेल अन्यथा नाही.महाराष्ट्र सरकारने आता तरी ऑलिम्पिकमधील फियास्कोपासून धडा घ्यायला हवा.आतापासून क्रीडा विकासाचे लक्ष्य ठेवले तर हरियाणासारखे यश महाराष्ट्रही जागतिक स्पर्धांत मिळवू शकेल यात शंका नाही.

## 'द्रोणाचार्यां'ना प्रशिक्षणासाठी मैदान कधी मिळणार?

*टी २० क्रिकेट विश्वचषक भारताला जिंकून देणारे 'द्रोणाचार्य' दिनेश लाड पदरमोड करीत गोरगरीब मुलांतून भविष्यातील रोहित आणि शार्दूल घडवण्याचे महत्कार्य करीत आहेत. पण महाराष्ट्र सरकार अथवा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून त्यांच्या कार्याची दाखलाच घेतली जात नाहीय. त्यांना अत्यल्प शुल्कात प्रशिक्षणासाठी मैदान मिळेनासे झालेय. त्यांनी त्यासाठी अनेकदा सरकारदरबारी खेटे मारले आहेत.पण आजपावेतो आश्वासनांच्या पलीकडे त्यांच्या पदरात काहीही पडलेले नाहीय. पश्चिम बंगाल आणि आसाममधून लाडसरांना निरोप येत आहेत. सर आमच्याकडे या आम्ही तुम्हाला प्रशिक्षणासाठी मैदान अत्यल्प दरात देतो असे आवतण दिले जातेय. कोलकाता आणि गुवाहाटी येथे लाड यांच्यासाठी प्रशिक्षण मैदाने उपलब्ध आहेत.पण या मराठमोळ्या प्रशिक्षकाकडे लक्ष द्यावे त्यांना सहकार्य करावे असे महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना का वाटत नाही ,हाच मोठा यक्षप्रश्न आहे. मला महाराष्ट्रातील मराठी मुलांना प्राधान्यांने पुढे आणायचे आहे ,पैसे अथवा संपत्ती कमावणे हा माझा उद्देश नाही असे लाड सर वारंवार सांगत आहेत.दिग्गज दिवंगत 'द्रोणाचार्य' रमाकांत आचरेकर सरांचा आदर्श ठेऊन गोरगरीब मुलांना विनाशुल्क क्रिकेट प्रशिक्षण देणारे दिनेश लाड यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री अजित पवार ,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहकार्य करून न्याय द्यावा अशी राज्यातील तमाम क्रिकेटशौकिनांची इच्छा आहे. ऑलिम्पिकमधील राज्याच्या सुमार कामगिरीच्या निमित्ताने क्रिकेट प्रशिक्षक दिनेश लाड यांचीही खंत राज्यकर्त्यांनी समजून घ्यावी यासाठीच त्यांच्या विषयाचा उहापोह येथे केलाय.असो भविष्यात तरी सरकार राज्याच्या क्रीडा धोरणात सक्रियता आणून राज्याला खेळात पुढे नेण्यासाठी झटत अशी आशा आपण कार्याला हरकत नाही.*



# एड्सबाबत जनजागृतीसाठी 'मुंजिएनिसं रेड रन मॅरेथॉन 2024'

मुंबई शहरातील महाविदयालयीन युवक व युवती व सर्वसामान्य लोकांमध्ये एचआयव्ही / एड्स बाबत जनजागृती करणेकरीता 'Run To End AIDS' या घोषवाक्या अंतर्गत मुंजिएनिसं रेड रन मॅरेथॉन २०२४ चे आयोजन करण्यात आले. संजय कु-हाडे, प्रकल्प संचालक, मुंजिएनिसं व उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या हस्ते मुंजिएनिसं रेड रन मॅरेथॉन २०२४ स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांचा विशेष सत्कार करण्यात आला.

आजची निरोगी आणि सक्षम युवा पिढी हे आपल्या देशाचे भविष्य आहे. ही बाब लक्षात घेता मुंबई शहरातील युवक व युवती व सर्वसामान्य लोकांमध्ये एचआयव्ही / एड्स बाबत जनजागृती करणेकरीता मुंजिएनिसंस्थेमार्फत रेड रन मॅरेथॉन २०२४ चे आयोजन ११ ऑगस्ट, २०२४ रोजी करण्यात आले. यास्तव ' Run To End AIDS' असे आवाहन मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थेचे मा. प्रकल्प संचालक व उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य), बृहन्मुंबई महानगरपालिका संजय कु-हाडे यांनी केले. सदर कार्यक्रमाचे मुख्य उद्दीष्ट मुंबईतील युवकामध्ये एचआयव्ही / एड्सबाबत जागृत करणे तसेच एचआयव्ही विषाणू ने बाधित झालेल्यांसाठी मुक्त संवाद, शिक्षण आणि समर्थन या भावनेला प्रोत्साहित करणे हा आहे. रेड रन की केवळ स्पर्धा नसून, ती एक चळवळ आहे. रेड रन या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना एकत्रित आणून स्वत:चे व इतरांचे एचआयव्ही / एड्स पासून बचाव करणेकरीता हे एक अद्वितीय व्यासपीठ तयार करण्यात आले आहे.

मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थे मार्फत महाविद्यालयीन युवकां करीता एकूण चार किलोमीटर अतंराची व सर्व सामान्य लोकांकरीता एकूण दोन किलोमीटर अंतराची रेड रन मॅरेथॉन २०२४ स्पर्धा आयोजित करण्यात आली. ज्यामध्ये ६५० पेक्षा अधिक युवक/युवतींनी व २०० पेक्षा जास्त सर्व सामान्य लोकांनी सहभाग दर्शविला. तसेच २०० पेक्षा जास्त संस्थेचे कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मॅरेथॉन मार्गावर कार्यरत होते. या कार्यक्रमाकरीता मा. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी व अतिरिक्त महानगरपालिका आयुक् (प्रकल्प) अभिजीत बांगर, यांचे मार्गदर्शन लाभले. मा. प्रकल्प संचालक, मुंजिएनिसं व उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य), बृहन्मुंबई महानगरपालिका संजय कु-हाडे यांच्या हस्ते सदर मॅरेथॉन स्पर्धेचे अनावरण करण्यात आले.




या कार्यक्रमा दरम्यान उपस्थितांशी संवाद साधताना मा. प्रकल्प संचालक व उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य), बृहन्मुंबई महानगरपालिका संजय कु-हाडे यांनी सांगितले की, एचआयव्ही / एड्सशी मुकाबला करण्यासाठी एचआयव्ही बाबत ज्ञान आणि जागरुकता असणे ह गुरुकिल्ली आहे. तसेच मुंबईतील तरुणांनी युवा दूत बनावे आणि या युवा दूतांनी आपल्या महाविद्यालयांमधिल सहयोगी युवकांना एचआयव्ही/ एड्स बाबत जागरुक करावी, अशी मी आशा करतो. आपण सर्व एकत्र येवून एचआयव्ही / एड्स बाबत गैरसमज दुर करुन, सर्व कंलक व भेदभा मिटवून, एक नविन सुदृढ भविष्य निर्माण करु शकतो जिथे एचआयव्ही / एड्सला अजिबात थारा नसेल.रेड रन मॅरेथॉन २०२४ चे औचित्य साधून मा. प्रकल्प संचालक, मुंजिएनिसं व उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य), बृहन्मुंबई महानगरपालिका श्री. संजय कु-हाडे यांच्या हस्ते IEC Intensified Campaign चा शुभारंभ करण्यात आला. IEC Intensified Campaign अंतर्गत मुंबई शहरामध्ये एचआयव्ही / एड्स जनजागृती व तपासणी मोहिम राबविण्यात येणार आहे. एचआयव्ही तपासणी करीता सर्वसामान्य लोकांना प्रवृत्त करण्याकरीता मुंजिएनिसंस्थे तर्फे पथनाटय, flash mob आणि वेस्ट बॅण्डचे सादरीकरण करण्यात येईल. तसेच IEC Intensified Campaign अंतर्गत मुंबई शहरामध्ये ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२४ या दरम्यान दहिहंडी, गणेश उत्सव इ. सार्वजनिक उत्सवां निमित्ताने सर्वसाधारण नागरीकांमध्ये व तसेच मुंबई मधील गर्दीचे ठिकाणे, शॉपिंग मॉल, महाविद्यालये व मोक्याच्या ठिकाणी एचआयव्ही / एड्सबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

या स्पर्धेत विजेत्या युवक व युवतीचा विषेश सन्मान मा. प्रकल्प संचालक, मुंजिएनिसं व उपआयुक्त (सार्वजनिक आरोग्य), बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. विजयकुमार करंजकर, अतिरिक्त प्रकल्प संचालक, मुंजिएनिसं व श्री. उमेश घुगे, उप संचालक (मा.शि.स.) तसेच मुंजिएनिसंस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये विजेत्या स्पर्धेकांना पारितोषिक व रोख रक्क वितरीत करण्यात आली. यामध्ये युवकांमध्ये प्रथम पारितोषिक कुमार विशाल तेरसिंग पावरा, टोपीवाला मेडीकल कॉलेज, कुर्ला, द्वितीय पारितोषिक कुमार विजय कोमटी ओक्सा, टोपीवाला मेडीकल कॉलेज, कुर्ला तसेच युवतींमध्ये प्रथम पारितोषिक कुमारी स्त्री राजेश धोडी, शासकीय दंत महाविद्यालय, सीएसटी, द्वितीय पारितोषिक कुमारी स्विटी सुधाकर म्हात्रे, विल्सन महाविद्यालय, गिरगाव यांना विजयी घोषित करण्यात आले. तसेच तृतीयपंथी या गटातून प्रथम पारितोषिक गणेश रविंद्र चिखलकर, शासकीय विधी महाविद्यालय, चर्चगेट द्वितीय पारितोषिक सागर शर्ती शहा, डी.वाय.पाटील. विद्यापीठ, (परिचारीका) यांनी पटकाविले.सदर स्पर्धकांना मुंजिएनिसं तर्फे नॅको, नवी दिल्ली यांचेमार्फत राष्ट्रीय पातळीवरील गोवा या ठिकाणी माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये आयोजित करण्यात येणा-या राष्ट्रीय रेड रन मॅरेथॉन स्पर्धेकरिता सहभागी होण्याची संधी मिळेल.या मॅरेथॉन स्पर्धेच्या माध्यमातून मुंजिएनिसंस्थेचे मुख्य उद्दिष्ट युवकांमध्ये खेळाच्या माध्यमातून एचआयव्ही / एड्सबाबत जनजागृती करणे हे साध्य करण्यात आले.

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज जयंती आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लॉंच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले.



विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लॉंचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशोधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**पुणे**

## भारतीय क्रिकेटच्या यशाचा पाया रचणारे पांडव पुस्तकरूपात

**मुंबई :** भारतीय क्रिकेटला अपयशी गर्तेतून बाहेर काढणाऱ्या पाच पांडवांची कथा आदित्य बजाज यांनी लिहिलेल्या 'फॅब फाईव्ह ,द पांडवास ऑफ इंडियन बॅटिंग' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन टीम इंडियाचे माजी कर्णधार,'लॉर्ड्स ऑफ लॉर्ड्स' दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते सीसीआय येथे झाले.'ग्लोबल स्कूल ऑफ क्रिकेट'चे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक सचिन बजाज यांच्या सौजन्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कर्नल वेंगसरकर यांनी या प्रकाशन सोहोळ्यात राहुल द्रविड ,व्हीव्हीएस लक्ष्मण, सौरभ गांगुली,सचिन तेंडुलकर आणि वीरेंदर सेहवाग या महान क्रिकेटपटूंच्या अविस्मरणीय आठवणी उपस्थितांना सांगितल्या.



फोटो : अनिल पानसकर

### ११वी राष्ट्रीय पुरुष व महिला बीच कबड्डी

## महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघांचा उपांत्य फेरीत निसटता पराभव



प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघांचा "११व्या राष्ट्रीय बीच कबड्डी" स्पर्धेच्या उपांत्य फेरीत निसटता पराभव. बिहार, बुद्धगया येथे सुरू असलेल्या बीच कबड्डी स्पर्धेच्या महिलांच्या उपांत्य फेरीत हिमाचल प्रदेशने महाराष्ट्राला ४७-४६असे चकवित अंतिम फेरी गाठली. सामन्याच्या पहिल्या चढाई पासून अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात पूर्वार्धात दोन्ही संघ २३-२३ असे बरोबरीत होते. सामन्याच्या शेवटच्या चढाई पर्यंत सामना ४६-४६ असा बरोबरीत होता. पण शेवटच्या चढाईत हिमाचलच्या चढाईपटूने गुण घेत हिमाचलला अंतिम फेरी गाठून दिली. आम्रपाली गलांडे, हरजित कौर संधू यांनी शेवटच्या क्षणापर्यंत निकराची लढत दिली. पण संघाचा पराभव टाळण्यात ते अपयशी ठरल्या.

पुरुषांच्या उपांत्य सामन्यात उत्तर प्रदेशने महाराष्ट्राचा कडवा प्रतिकार ४०-३७ असा मोडून काढत अंतिम फेरीत प्रवेश केला. अत्यंत अतितटीने खेळलेल्या या सामन्यात पहिल्या सत्रात महाराष्ट्र १५-२१ असे पिछाडीवर होते. दुसऱ्या सत्रात महाराष्ट्राने आपला खेळ गतिमान करीत ही आघाडी कमी करीत आणली. पण अखेर ३गुणांनी त्यांना पराभव पत्करावा लागला. ऋषिकेश भोजने, आकाश शिंदे यांनी संघाच्या विजयासाठी शर्थीचा खेळ केला. पण त्यात ते अयशस्वी ठरले.

पुरुषात उत्तर प्रदेश विरुद्ध हरियाणा तर महिलात हिमाचल प्रदेश विरुद्ध हरियाणा अशा अंतिम लढती होतील. पुरुषात राजस्थानने हरियाणाला (४२-३८) असे, तर महिलात हरियाणाने उत्तर प्रदेशचा ४३-२५ असा पाडाव करीत अंतिम फेरी गाठली.या अगोदर झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात महाराष्ट्राच्या महिला संघाने उत्तराखंडचा प्रतिकार ५३-४१ असा मोडून काढला. मध्यांतराला ३२-१२ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राला दुसऱ्या डावात मात्र उत्तराखंडने चांगलेच झुंजविले. पण शेवटी संयमाने खेळत महाराष्ट्राने सामना आपल्या हातून निसटू दिला नाही.

### पॅरिस ऑलिम्पिक 2024

## ऑलिम्पिकमध्ये भारताची मोहीम गोल्डविना संपली

### पदकतालिकेत 71व्या स्थानावर, विनेशच्या पदकाचा निर्णय 13 ऑगस्टला

वृत्तसंस्था
■ पॅरिस

पॅरिस ऑलिम्पिक 2024 मधील भारताची मोहीम शनिवारी रात्री भारतीय कुस्तीपटू रितिका हुडाच्या उपांत्यपूर्व फेरीत पराभूत झाल्यामुळे संपली. महिलांच्या 76 किलो वजनी गटात तिला किर्गिझस्तानच्या इपेरी मेडेट कायजीने 1-1 ने पराभूत केले.

कुस्तीशिवाय भारतीय गोल्फर अदिती अशोकने 29 वे स्थान पटकावले. भारतासाठी, महिलांच्या 10 मीटर एअर पिस्तूलमध्ये मनू भाकर, 10 मीटर एअर पिस्तूल मिश्रीत मनू भाकर आणि सरबज्योत सिंग, पुरुषांच्या 50 मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये स्वप्नील कुसळे, कुस्ती आणि हॉकीमध्ये अमन सेहरावत यांनी एकत्रितपणे 5 कांस्यपदके जिंकली. स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राने रौप्यपदक जिंकले. भारताने एकूण 6 पदके जिंकली.

भारताला अजूनही सातवे पदक मिळू शकते. अनुभवी कुस्तीपटू विनेश फोगाटने ५० किलो गटात कुस्तीची अंतिम फेरी गाठली होती. तिने भारतासाठी पदक निश्चित केले होते, परंतु अंतिम सामन्याच्या दिवशी तिचे वजन 100 ग्रॅम जास्त होते, ज्यामुळे तिला अपात्र घोषित करण्यात आले. आता 13 ऑगस्ट रोजी क्रीडा लवाद न्यायालय (CAS) विनेशच्या पदकावर निर्णय देईल.



पॅरिस ऑलिम्पिकचा समारोप समारंभ 11 ऑगस्ट रोजी होणार आहे, ज्यामध्ये भारताचे ध्वजवाहक पीआर श्रीजेश आणि मनू भाकर असणार आहेत. यावेळी भारताला ऑलिम्पिकमध्ये एकही सुवर्णपदक मिळाले नाही. यावेळीही भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्राकडून सुवर्णची अपेक्षा होती, पण त्यालाही रौप्यपदक मिळाले. त्यामुळे भारतीय संघ पॅरिसमधून परतल्यावर त्याच्या खात्यात 3 वर्षांपूर्वी झालेल्या टोकियो ऑलिम्पिकपेक्षा कमी पदके असतील हे स्पष्ट झाले आहे.

टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने 1 सुवर्ण, 2 रौप्य आणि 4 कांस्य पदके जिंकली होती. त्यानंतर भारतीय संघ पदकतालिकेत 48 व्या क्रमांकावर होता. यावेळी भारतीय संघ 71 व्या स्थानावर घसरला आहे. 11 ऑगस्ट रोजी 13 पदक स्पर्धा होणार असल्याने ही संख्या आणखी खाली जाऊ शकते.

टोकियोच्या तुलनेत पॅरिस ऑलिम्पिकच्या पदकतालिकेत भारताची घसरण होण्याचे मुख्य कारण म्हणजे सुवर्णपदक न जिंकणे. भारताला केवळ एक रौप्य पदक मिळाले, जे टोकियो ऑलिम्पिक चॅम्पियन नीरज चोप्राने जिंकले. भारताची पाचही पदके कांस्य आहेत. भारतीय खेळाडूंनी नेमबाजीत 3 कांस्यपदके जिंकली. हॉकीमध्ये एक कांस्यपदक आणि कुस्तीमध्ये एक पदक जिंकले.

टोकियोमध्ये गोल्ड गेल्या 3 ऑलिम्पिकमध्ये भारताला फक्त 1 सुवर्ण मिळाले आहे. नीरजने टोकियो 2020 मध्ये भालाफेकीत सुवर्णपदक जिंकले होते. टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने एकूण 7 पदके जिंकली होती, त्यानंतर भारत 48 व्या स्थानावर आहे. रिओ 2016 मध्ये भारत फक्त 2 पदके जिंकून 67 व्या क्रमांकावर होता.

***अजूनही 7 वे पदक मिळवू शकतो***

*पॅरिस ऑलिम्पिक खेळ 11 ऑगस्ट रोजी संपत आहेत, परंतु पॅरिस ऑलिम्पिकनंतर भारताच्या पदकांची संख्या वाढू शकते. भारतीय कुस्तीपटू विनेश फोगटने CAS मध्ये रौप्य पदक देण्याचे आवाहन केले आहे. याबाबतचा निर्णय मंगळवारी होणार आहे. जर विनेशने हे आवाहन जिंकले तर ती रौप्य पदक जिंकणारी देशातील पहिली महिला कुस्तीपटू बनेल आणि भारताची पदक संख्या 7 वर पोहोचेल. असे झाल्यास भारत पदकतालिकेत ६८व्या स्थानावर राहू शकेल.*

## रॅपीडो कॅरम सुपर सिक्स
## काजल - घुफ्रानला अग्र मानांकन

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र कॅरम असोसिएशन यंदा आपले७० वे वर्ष साजरे करत आहे. त्यानिमित्ताने महाराष्ट्र कॅरम असोसिएशनने सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाज यांच्या सहयोगाने इंडियन ऑइल आणि स्मॉल उत्कर्ष फायनान्स बँक पुरस्कृत रॅपीडो कॅरम सुपरसिक्स स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेचे उद्घाटन सोमवार दिनांक १२ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९ वाजता मुंबई क्रिकेट असोसिएशनचे युवा अध्यक्ष अजिंक्य नाईक यांच्या शुभ हस्ते होणार आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष जितेंद्र शाह, सूर्यवंशी क्षत्रिय ज्ञाती समाजाचे अध्यक्ष / सचिव जयंत पाटील, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे ॲपेक्स काउंसिल सदस्य अभय हडप आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. १२ ते १४ ऑगस्ट २०२४ अशा तीन दिवस रंगणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्रातील २३६ पुरुष व ४४ महिला कॅरमपटूंनी भाग घेतला आहे. सोमवारी सकाळी पुरुष एकेरी गटाने सामन्यांना सुरुवात होईल तर महिला एकेरी गटाचे सामने मंगळवारपासून खेळविण्यात येतील. स्पर्धेतील पुरुष गटातील विजेत्याला ७० हजार तर महिला गटातील विजेतीला ३५ हजारांचे रोख ईनाम आणि चषक देण्यात येईल. दोनही गटातील पहिल्या ८ क्रमांकाच्या खेळाडूंना एकंदर २ लाख ७० हजारांची बक्षिसे असोसिएशनने जाहीर केली आहेत.

सहा बोर्डाचे ३ सेट असे या सामन्यांचे स्वरूप असून खेळाडूला प्रतिस्पर्ध्याच्या सोंगटीला थेट चढविता येणार नसल्याने हे सामने अधिक रंगतदार होणार असल्याचे असोसिएशनचे मत आहे. यामुळे सामना कमी वेळेत संपणार असल्याने क्रीडा रसिकांची ओढ कॅरमकडे वाढेल यासाठी हा बदल महाराष्ट्र कॅरम असोसिएशनने केला आहे. यापूर्व फेब्रुवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र कॅरम ओपन चॅलेंजर्स या स्पर्धेत हा प्रयोग यशस्वी झाल्याने यापुढे अशा स्पर्धा महाराष्ट्रात करण्याचा निर्णय असोसिशनने घेतला आहे. सामन्यांचे थेट प्रक्षेपण महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या युट्यूब चॅनलवरून करण्यात येणार आहे.

***स्पर्धेतील मानांकन : पुरुष एकेरी :*** *१) महम्मद घुफ्रान (मुंबई), २) विकास धारिया ( मुंबई ), ३) अभिजित त्रिपनकर (पुणे), ४) प्रशांत मोरे (मुंबई), ५) संदीप दिवे (मुंबई उपनगर ), ६) रहिम खान (पुणे ), ७) झैद फारुकी (ठाणे ) ८) पंकज पवार ( मुंबई )* ***महिला एकेरी :*** *१) काजल कुमारी (मुंबई), २) समृद्धी घाडीगावकर ( ठाणे ) ३) प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर), ४) अंबिका हरिथ ( मुंबई ), ५) आकांक्षा कदम (रत्नागिरी ), ६) उर्मिला शेंडगे (मुंबई), ७) श्रुती सोनावणे ( पालघर ), ८) केशर निर्गुण (सिंधुदुर्ग )*

## बीओबी बुध्दिबळ स्पर्धेत अनाहिता, स्वरा, थिया, मैत्रेयी, आर्श, अरहान विजेते

■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त बँक ऑफ बडोदा-मुंबई विभाग प्रायोजित बीओबी कप विविध वयोगट बुध्दिबळ स्पर्धेत मुलींमध्ये अनाहिता महाजन, स्वरा लड्डा, थिया वागळे, मैत्रेयी बेरा यांनी तर मुलांमध्ये इवान दुबे, आर्श मिश्रा, नैतिक पालकर, अरहान खान यांनी विजेतेपद पटकाविले. आयडियल ग्रुप, आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना सहकार्यीत स्पर्धेत ६ वर्षाखालील मुलींमध्ये अनाहिता महाजनने (५ गुण) प्रथम, चैतन्या नागराळेने (४ गुण) द्वितीय, वियोना जैनने (३ गुण) तृतीय आणि मुलांमध्ये इवान दुबेने (४ गुण) प्रथम, अबीर अग्रवालने (४ गुण) द्वितीय, अधवान ओसवालने (४ गुण) तृतीय पुरस्कार जिंकला.

८ वर्षाखालील मुलींमध्ये स्वरा लड्डाने (४ गुण) प्रथम, मीरा शेट्टीने (३ गुण) द्वितीय, आद्या भटने (२ गुण) तृतीय तर मुलांमध्ये आर्श मिश्राने (५ गुण) प्रथम, अधरित दुबेने (४ गुण) द्वितीय, आहन मिश्राने (३ गुण) तृतीय; १० वर्षाखालील मुलींमध्ये थिया वागळेने (५ गुण) प्रथम, मृणमयी डावरेने (३ गुण) द्वितीय, सिम्रिता बुबनाने (२.५ गुण) तृतीय तर मुलांमध्ये नैतिक पालकरने (४ गुण) प्रथम, नील भटने (४ गुण) द्वितीय, अगस्त्य भामरेने (३ गुण) तृतीय आणि १२ वर्षाखालील मुलींमध्ये मैत्रेयी बेराने (४.५ गुण) प्रथम, आराध्या सिंगने (३ गुण) द्वितीय, साईशा मुळेने (३ गुण) तृतीय तर मुलांमध्ये अरहान खानने (४.५ गुण) प्रथम, कृषीव सुरेकाने (४ गुण) द्वितीय, संकीत संघवीने (३.५ गुण) तृतीय क्रमांक पटकाविला. बँक ऑफ बडोदाचे असिस्टंट जनरल मॅनेजर घनश्याम दास यांच्या हस्ते विजेत्या-उपविजेत्यांना पुरस्कार देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र चेस असोसिएशनचे सहसचिव पी.बी. भिलारे, क्रीडापटू चंद्रकांत करंगुटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी उपस्थित होते.



## 'संघटन शक्ती' हिच आपली ताकद आहे ती वाढविण्याचे काम कार्यकर्त्यांनी करावे; भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकरांचे आवाहन

प्रतिनिधी
■ मुंबई

आपल्या सगळ्यांची ताकद ही संघटन शक्ती आहे. बूथवरील संघटन शक्ती ताकदीने वाढवली पाहिजे. लोकशाहीत सगळ्यात मोठे हत्यार मतदानाचे असते. त्यासाठी संघटन शक्तीने काम केले पाहिजे. राष्ट्रभक्तीची भावनासुद्धा काम करताना क्षणाक्षणाला उजागर केली पाहिजे, असे आवाहन भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी केले आहे. ते उत्तर मुंबई जिल्हा विस्तारित कार्यकारिणी बैठकीत बोलत होते.

शनिवारी कांदिवली येथे केंद्रीय वाणिज्य मंत्री, खासदार पियुष गोयल यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्तर मुंबई जिल्हा विस्तारीत कार्यकारिणीची बैठक पार पडली. या बैठकीला ज्येष्ठ नेते राम नाईक, भाजपा मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार अतुल भातखळकर, आमदार सुनील राणे, आमदार योगेश सागर, आमदार भाई गिरकर, आमदार मनिषा चौधरी यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.




कार्यकारिणी बैठकीत आमदार अतुल भातखळकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अभिनंदनाचा ठराव मांडला. त्या ठरवाला प्रविण दरेकर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना दरेकर म्हणाले की, या देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी विराजमान झालेत. दहा वर्ष दिवसरात्र कष्ट घेऊन देशाला एका उंचीवर नेण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रयत्न केला. देशातील जनतेने पुन्हा नरेंद्र मोदींच्या नेतृत्वावर आणि दहा वर्षाच्या कारकिर्दीवर विश्वास ठेऊन केंद्रात आपले सरकार बसले. देशात विपरीत परिस्थिती निर्माण झालेली असतानाही जनतेने कौल आपल्या बाजूने दिला आणि तिसऱ्यांदा मोदींना विराजमान केले. मात्र आपल्या मनात एक शल्य आहे की, पंतप्रधान मोदींनी, केंद्रातील सरकारने देशासाठी अविरत काम केले परंतु देशात विपरीत परिस्थितीत आपले सरकार आले त्याचा आनंदही आपण व्यक्त करु शकलो नाही. आपण नाराज, ना उमेद झालो, मग या देशाच्या पंतप्रधानांना काय वाटले असेल. दिवसरात्र या देशासाठी काम केले, परदेशात प्रवास करून आपल्या देशाचे नावलौकिक केले, परंतु या सगळ्या गोष्टीतून नव्या उमेदीने दुसऱ्या दिवसापासून कामाला लागणारे आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. पंतप्रधानांनी कामाला सुरुवात केल्यानंतर देशाला ज्या उपलब्धी दिल्या, अर्थसंकल्पाच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील घटकांना जो न्याय देण्याचा प्रयत्न केलाय तो तळागाळापर्यंत पोचवण्याची जबाबदारी या अभिनंदनाच्या ठरवाच्या निमित्ताने आपल्या सर्वांची असल्याचे दरेकर म्हणाले.

***सर्व देश विघातक शक्तींना झुगारून मोदी पंतप्रधान झाले***

*मोदी हे पुन्हा एकदा पंतप्रधान पदी विराजमान झाले हे आपल्या देशाचे भाग्य आहे. आपल्या पक्षाचे भाग्य नाही. ज्या राष्ट्र विघातक शक्ती संपूर्ण जगातून मोदींचे नेतृत्व हटवू पाहत होते मात्र देशातील जनतेने सांगितले आम्हाला तिसऱ्यांदा मोदीच हवेत आणि सगळ्या शक्तींचा जो काही आगडोंब होता त्याला झुगारून तिसऱ्यांदा पंतप्रधान पदी नरेंद्र मोदी विराजमान झाले असल्याचा पुनःरूच्चारही दरेकरांनी केला.*

## तुम्हाला न विचारता जिल्हाप्रमुखाने हल्ला केला होता का?

### मनसे सचिव देशपांडेंचा ठाकरे शिवसेनेला सवाल

प्रतिनिधी
■ मुंबई

तुम्ही शिवसैनिक तर आम्हीही महाराष्ट्रसैनिक आहोत. तुमच्याकडून क्रिया घडली तर त्याला प्रतिक्रिया मिळणारच असा निर्वाणीचा इशारा मनसे नेते संदीप देशपांडे यांनी ठाकरे गटाला दिला आहे. तसेच मराठा आंदोलनाच्या आडून राज ठाकरेंवर झालेले हल्ले मनसैनिक खपवून घेणार नाही असेही त्यांनी ठणकावून सांगितले आहे. ठाण्यात शनिवारी घडलेल्या घटनेनंतर त्यांनी रविवारी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे.

यावेळी संदीप देशपांडे यांनी या हल्ल्याचे एक प्रकारे समर्थनच केले आहे. क्रियेची ही प्रतिक्रिया होती असे ते म्हणाले. "कालची घटना ही क्रियेला प्रतिक्रिया होती. क्रिया झाली की प्रतिक्रिया दिली जाणार. एका ठिकाणी क्रिया करून सारवासारव करायची जी संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांनी केली आहे. आमचे ते कार्यकर्ते असले तरी आमची भूमिका नाही असे ते म्हणाले. त्यांना न विचारता त्यांच्या जिल्हा प्रमुखांनी हल्ला केला का? मराठा आंदोलनाच्या आडून राज ठाकरेंवर केलेले हल्ले खपवून घेतले जाणार नाहीत. पुन्हा जर क्रिया झाली तर प्रतिक्रिया होणारच", असे संदीप देशपांडे म्हणाले.



तसेच मराठवाड्यात जे झाले ते आणि काल जो प्रकार घडला तो अख्ख्या महाराष्ट्राने बघितला. हे कोणालाही आवडलेले नाही. आपणही काचेच्या घरात राहतो. आपणही दौऱ्यावर जातो, सभा घेतो, याचं भान प्रत्येकाला असले पाहिजे. त्यामुळे प्रत्येकाने असंच करायचं ठरवलं तर महाराष्ट्रात काय होईल, याचा विचार प्रत्येकाने करावा, असे संदीप देशपांडे यांनी म्हटले.

***..तर आम्हीही महाराष्ट्रसैनिक***

*तसेच तुमच्याकडे बाळासाहेबांचे विचार असतील तर आमच्याकडे पण आहेत असे देशपांडे म्हणाले. "एखादी गोष्ट सुरूवात करताना पुढे काय परिणाम होईल याचा विचार करायचा असतो. दुसऱ्याने काही केल्यानंतर मग शहाणपणा शिकवायला जायचे नसते. तुम्ही शिवसैनिक असाल तर आम्ही मनसैनिक आहोत. तुमच्याकडे बाळासाहेबांचे विचार असतील तर आमच्याकडेही बाळासाहेबांचे विचार आहेत. तुम्ही आरे केले तर आम्ही कारे करणारच",असे संदीप देशपांडे यांनी म्हटले.*

## मुंबईतील गोविंदा पथके सज्ज; सराव सुरु

**मुंबई:** मुंबईत कोसळणाऱ्या श्रावण सरींच्या सोबतीने गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडण्याचा सराव सुरू केला आहे. गोपाळकाला अवघ्या १६ दिवसांवर येऊन ठेपल्याने मंडळांनी तयारी सुरू केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यंदा गोविंदांवर बक्षिसांचा वर्षाव होईल, असे गोविंदा पथकांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबईत ठिकठिकाणी गोवंदा पथके उंच मनोरे रचत दहीहंडीचा सराव करत आहेत. दक्षिण मुंबईतील श्रीराम गोविंदा पथक, उमरखाडी येथील यंग उमरखाडी गोविंदा पथक, गणेश चौकातील यंग अरुणोदय गोविंदा पथक आदींनी गुरुपौर्णिमेपासून गणेशाची पूजा करत आपला सराव सुरू केला आहे. 'बोल बजरंग बली की जय' असा जयघोष करीत यंग उमरखाडी गोविंदा पथकाचे प्रशिक्षक आनंद भोई, कमलेश भोईर व अनेक जुने-नवे गोविंदा दहीहंडी सरावास उपस्थित असतात.

## भारतीय टेनिसचा आधारस्तंभ

तब्बल २२ वर्षे भारतीय टेनिसची सेवा करणाऱ्या ४४ वर्षीय बुजुर्ग टेनिसपटू रोहन बोपन्नाने पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारतातर्फे आपल्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटचे प्रतिनिधित्त्व केले. वाढते वय आणि युवा खेळाडूंना संधी देण्याच्या दृष्टीकोनातून त्याने आता यापुढे भारतातर्फे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत न खेळण्याची घोषणा केली. त्याच्या या घोषणेमुळे भारतीय टेनिसचा एक आधारस्तंभ कोसळला असेच म्हणावे लागेल. सुरुवातीच्या काळात नरेश कुमार, रामनाथन कृष्णन, शशी मेनन, अमृतराज बंधू, रमेश कृष्णन, लिएंडर पेस, महेश भूपती, सोमदेव बर्मन यांनी आपल्या शानदार खेळाच्या जोरावर भारतीय टेनिसला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. त्यांचाच कित्ता रोहनने गिरवला. मूळचा बंगळुरू येथे असलेल्या रोहनने आपल्या टेनिस कारकिर्दीला काहीशी उशीरा सुरुवात केली.

लहानपणी फुटबॉल, हॉकी, टेनिस हे सर्वच खेळ रोहनला आवडायचे परंतु त्याच्या क्रीडाप्रेमी वडिलांनी त्याला वैयक्तिक खेळावर भर देण्याचा आग्रह केला. तेव्हा मग रोहनने फुटबॉल, हॉकीला गुडबाय करुन टेनिस खेळावर भर देण्याचा निर्णय घेतला. वयाच्या ११व्या वर्षी त्यांनी या खेळाचा श्रीगणेशा केला. सुरुवातीला शालेय स्तरावर आणि नंतर कॉलेजस्तरावर रोहनने टेनिसवर बऱ्यापैकी चमक दाखविली. सर्वांचे लक्ष वेधून घेण्यास रोहनने प्रारंभ केला. त्यानंतर जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि अखिल भारतीय स्पर्धा तो खेळू लागला. सुरुवातीच्या चॅलेंजर टेनिस स्पर्धेत त्यांनी चांगला खेळ करून टेनिस प्रेमींची मने जिंकली.

वयाच्या १९व्या वर्षी रोहनने व्यवसायिक टेनिसपटू होण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीच्या काळात घरच्यांची भक्कम साथ रोहनला मिळाली. त्यामुळेच तो पुढे एवढी मोठी झेप घेऊ शकला. भारताचा नामवंत टेनिसपटू महेश भूपतीचे वडिल कृष्णा भूपती यांच्याकडे सुरुवातीच्या काळात रोहनने या खेळाचे धडे गिरवले होते. २००२ मध्ये जपानविरुद्धच्या डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेसाठी त्याची भारतीय संघात निवड झाली. मग त्यानंतर रोहनने मागे वळून बघितलेच नाही. अवघ्या २ वर्षानंतर रोहननला खांद्याच्या दुखापतीने ग्रासले, त्यामुळे ९ महिने तो टेनिसपासून दूर होता. २००६ मध्ये या दुखापतीतून सावरत त्यांनी पुन्हा एकदा जोरदार कमबॅक केले.

एकेरीत आपली कामगिरी फारशी चांगली होत नसल्यामुळे रोहनने नंतर दुहेरीवर भर देण्याचा निर्णय घेतला. त्याचा तो निर्णय चांगलाच फलदायी ठरला. आपल्या शानदार खेळाच्या जोरावर रोहनने जागतिक टेनिस क्रमवारीत २०१० मध्ये दुहेरीत अव्वल १० जोड्यांमध्ये स्थान मिळविले. पाकिस्तानचा टेनिसपटू कुरेशी आणि रोहनची जोडी चांगलीच जमली. या दोघांनी बऱ्याच आंतरराष्ट्रीय स्पर्धात जेतेपदाला गवसणी घातली. त्यामुळे टेनिस वर्तुळात "इंडो-पाक एक्सप्रेस' या टोपण नावाने ही जोडी प्रसिद्ध झाली. हार्डकोर्टवर रोहनचा खेळ अधिक बहरतो. त्याच कोर्टवर त्यानी आपल्या कारकिर्दीतील सर्वाधिक विजेतेपद मिळवली आहेत. जोरदार सर्व्हिस आणि नेटजवळचा अफलातून खेळ हे त्याचे वैशिष्ट्य आहे. तसेच प्रभावी फोर हॅन्ड आणि बॅक हॅन्डचा रोहन खुबीने वापर करतो.



**सुहास जोशी,**
**ज्येष्ठ क्रीडा पत्रकार**

"बॉप्स" या टोपण नावाने प्रसिद्ध असलेल्या रोहनचा स्विडनचा महान टेनिसपटू स्टिफन एडबर्ग आदर्श होता. त्याच्यासारखीच कामगिरी आपण करून दाखवायची हे लहानपणी रोहनने स्वप्न बाळगले होते. बंगळुरुच्या प्रसिद्ध जैन कॉलेजमध्ये त्याचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. प्रतिष्ठेच्या ग्रॅन्डस्लेम स्पर्धेची त्याने ६ वेळा अंतिम फेरी गाठली. २०१७ मध्ये फ्रान्सच्या गॅब्रीयाला सोबत त्यानी फ्रेन्च ग्रॅन्डस्लॅम स्पर्धेत मिश्र दुहेरीचे जेतेपद पटकावले होते. तर यंदा वर्षातील पहिल्या ऑस्ट्रेलियन ग्रॅन्डस्लॅम स्पर्धेत मॅन्थ्यु हेडनच्या साथीत त्याने पुरुष दुहेरी स्पर्धा जिंकण्याचा पराक्रम केला. या विजयाबरोबरच रोहन, मॅन्थ्युने जागतिक दुहेरी टेनिस क्रमवारीत अव्वल स्थानावर झेप घेतली. हे अव्वल स्थान मिळवणारा रोहन जगातील सर्वात वयस्कर खेळाडू ठरला. तसेच वयाच्या ४४व्या वर्षी ग्रॅन्डस्लॅम स्पर्धा जिंकणारा देखील रोहन सर्वात बुजुर्ग खेळाडू ठरला.

ऑस्ट्रेलियन स्पर्धा जिंकून रोहनने युवा खेळाडूंना संदेश दिला आहे की, वाढत्या वयाचा खेळावर फारसा परिणाम होत नाही. तुम्ही जर १०० टक्के तंदुरुस्त असाल तर दिर्घकाळ तुम्ही खेळू शकता. भारताची स्टार टेनिसपटू सानिया मिर्झासोबत त्याने २००७च्या होपमन चषक टेनिस स्पर्धेत सुरेख कामगिरी केली. मग रोहनने मिश्र दुहेरीत सानियासोबत काही शानदार विजयाची नोंद केली. त्याने दुहेरीत २६ आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकल्या. यंदा मिमाई मास्टर्स टेनिस स्पर्धा जिंकणारा रोहन सर्वात वयस्कर खेळाडू ठरला. आपल्या कारकिर्दीत त्याने ६ मास्टर्स स्पर्धा जिंकल्या. आफ्रो आशियाई स्पर्धेत त्याच्या नावावर २ सुवर्ण पदके आहेत. २०१८च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत दिविज शरणच्या साथीत दुहेरीचे सुवर्णपदक रोहनने मिळवले होते. तर २०२३ च्या याच स्पर्धेत त्याने रुतुजा भोसलेसोबत मिश्र दुहेरीत सुवर्णपदक पटकवले होते.

मानाच्या डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत रोहनला भारताचे नेतृत्त्व करण्याची संधी मिळाली. या स्पर्धेत त्यांनी काही चमकदार विजय भारतासाठी नोंदविले. याच स्पर्धेत २०१० मध्ये ब्राझीलविरुद्ध आणि २०१६ मध्ये सर्बियाविरुद्ध आपल्या कारकिर्दीतील दोन सर्वोत्तम विजयाची नोंद केली होती. त्यानी बंगळुरु येथे ब्राझीलविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात रिकार्डोला पराभूत करून भारताला ऐतिहासिक विजय मिळवून दिला होता. तर सर्बियाविरुद्ध देखील चेन्नई येथे झालेल्या लढतीत बोपन्नाने आणखी एक जबरदस्त विजय मिळवला होता. कर्नाटक सरकारचा एकलव्य पुरस्कार, आंतरराष्ट्रीय टेनिस संघटनेचा ॲश पुरस्कार, केंद्र सरकारचा अर्जुन, पद्मश्री पुरस्कार रोहनला मिळाला आहे. आतापर्यंतच्या कारकिर्दीत त्याने तब्बल ५ मिलियनची कमाई केली. पर्यटनासाठी त्याला इंडोनेशिया देश खूप आवडतो. लाईट म्युझिकचा तो चाहता आहे. साहसी खेळाची त्याला आवड असून गोल्फदेखील तो चांगला खेळतो.

२०१२मध्ये त्याचा प्रेमविवाह सुप्रिया अन्नैयाशी झाला. सुप्रिया फिजिओ थिरपीस्ट असून, डिजिटल रायटरदेखील आहे. त्यांना एक लहान मुलगी आहे. कुर्ग येथे त्याच्या वडिलांचे कॉफीचे खूप मळे आहेत. बंगळुरूमध्ये त्याचे स्वतःचे एक शानदार हॉटेल आहे. आजवर या खेळात रोहनला जे काही मिळाले त्याबाबत तो पूर्ण समाधानी आहे. तब्बल २२ वर्षे विविध टेनिस स्पर्धात खेळण्याची मला संधी मिळाली. आणि भारताचे प्रतिनिधित्त्व करण्याचा मान मिळाला हे मी स्वःताचे भाग्य समजतो. ही त्याची प्रतिक्रीया खूप बोलकी आहे. एवढे यश मिळून देखील रोहनचे पाय जमिनीवरच आहेत. त्याने खास करून शैक्षणिक क्षेत्रात बऱ्याच संस्थांना मदतीचा हात पुढे केला. एक चमकदार खेळाचा ठसा रोहनने उमटविला आहे, यात शंका नाही... त्यानी केलेल्या भारतीय टेनिसच्या सेवेला तोड नाही. त्यामुळे जेव्हा जेव्हा दिग्गज भारतीय टेनिसपटूंची नावे घेतली जातील त्यामध्ये रोहन बोपन्ना हे नाव नक्कीच असेल.



**सुविचार**

जो काळानुसार बदलतो, तोच नेहमी प्रगती करतो.

# 'चंबू गबाळे' हे कसे असते पाहा!

लेखक
मकरंद करंदीकर

गेल्या सुमारे शतकभर वापरात असलेल्या अनेक शब्दांना आता आपण, हळूहळू निरोप देत आहोत. पण अजूनही यातील अनेक शब्द आपल्या बोलीभाषेमध्ये टिकून आहेत. एखाद्या शब्दाचा बोलण्यात उल्लेख आल्यावर, त्या शब्दाचा अर्थ किंवा ती वस्तू काय असावी याबद्दल आपली उत्सुकता वाढते. असाच एक शब्द म्हणजे " चंबू गबाळे "! याचीच माहिती देण्याचा हा प्रयत्न आहे.



पूर्वी लोकांच्या गरजा फार कमी होत्या. तेव्हा परगावी जाताना थोडे वैयक्तिक कपडे, काही सामान, वस्तूंचे एक बोचके तयार केले जात असे. याबरोबरच पाणी आणण्यासाठी, पिण्यासाठी, वापरण्यासाठी लहान तोंडाचा एक गडू बरोबर घेतला जात असे. त्याला चंबू , छोटा तांब्या म्हणत असत. प्रवासामध्ये सगळे मिळून एवढेच काय ते सामान असे. परीटघडीचे कपडे ही संकल्पनाच मुळी ब्रिटिशांच्या आगमनानंतर आपल्याकडे आली असावी. कारण पूर्वी चुरगळलेले कपडे ही गोष्ट अत्यंत सामान्य होती. सहाजिकच या बोचक्यामध्ये असे सर्व कपडे कशाही प्रकारे बांधले जात असत. ते ज्यात बांधले जात असत, ती देखील एखादी सुती पातळ गोधडी, लुगडे असे काहीतरी असायचे. हे बोचके एकंदरीतच ढिले, ढगळ, गबाळग्रंथी दिसत असे. पण त्याचा फायदा असा की ते डोक्यावर ठेवल्यावर हाताने धरावे लागत नसे. त्याचा तोल आपोआप सांभाळला जात असे. शिवाय उन्हापासून डोक्याचे संरक्षणही होत असे. हेच ते " चंबू गबाळे "!


येथे गवाळे असाही शब्द वापरला जात असे. पूर्वी पूजेसाठी वापरले जाणारे सोवळे रेशमी वस्त्र हे वेगळे ठेवले जात असे. त्याच्या व्यवस्थित निऱ्या करून, पीळ मारून ते खुंटीवर ठेवले जात असे. पण अनेक ठिकाणी ते एका पिशवीत कसेही कोंबले जात असे. या पिशवीला गवाळे असे म्हणत असत.




ब्रिटीशांच्या काळात प्रतिष्ठेचा ठरलेला होल्डॉल
1844 Helko Werk

एखाद्या ठिकाणाहून निघणे म्हणजे चंबू आणि गबाळे घेऊनच निघणे असा याचा मतितार्थ होता. विलेपार्ल्याचे श्री.सुधीर महाबळ हे गेली कित्येक वर्षे नियमाने पंढरीची वारी आणि अत्यंत दुष्कर अशी परतवारी करतात. त्यांच्या ' परतवारी ' या पुस्तकात याचा उल्लेख येतो. त्यांना याबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले की वारीमध्ये अजूनही, वारकऱ्यांच्या सामानाच्या बोचक्यासाठी, गबाळे हाच शब्द सरसकट वापरला जातो.

बोलीभाषेत मुक्काम हलविणे यासाठी चंबू गबाळे, वऱ्हाड, बाडबिस्तरा, कुटुंब कबिला, बिऱ्हाड बाजलं असे अनेक शब्द रूढ होत गेले. तसाच आता या चंबू गबाळयामध्येही क्रमाक्रमाने बदल होत गेला. मध्यमवर्गीयांमध्ये कापडी पिशव्या आणि पाण्याचा फिरकीचा तांब्या वापरात आला. त्यानंतर फिरकीच्या तांब्याबरोबरच ट्रंक आणि सतरंजीची दोरीने बांधलेली वळकटी ( गुंडाळी ) दिसू लागली. मग लब्धप्रतिष्ठित लोकांमध्ये होल्डॉल आणि खांद्याला अडकवण्याच्या वॉटर बॅग, थर्मास दिसू लागले. सुटकेस ( त्याला खाकी कापडाची कव्हर्स सुद्धा ) आणि कूल रायडर आले. आता आधुनिक प्रवासामध्ये तर स्ट्रोल बॅग / व्हिलर बॅग आणि मिनरल वॉटरची प्लास्टिकची बाटली हे प्रतिष्ठेचे प्रसादचिन्ह बनले आहे.( कृपया सोबतचे सर्व फोटो पहावेत). तरीही बोलीभाषेत तरी, हे चंबू गबाळे मात्र अजूनही ठाण मांडून बसले आहेच !




गेल्या शतकातील फिरकीचा तांब्या व गाठोडे
शिल्पकार - नानासाहेब करमरकर,सासवने

# तिरंग्याला अर्पण सन्मानाची फुले !

लेखक
प्रशांत कुळकर्णी

"अग आई मी शाळेतून सुटल्यावर पहिल्यांदा घरी येतो, क्रिकेट संध्याकाळी खेळायला जातो.

तुला उगीचच का वाटते ? मी, फक्त खेळतच राहातो असे.

तु माझ्याच मागे का लागली आहेस ?" निनादने आपल्या आईला विचारले.

निनादच्या आईने त्याच्याकडे दुर्लक्ष केले आणि निराच्या मागे लागली,निरा म्हणजे निनादची लहान बहीण,तीला आई म्हणाली,

"निरे आता तरी अभ्यासाकडे लक्ष द्या,पाचवीत असताना गणितात लाल भोपळयांची चांगलीच कमाई केली होतीस ! आता तरी संध्याकाळी क्लास संपला की पिशव्या भरून भरून गप्पा मारणे थांबवा ! बघावे तेव्हा शैला नाहीतर पवारांची गिरीजा, खुप झाला शैला,आणि गिरीजा सोबत टाईम पास.

निरे ऐकलं नाहीस ना माझे, तर तुझ्या बाबांना सांगून तुझा क्लासच बंद करते मी".

निनाद आणि निराने एकमेकांकडे पाहत आपल्या शाळेच्या बॅगा खांद्यावर टाकल्या.

आईने तयार करुन दिलेले खाऊचे डब्बे आपापल्या बॅगेत नीटपणे ठेवले.आज आपली आई अशी चिडचिड का करत असेल ?असा विचार करत बहीण भाऊ आपल्या सरस्वती मराठी विद्यामंदिर शाळेत जाण्यासाठी आपल्या घाटकोपर येथील भटवाडीतील सहकार नगर मधून निघाले.

सहकार नगरच्या बाहेर येत असतानाच त्यांना शैला,गिरीजा, संकेत, विनोद,हे त्यांच्या शाळेत शिकणारे सवंगडी सुद्धा दिसले .

नेहमी बडबड करणारा संकेत आज मात्र शांत शांत दिसत होता,वाहत्या पाण्यासारखी खळखळून हसणारी,आपल्या दोन वेण्यांना कधी डाव्या बाजूला तर कधी उजवीकडे झटके देत मान वेळावत बोलणारी शैला आज खाली मान घालून चालत होती.ही सगळी सहावी सातवी इयत्तेत शिकणारी लहान मुले होती,पण काही तरी घडले होते, त्यामुळे ती अबोध मुले अबोल झालेली होती. सहकार नगर पासून दहा मिनिटे चालल्यावर त्यांची सरस्वती मंदिर शाळा येणार होती.

काही पावले चालून गेल्यावर निनादला राहवले नाही,तो थांबला ,त्यांने मोठ्या आवाजात विचारले ,

"शैला, गिरीजा ,आपण सर्वजण आज असे गप्प गप्प का आहोत ?" माझी आई सुद्धा खूप चिडचिड करत होती. आपल्या सहकार नगर मध्ये काही झाले आहे का?"



एखाद्या नवख्या मुलाकडे पाहावे तसे सगळेजण निनाद कडे पाहू लागले, गिरीजा म्हणाली,

"अरे माझ्या बाबांचे आणि निनाद तुझ्या बाबांचे खुप मोठे भांडण झाले , तुला माहितच नाही ? अरे माझे बाबा,तुझे बाबाच नाही तर आपल्या सहकार नगर मध्ये सगळेच भांडाभांड करतात, एकमेकांना आरडाओरडा करत काहीतरी बोलतात.मला तर खुप वाईट वाटते रडावेसे वाटते.आपण सगळे मित्र,आणि आपले आई बाबा एकमेकांशी बोलत नाहीत,रागावतात."

विनोद थोडासा पुढे आला आणि म्हणाला,

"लोक म्हणतात पवार काकाच दरवर्षी ध्वजारोहण करण्यासाठी झेंड्याची दोरी का खेचतात?

तेच का दरवर्षी आपल्या राष्ट्रध्वजाची पुजा करुन नारळ फोडतात?अध्यक्ष असले म्हणून काय झाले ? आताच्या भांडणामुळे वाटतय आपल्या सहकार नगर मध्ये झेंडावंदन कसे होणार ?" विनोदचे बोलणे ऐकून निनाद म्हणाला, "आता मला माझ्या आईच्या रागावण्याचे,कारण समजले.सहकार नगरातील लोक भांडतात म्हणून माझ्या आईला वाईट वाटते, तसेच तुमच्या आईला सुध्दा वाईट वाटत असेल ,आपण सर्व मुलांनी काहीतरी करुया का ?

" आपण काय करायचे निनाद? आपले कोण ऐकणार?

आपल्यालाच मोठी माणसे रागे भरतील ! मग आपण काय करणार ? हाताची घडी तोंडावर बोट ? छोटीशी निरा म्हणाली. "नाही निरे ! आपण हाताची घडी तोंडावर बोट असे नाही तर मी सांगेन तसे वागायचे! आज श्रावणी शनिवार आहे,शाळा लवकरच सुटेल शाळा सुटल्यावर मी सांगेन आपण काय करायचे ते !" निनाद म्हणाला.

दुपारी तीन वाजता शाळा सुटल्यानंतर निनाद आणि गिरीजाने आपल्या सहकार नगर मधील मुलांमुलींशी गप्पा मारल्या, पंधरा ऑगस्ट आपल्या स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमासाठी आपण काय करायचे ते सगळयांना गुपचूप समजावून सांगितले.

शनिवारी संध्याकाळी सहकार नगर मधील एकही मुलगा किंवा मुलगी खाली आले नाहीत,सगळ्या मुलांनी आपल्याला जणू काही घरातच कोंडून घेतले होते .मुलांनी आपल्या आईबाबांशी बोलायचे नाही असेच ठरवले होते.

सहकार नगर मध्ये सामसुम पसरली.

मुलांचे हसणे खिदळणे तर दुर, मुलांचे एकत्र खेळणे , बोलणे सुध्दा बंद झाले.

सहकार नगर मधील लोकांनी आजी आजोबांनी सहकार नगर मध्ये असे वातावरण कधीच पाहिले नव्हते, संध्याकाळी येणाऱ्या भेळ वाले आणि , कुल्फी वाल्या काकांकडून भेळ आणि कुल्फी विकत घेण्यासाठी मुले आलीच नाहीत.सहकार नगर मध्ये बातमी मात्र कानोकानी पसरली. "सहकार नगरातील बच्चा कंपनीची एकमेकांशी कट्टी! कुणीही कुणाशी बोलणार नाही"!

शनिवार शुकशुकाट,रविवारी शांत वातावरण,सोमवारी मुले शाळेत एकत्र जाताना आणि एकत्र येताना सुध्दा दिसली नाहीत .आता मात्र सहकार नगर मधील भांडखोर काका, आणि भांडखोर काकी खडबडून जागे झाले.

आपल्या नगरातील लहान मुले अशीच रागावून रुसून बसली तर स्वातंत्र्य दिन साजरा कसा होणार ? सुंदर चित्रे आणि रांगोळ्या कोण काढणार ? पंधरा ऑगस्टच्या कार्यक्रमात गाणी कोण म्हणणार ? अशी काळजी वडीलधारी लोकांना वाटायला लागली.मंगळवारी सायंकाळी सहकार नगरातील सर्व काकांनी एकमेकांना मोबाईल फोन वर फोन करायला सुरुवात केली.काकी मावश्या एकमेकांच्या दारात जाऊन एकमेकांना हाका मारायला लागल्या. संध्याकाळी सगळ्या लहान मुलांना एकत्र बोलावून घेतले.आणि एकमेकांशी भांडणे वादविवाद न करण्याचे वचन दिले.

सहकार नगरातील मुलांच्या योजनेला यश आले होते. कशी अद्दल घडवली वडीलधारी काकांची ! अश्या आविर्भावात मुले एकमेकांकडे पाहून मंद मंद हसत होती.

सहकार नगर मधील वातावरण मुलांनी बदलून टाकले,आनंदाची लहर पसरली.

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी सकाळी आठ वाजता सहकार नगरात दुध आणि वृत्तपत्र पोचवण्याचे काम करणाऱ्या कदम काकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

राष्ट्रगीत झाल्यानंतर,सहकार नगरातील सफाई कामगार,सुरक्षा रक्षक सगळ्यांना मिठाई देऊन सत्कार करण्यात आला.लहान मुलांनी गीतगायन, नृत्य,फेन्सी ड्रेस असे अनेक कार्यक्रम सादर करुन सहकार नगरात आनंदी आनंद पसरवला . भारतमाता की जय ! वंदे मातरम ! अश्या घोषणांनी सहकार नगर सुखावले . पवार काकांनी सर्व मुलांचा एकत्र फोटो काढला आणि म्हणाले. "शहाणी आमची लहान मुले ! त्यांनी वाहीली तिरंग्याला सन्मानाची फुले !"

# 'काहीच नाही' तेनालीरामांची युक्ती

तेनालीराम राजा कृष्णदेव राय यांना फार जवळचे होते. त्यामुळे राजाच्या दरबारातील इतर मंडळी त्यांचा द्वेष करत असे. त्या मंडळीत एक रघु नावाचा व्यवसायी होता तो फळ विकण्याचे काम करायचा.

एकदा त्याने तेनालीराम विरुद्ध कट रचला आणि त्याला राजाच्या समोर खाली पाडण्यासाठीची योजना आखली. त्याने एके दिवशी तेनालीला आपल्या दुकानात फळ घेण्यासाठी बोलावले आणि तेनालीने फळे घेतल्यावर पैसे विचारल्यावर त्याने हसून उत्तर दिले की 'अरे तेनालीजी ह्याचे पैसे आपल्यासाठी काहीच नाही'. हे ऐकल्यावर तेनालीने स्मितहास्य करत त्यामधून काही फळ खाल्ले आणि बाकीचे आपल्याबरोबर घेऊन आपल्या घराकडे निघाले. तेवढ्यात रघुने त्यांना अडविले आणि मला माझ्या फळांचे पैसे द्या, असे म्हणू लागला.

त्यावर तेनाली म्हणे की आपणच तर सांगितले न की ह्या फळाचे पैसे काहीच नाही. मग आता आपण आपल्या गोष्टीवरून का फिरत आहात. असे ऐकल्यावर रघु चिडला आणि तेनालीला म्हणाला 'की हे बघ माझे हे फळ काही फुकटात येत नाही. मला माझ्या फळांचे पैसे दे नाहीतर मी महाराजांकडे तुझ्या विरुद्ध तक्रार करून तुला शिक्षा करण्यास सांगेन.



तेनाली वाटेतून चालत चालत हाच विचार करत होते की या रघुने माझ्या विरुद्ध केलेल्या कट कारस्तानाचे ह्याला काय उत्तर देऊ. असा विचार करत त्यांना एक युक्ती सुचते. दुसऱ्या दिवशी सांगितल्या प्रमाणे रघु महाराजांकडे फिर्याद घेऊन पोहोचतो आणि घडलेले सर्व सांगतो. राजा कृष्णदेव राय तेनालीला बोलावतात आणि त्याला त्याचे दाम देण्यास सांगतात. तेनालीराम जणू तयारच बसलेले होते.

राजांनी त्यांना सफाई देण्यास सांगितल्या बरोबरच त्यांनी आपल्या बरोबर आणलेली एक चमकदार मोठी पेटी रघुला देत म्हटले की हे घ्या तुमच्या फळांची किंमत.

एवढी मोठी पेटी बघितल्यावर रघुला वाटते की एवढ्या मोठी पेटीत खूप सोन्याची नाणी, हिरे दागिने असणार. आता मी खूप श्रीमंत होणार. असा विचार करत त्याने ती पेटी उघडतातच जोरात ओरडला की अरे या पेटीमध्ये तर 'काहीच नाही'.

होय, आता यामधील तुझं 'काहीच नाही' घे आणि इथून चालता हो, असे तेनाली म्हणाले. हे ऐकून त्या दरबारातील सर्व मंडळी हसू लागतात आणि रघुला रिकाम्या हाती आपल्या घरी परतावे लागते. अशा प्रकारे तेनालीरामने रघुला सडेतोड उत्तर दिले. तेनालीरामने पुन्हा एकदा आपल्या बुद्धिमत्तेने महाराज कृष्णदेवराय यांचे मन जिंकले होते.


## मनोरंजक शब्दकोडे





**आडवे शब्द :** १) लोकशाहीच्या विरुद्ध ४) एक पाणपक्षी ६) राजवाडा ७) किंमत ८) अमिताभचा एक सिनेमा १०) अभिनेत्री - xxx कपूर १३) पंजाबमधील मोठी नदी १५) गाईचं पिल्लू १७) एक सुवासिक झाड १९) आग २०) सन्मानासाठीचा सूचक शब्द २२) विष्णू पत्नी २४) शंकराचे वाहन २५) ठाणे जिल्ह्यातील एक शहर २६) सुंदर स्त्री २८) डुक्कर २९) आर्थिक देवण-घेवाणीचे माध्यम ३१) रामन xxx ३३) एक पालेभाजी ३५) हेळसांड ३६) मध्य रेल्वेवरील एक स्थानक

**उभे शब्द :** १) तंबाखू ओढण्याचे उपकरण २) सभेचे ठिकाण (हिंदी ३) बर्फ ४) अंड्यातील पिवळा भाग ५) टांगता येण्याजोगा दिवा ९) त्रास ११) हा मैद्यापासून बनवतात १२) गायक - सी. xxxx १४) पंडित नेहरूंचे नाव १६) एखाद्या वस्तूचा आकार १८) माजी पंतप्रधान - पी.व्ही. xxxxxx २१) याचना २३) अभिमान, शेखी २५) पवन २७) जंगलात राहणे २८) वाहतुकीचे एक साधन २९) रुची ३०) हे दह्यापासून बनते ३२) फुले-फळांचा एकत्रित समूह ३३) घोडे बांधण्याचे ठिकाण ३४) शरीरावरील बारीक केस

## चित्रातील 5 फरक ओळखा



## चित्र रंगवा



## बाल चित्ररंग




चित्रकार
प्रेम सावंत
गुरुनानक
हायस्कूल
भांडुप (प)



## चला चित्र शिकूया




## स्टाईल मारो



सुहानी भोवड